
वृषाली जोशी
अमेरिकन
गुन्हे अन्वेषक कथा
भाग १

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा- भाग १

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

# अमेरिकन लघुकथा

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १९ ऑगस्ट २०२३



©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# The Oxford Book Of American Detective Stories

Edited by **Tony Hillerman & Rosemary Herbert**

# अमेरिकन गुन्हे अन्वेषक कथा भाग १

संकलक : टोनी हिलरमन व रोझमेरी हर्बर्ट

पहीली कथा 'चोरलेली सिगरेट केस' हे शेरलॉक होम्सचे विडंबन असून, ती प्रसिद्ध गोष्ट आहे. याचा लेखक फ्रान्सिस ब्रेट हर्टे हा १८३६ मध्ये न्यूयॉर्क येथे जन्मला. लेखन करता करता, त्याने अनेक नोकऱ्या केल्या. तो अनेक वर्तमानपत्रात व साहित्यिक जर्नल्समध्ये लिहीत असे. उत्तर कॅलीफोर्नियामध्ये त्याने संपादक रजेवर असतांना काम केले. तेव्हा त्याने इतकी भडक विधाने छापली, की महिन्याभरात त्याला ते पद सोडावे लागले.

दुसरी कथा 'सुंदर चेहरेपट्टी' याचा लेखक आर्थर रीव्ह हा प्रिन्सटन विद्यापीठातून पदवीधर झाला. मग त्याने कायद्याचा अभ्यास केला. पहील्या महायुद्धापूर्वी त्याच्या कथा चांगल्याच लोकप्रिय झाल्या होत्या. त्याच्या गोष्टीतील गुप्तहेराचे पात्र, रसायन शास्त्राचा प्राध्यापक असलेला क्रॅग केनेडी हे आहे व साथीदार वाल्टर जेम्सन आहे. प्रस्तुत गोष्टीत गुन्ह्याची उकल करतांना, त्याने शास्त्रीय स्पष्टीकरण दिले आहे.

तिच्या मैत्रिणीची ज्युरी या कथेची लेखिका सुसान ग्लास्पेल ही कादंबऱ्या व लघुकथा लिहिणारी पुलीट्झर पारितोषिक विजेती लेखिका आहे. ती डेव्हेनपोर्ट,

आयोवा येथे १८८२ मध्ये जन्मली. ती काळाच्या पुढे असलेली स्त्री होती. तिने दोन वर्षे कोर्टात नोकरी केली. वर्तमानपत्रात वार्ताहर म्हणून काम केले. १९१३ ते १९२२ मध्ये तिने सात एक अंकी नाटके व चार मोठी नाटके लिहीली. प्रस्तुत गोष्ट ही उद्धट व रागीट नवऱ्याच्या बायकोची गोष्ट आहे.

चौथी गोष्ट ‘पान तेरा गायब’, याची लेखिका ॲना कॅथरीन ग्रीन हिला गुन्हे अन्वेषण अद्भुतरम्य कथांची जननी असे संबोधले जाते. तिने लिहिलेली लीव्हेनबर्थ केस ही महिलेने लिहिलेली पहीली तशा प्रकारची कादंबरी मानली जाते. अगाथा ख्रिस्तीच्या मिस जेन मार्पलसारखी तिची गुप्तहेर, मिस व्हायोलेट स्ट्रेंज आहे. अठराव्या शतकाची शेवटची दहा वर्षे व एकोणीसाव्या शतकाची पहिली दहा वर्षे हा तिच्या लेखनाचा सुवर्णकाळ होता.

# कथानुक्रम

चोरलेली सिगरेट केस

सुंदर चेहरेपट्टी

तिच्या मैत्रिणीची ज्युरी

पान तेरा गायब

# The Stolen Cigar Case

## Satire of Sherlock Holms

# चोरलेली सिगरेट केस

## [शेरलॉक होम्सचे विडंबन]

By

BRET HARTE



जुन्या ब्रुक रस्त्यावरील लॉजमध्ये मला शेकोटीसमोर शेक घेत बसलेला, हेमलॉक जोन्स सापडला. जुन्या मित्राच्या मोकळेपणे, मी लगेच माझ्या नेहमीच्या पद्धतीने त्याच्या पायाशी लोळण घेतली आणि प्रेमाने त्याच्या बुटाला स्पर्श केला. हे मी दोन कारणांनी केले. एक म्हणजे त्यामुळे त्याने त्याच्या वाकड्या चेहऱ्याने माझ्याकडे नीट लक्ष देऊन पाहिले आणि दुसरे म्हणजे, त्याच्या अतिमानवी अंतर्मनासाठी माझ्या मनात असलेला मान देणारा भाव त्याला दिसला. तरीसुद्धा

तो काही गूढ सुगावा शोधण्यात इतका गुंग झाला होता, की त्याचे माझ्याकडे लक्षच गेले नाही. पण मी चुकत होतो --- नेहमीप्रमाणे त्या प्रखर बुद्धीमंताला जोखण्यात व समजून घेण्यात मी कमी पडलो होतो.

तो त्याचे डोके न उचलता म्हणाला, “पाऊस पडतो आहे.”

मी पटकन बोललो, “तू बाहेर गेला होतास का?”

“नाही, पण मी तुझी छत्री ओली झालेली पाहिली आणि ओव्हर कोटातून थेंब गळत असलेले पाहिले.”

त्याचे हे निरीक्षण बघून मी थक्क झालो. थोडे थांबून, तो निष्काळजीपणे विषय बदलत म्हणाला, “शिवाय मला खिडकीतून पावसाचा आवाज येत होता. ऐक.”

मी ऐकला. मला माझ्या कानांनी क्वचितच इतके ऐकू येत असे. पण खिडकीच्या काचांवर पावसाचे थेंब टपटप पडत होते. हे स्पष्ट होते, की माणूस फसू शकत नव्हता!

मी विषय बदलत विचारले, “अलीकडे तू कशात तरी गुंतलेला होतास का? --- स्कॉटलंड यार्डने निराश होऊन सोडून दिलेली ---काही नवीन समस्या? तुझी कुशाग्र बुद्धी त्यात अडकली आहे का?”

त्याने त्याचा पाय थोडा मागे घेतला. आधीच्या स्थितीत येण्यापूर्वी, तो हो नाही करत असल्यासारखा वाटला. मग त्याने दमूनभागून उत्तर दिले, “ही इतकी क्षुल्लक गोष्ट आहे --- क्रेम्लीन, पुटीबाडच्या राजाच्या महालातून काही माणके नाहीशी झाल्याबद्दल काय करावे, याचा सल्ला घेण्यासाठी राजपुत्र कुपोली माझ्याकडे इथे आलेला आहे. त्यासाठी त्याने उगीचच त्याच्या सर्व अंगरक्षकांना

फाशी दिले. हरवलेली रत्नजडीत तलवार शोधण्यासाठी, तो माझी मदत घेतो आहे. प्रेट्झेल ब्राउंटस्विगच्या राणीला हे शोधून काढायचे आहे की फेब्रुवारी १४ ला व काल रात्री तिचा नवरा कुठे होता.'' --- त्याने त्याचा आवाज थोडा खाली आणला --- ''या घरात रहाणारा मला जिन्यात भेटला. त्याला असे हवे होते की त्याच्या घंटीला कुणी उत्तर का दिले नाही.''

त्याच्या कपाळावरील अनाकलनीय आठ्या बघून, मला हसू आवरेना.

तो थंडपणे बोलला, ''लक्षात ठेव, अशा क्षुल्लक प्रश्नातूनच मी हे शोधून काढले, की पॉल फेरोलने त्याच्या बायकोला का मारले आणि जोन्सला काय झाले!''

मी लगेच मूक झालो. तो क्षणभर थांबला आणि त्याचा नेहमीचा कठोर, विश्लेषणात्मक दृष्टीकोन ठेवत, तो म्हणाला, ''मी जेव्हा हे क्षुल्लक असल्याचे म्हणतो, तेव्हा ते आता माझ्यासमोर असलेल्या कामाच्या मानाने क्षुल्लक असते. एक गुन्हा घडलेला आहे --- आणि तो माझ्याविरुद्ध असून विशेष असा आहे. तू सुरवात कर. तुला नवल वाटेल, तो करायचे धाडस कुणी केले आहे. मलाही नवल वाटते आहे. तथापि तो घडला आहे. मी लुटला गेलो आहे.''

''तू लुटला गेला आहेस? कायदा व विश्वास तोडणाऱ्यांचा कर्दनकाळ हेमलॉक जोन्स! माझ्यासमोर त्याला टेबल धरताना व सोडताना बघून, मी आश्चर्यात बुडालो आहे.''

''हो, ऐक. मी हे दुसऱ्या कुणाजवळ कबूल करणार नाही. पण तू मला अनेक वर्षे बघत आला आहेस. तुला माझ्या पद्धती माहिती आहेत. सामान्य मानवापासून माझे बेत मी तुझ्यासाठी थोडे किलकिले केले आहेत. तू --- ज्याने

अनेक वर्षे आनंदाने माझा आत्मविश्वास बघितला आहे व मूकपणे माझ्या निर्णयांचे व उद्दामी पद्धतींचे कौतुक केले आहे, असा तू आहेस. तू माझा शब्द कधी खाली पडू दिलेला नाहीस. माझा गुलाम होऊन राहिला आहेस. माझ्या पायाशी लोळण घेतली आहेस. फक्त किरकोळ केसेस वगळता तुझी रुग्णसेवाही बंद केली आहेस. स्वतःचा काही फायदा होऊ न देता, भरभर रुग्णसंख्या कमी करून, त्याना क्विनाईनऐवजी स्ट्रायचनाईन आणि एप्सम मिठाऐवजी आर्सेनिकची शिफारस करणे सुरु केले आहेस. तू कसलाही व सर्व गोष्टींचा माझ्यासाठी त्याग केला आहेस --- तू माझा विश्वासू सहकारी बनला आहेस!"

मी उठून त्याला गाढ आलिंगन दिले. तरीही तो इतका विचारात बुडून गेलेला होता त्याने जणू त्याला वेळ बघायची असल्यासारखा, आपोआप त्याचा हात त्याच्या घड्याळाच्या साखळीवर ठेवला.

तो म्हणाला, "खाली बस. सिगरेट घेतोस?"

मी बोललो, "मी सिगरेट ओढणे बंद केले आहे."

त्याने विचारले, "का?"

मी कां कू करू लागलो आणि बहुधा लाल झालो. मी खरेच ती सोडली आहे, कारण माझ्या कमी होणाऱ्या प्रॅक्टीसबरोबर, ती मला महाग वाटू लागली आहे. मला फक्त पाइप परवडू शकतो. मी हसत म्हणालो, "मला फक्त पाइप परवडतो. पण मला या चोरीबद्दल सांग. तुझे कायकाय चोरीला गेले?"

तो उठला आणि हात कोटाच्या बाहेर आलेल्या भागाखाली ठेवत, शेकोटीसमोर बसत, क्षणभर माझ्याकडे विचारपूर्वक बघत बोलला,

"टर्किश राजदूताने मला भेट दिलेली सिगरेट केस तुला आठवते का?

हिलॅरीटी सिनेमागृहातील एकत्रित गाण्यातील वजीराची आवडती असलेली पाचवी मुलगी हरवली होती. तिला शोधून काढल्याबद्दल त्याने मला ती सिगरेट केस दिली होती. ती ती सिगरेट केस आहे. त्याला हिरे बसवलेले होते."

मी म्हणालो, "आणि त्यातील सर्वात मोठ्याच्या जागी मलम लावलेले होते."

तो हसून विचारपूर्वक बोलला, "ओहो, तुला ते माहिती आहे?"

"तूच मला ते सांगितले होतेस. तुझ्या असामान्य ग्रहणशक्तीच्या आकलनाचा तो पुरावा असल्याचे मला आठवते."

"देवा रे! पण त्याचा अर्थ तुला असे म्हणायचे नव्हते ना, की तू तो हरवलास?"

तो क्षणभर गप्प राहिला. "नाही, तो चोरला गेला होता. ते खरे होते. तरीही मी तो शोधून काढला. मी एकट्याने! माझ्या प्रिय माणसा, तुमच्या व्यवसायात कोणी गंभीरपणे आजारी असले, तरी तो स्वतः स्वतःचे औषध ठरवत नाही. तर ओळखीच्या डॉक्टरांचा सल्ला घेतो. अशा प्रकारे आपण वेगळे आहोत. मी हे प्रकरण माझ्या हातात घेणार आहे."

मी उत्साहाने म्हणालो, "आणि तुझ्यापेक्षा चांगला अजून तुला कोण सापडणार आहे? मी म्हणेन सिगरेट केस जवळजवळ आधीच सापडल्यासारखी आहे."

तो हलकेच म्हणाला, "मी तुला त्याची परत आठवण करेन. आणि मला एकट्याला या गूढाचा माग काढायचा असला तरी, आता तुझ्या अंदाजावरील माझा विश्वास दाखवण्यासाठी, मी तुझी कुठलीही सूचना ऐकून घ्यायला तयार आहे."

त्याने खिशातून स्मरणवही काढली आणि थंडपणे हसून, पेन्सिल घेतली. मी माझ्या जाणीवांवर क्वचितच विश्वास ठेवतो. हेमलॉक जोन्सने माझ्यासारख्या नम्र माणसाकडून सूचना स्वीकारणे! त्याचा मान म्हणून त्याच्या हाताचे चुंबन घेऊन, मी आनंदाने सुरवात केली, "प्रथम जाहिरात देऊन, त्यात बक्षिसाची लालूच दाखवायला हवी. मी त्या मजकुराची पत्रके दारुच्या गुत्त्यात व पॅस्ट्री बनवणाऱ्या स्वयंपाक्यांना वाटेन. मग मी कर्ज देणाऱ्यांच्या दुकानात जाईन. मी पोलीसस्टेशनमध्ये सूचना देईन. मी नोकरांची तपासणी करेन व घराची आणि माझ्या खिशांचीही! मी पर्यायाने बोलतो." तो हसत बोलला, "अर्थात माझे स्वतःचे खिसे!"

त्याने थंडपणे त्याची नोंद घेतली.

मी पुढे म्हणालो, "कदाचित तू हे आधीच केले असशील?"

त्याने चमत्कारिकपणे उत्तर दिले, "कदाचित."

त्याने स्मरणवही खिशात टाकत व उठत, सुरु ठेवले, "प्रिय मित्रा, आता तू काही क्षण मला माफ करशील का? मी परतेपर्यंत अगदी घरच्यासारखा निवांत हो. तिथे काही गोष्टी असतील." त्याच्या विविध सामानाने भरलेल्या मांडणीकडे निर्देश करत, तो म्हणाला. कदाचित वेळ घालवण्यासाठी तुला त्यात काही रुचीपूर्ण सापडेल. त्या कोपऱ्यात पाइप आणि तंबाखू पण आहे."

मग त्याच अनाकलनीय चेहऱ्याने मान हलवत, तो खोलीतून बाहेर पडला. गुपचूप निघून जाण्याच्या त्याच्या पद्धतीला मी फारच सरावलेला होतो आणि त्याच्या कुशाग्र बुद्धीला अचानक काही आठवून, काही पुरावा मिळवण्या साठीच तो गेलेला असणार, याची मला खात्री होती.

एकटाच राहिल्यावर, मी मांडणीकडे एक कटाक्ष टाकला. तिथे लंडनच्या उपनगरातील व आसपासच्या भागातील 'फूटपाथ आणि रस्त्यावरील किरकोळ वस्तू' असणारे काचेचे लहान जार होते. त्यात 'पाऊलखुणा शोधण्यासाठी' अशीही एक उपचिठ्ठी होती. तिथे अजूनही खूप जार होते. त्यावर चिठ्ठ्या होत्या, “आधी प्रकाशित केलेल्या अनेक पुस्तकांचे भाग' व 'रस्त्यावरील मोटारींच्या गाद्या', 'नारळाच्या शेंड्या', 'सार्वजनिक जागेतील गालीच्यांच्या दोऱ्या', 'सिनेमागृहे ओळ A १ ते ५०' जिकडे तिकडे या नवलपूर्ण माणसाच्या पद्धतींचे व शिष्टपणाचे नमुने विखुरलेले होते.

असा माझा वेळ चालला होता तेव्हा मला दाराचा करकर आवाज ऐकू आला. एक परका माणूस आत शिरला व मी डोके उचलून त्याच्याकडे पाहिले. तो रांगडा मनुष्य होता. त्याने गबाळा, मोठा मळका कोट घातला होता आणि त्याहूनही मळका मफलर त्याच्या गळयाभोवती व चेहऱ्याच्या खालील भागावर गुंडाळला होता. त्याच्या आगमनाने त्रासलेल्या मी त्याच्याकडे कठोरपणे वळलो. तेव्हा चुकून या खोलीत आल्याबद्दल घशातून हळू आवाज काढत, माफी मागत, तो बाहेर सटकला आणि दार लाऊन घेतले. मी झटपट जिन्यापर्यंत त्याचा पाठलाग केला. मी पाहिले, की तो जिना उतरून नाहीसा झाला. चोरीच्या घटना माझ्या मनात घोळत असल्याने, याचा माझ्या मनावर वेगळाच परिणाम झाला. मला माझ्या मित्राची काही शंका येऊन, खोलीतून वेळीअवेळी घाईने बाहेर पडायची सवय माहिती होती. हे शक्य होते, की त्याची दमदार बुद्धिमत्ता आणि एखाद्या विषयावर लक्ष एकत्रित करायच्या अफाट अंतर्दृष्टीच्या योगे, तो त्याच्या घरातील वस्तूंबद्दल निष्काळजी असणार. सामान्यपणे खणांना कुलुपे लावायची काळजीदेखील तो घेत नसणार. मी एक दोन खण उघडायला गेलो तर ते उघडेच

होते, म्हणजे माझा अंदाज बरोबर होता. पण एक खण मात्र मला उघडता येईना. त्याची मूठ चिकट होती. कोणीतरी घाणेरड्या हातांनी तो उघडला होता. मला हेमलॉकचा टोकाचा स्वच्छताप्रिय स्वभाव माहिती होता. मी त्याला याबद्दल सांगायचे ठरवले. पण अरेरे, मी विसरून गेलो!

तोपर्यंत --- पण मी ती गोष्ट सांगायची अपेक्षा करत होतो.

बराच वेळ तो आला नाही. मी शेवटी शेकोटीशी बसून राहिलो. तिची उब व खिडकीत पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा नाद, याने मला डुलकी लागली. मला स्वप्नही पडले असावे, कारण झोपेत, मला असा भास झाला की कोणीतरी माझ्या खिशावरून हळूच हात फिरवत आहे. हे चोरीच्या भीतीने झाले असावे. जेव्हा मी जागा झालो, तेव्हा हेमलॉक जोन्स माझ्याशेजारी बसलेला होता. त्याची एकटक नजर शेकोटीच्या विस्तवाकडे लागलेली होती.

तो हसत म्हणाला, “तुला इतकी गाढ झोप लागली होती, की मला तुला जागे करावेसे वाटेना.”

मी डोळे चोळले व विचारले, “काय बातमी आहे? तुला काही यश आले का?”

त्याची वही वाजवत, तो म्हणाला, “मला अपेक्षा होती त्यापेक्षा जास्त. मी तुझे आभार मानतो.”

मनोमन सुखावून, मी अजून काही ऐकण्याची अपेक्षा करू लागलो. पण व्यर्थ! मला आठवायला पाहिजे होते, की हेमलॉक जोन्स घुमा होता. मी त्याला तो मनुष्य इथे कसा घुसला, त्याबद्दल सांगितले. पण तो नुसता हसला.

नंतर जेव्हा मी जायला उठलो, तेव्हा तो माझ्याकडे खेळकर नजरेने पहात बोलला, “जर तू विवाहित माणूस असशील, तर तू तुझ्या शर्टाची बाही झटकल्याशिवाय घरी जाऊ नकोस, असा मी तुला सल्ला देईन. त्यावर तुझ्या पुढील हातावर कपड्याचे तपकीरीसर सोनेरी केस लागलेले आहेत. तू एखाद्या फरच्या कोटाला जोराने स्पर्श केला असावास.”

मी विजयोन्मादाने म्हणालो, “एकदा तू चुकतो आहेस. तो केस माझाच आहे, हे तुला कळेल. मी आताच न्हाव्याकडे जाऊन आलो. आणि हा हात ॲप्रनच्या बाहेर होता.”

तो थोडासा हसला. तथापि, मी जाऊ लागल्यावर, त्याने मला उबदार मिठी मारली --- त्या थंड माणसाचे हे क्वचितच दिसणारे वागणे होते. त्याने मला माझा मोठा कोट घालायलाही मदत केली. माझे खिसे ओढले व पुन्हा झटकून नीट केले. त्याने माझे हात कोटाच्या आत गेले आहेत ना, हेदेखील, कोटाची बाही हलवून, बोटांनी चाचपून बघितले.

माझ्या पाठीवर थोपटत, तो म्हणाला, “लवकर परत ये.”

मी उत्साहाने म्हणालो, “कधीही आणि नेहमी. फक्त मी दिवसातून दोनदा दहा मिनिटे माझ्या कार्यालयात पाव खाण्यासाठी मागेन व रात्री चार तासांची झोप मागेन. बाकीचा सर्व वेळ मी नेहमी तुझ्यासाठी देऊ शकतो, हे तुला माहिती आहे.”

अनाकलनीय हसू हसत तो बोलला, “हे खरे आहे.”

पण पुन्हा मी जेव्हा त्याला फोन केला, तेव्हा तो घरी नव्हता. एका दुपारी माझ्या घराजवळ, मला तो त्याच्या आवडत्या वेषात भेटला --- लांब, निळा कोट, पट्ट्यांपट्ट्यांची पँट, मोठी दुमडलेली कॉलर, काळा चेहरा व  पांढरी टोपी.

इतरांसाठी ते वेषांतर बेमालूम होते. पण मला ते माहिती होते. मी त्याला ओलांडले --- आमच्यातील सामंजस्य कराराप्रमाणे, मी त्याच्याकडून नंतर त्याचे स्पष्टीकरण मिळवणार होतो. दुसऱ्या वेळी मी पूर्वेच्या टोकाला एका दारुच्या गुत्त्यातील मालकाच्या बायकोची व्यावसायिक भेट घ्यायला चाललो होतो. मी त्याला मोडून पडलेल्या हस्तोद्योग करणाऱ्या माणसाच्या वेषात पाहिले. तो शेजारी पैसे कर्जाऊ देणाऱ्याच्या दुकानाच्या खिडकीत वाकून बघत होता. तो माझ्या सूचना पाळत असल्याचे बघून, मला आनंद झाला. त्या आनंदात मी त्याला डोळा मिचकावून दाखवले. त्याला धूसर प्रतिसाद मिळाला.

दोन दिवसांनी मला त्याच्या घरी रात्री बोलावणारी एक चिठ्ठी मिळाली. ते भेटणे, अरेरे! तो माझ्या आयुष्यातील संस्मरणीय प्रसंग होता आणि ती माझ्या आयुष्यातील हेमलॉक जोन्सला भेटण्याची शेवटची वेळ होती! त्याच्या आठवणींनी माझ्या धमन्या अजून टरारून उठतात. पण मी ते सर्व शांतपणे घ्यायचा प्रयत्न करतो.

मी त्याला शेकोटीसमोर उभे असलेले पाहिले. आमची ओळख झाल्या पासून त्याच्या चेहऱ्यावर असे भाव मी एकदोनदाच पाहिले होते. ते उद्‌गामी व अवगामी पद्धतीचे पूर्णपणे एकमेकांशी संबंधित विचारमंथन होते. त्यात मानवाच्या नाजूक भावभावनांना वा सहानुभूतीला थारा नव्हता. तो बर्फाचा थंडगार गोळा होता. खरेच, मानसिक संकुचित्वामुळे त्याचे सर्वस्व इतके एकवटले होते, की

त्याचे कपडे त्याला सैल होऊ लागले होते आणि डोक्यावरची टोपी कपाळावरून मागे सरकली होती व मोठ्या कानांवर लोंबत होती.

मी आत शिरल्यावर त्याने दार बंद केले. खिडक्या घट्ट लाऊन घेतल्या आणि धुराड्यासमोर खुर्ची ठेवली. मी मोठी रुची घेऊन, हा विशेष बंदोबस्त पहात होतो. त्याने अचानक पिस्तुल काढले आणि आणि ते माझ्या कानशिलावर रोखून, खर्जातील थंडगार आवाजात बोलला, “सिगरेट केस परत दे.”

मी घाबरलो होतो, तरी माझे उत्तर खरे व तडकाफडकी दिलेले व उस्फूर्त होते. मी म्हणालो, “माझ्याकडे ती नाही.”

तो कटूपणे हसला व पिस्तुल खाली टाकले. “याच उत्तराची मला अपेक्षा होती, तर मग आता मला तुला समोरासमोर आणून काही भयानक, मरणांतिक, सतत चालणारे, तुझी खात्री पटवणारे व त्या शस्त्रापेक्षा खात्रीने मरण देणारे काही करू दे --- तुझा गुन्हा सुचवणारे, उद्गामी व अवगामी पद्धतीचे पुरावे मला समोर आणू देत!” त्याने त्याच्या खिशातून एक वही आणि कागद काढला.

मी धापा टाकत बोललो, “पण तू खात्रीने थट्टा करतो आहेस. तू क्षणभरदेखील असा विश्वास ठेऊ शकत नाहीस --- “

“गप्प राहून, खाली बस.”

मी आज्ञा पाळली.

तो थंडपणे व मुद्दामून बोलला, “माझ्या कृत्यांवर तू अमान्यता दाखव. अनेक वर्षे तुला ती माहिती आहेत. तू त्यांची टाळ्या वाजवून स्तुती केलेली आहेस आणि संमतीदेखील दर्शवलेली आहेस. तू मागे जाऊन, जरा आठवून बघशील का, की तू पहिल्यांदा केव्हा ती सिगरेट केस पाहिलीस? तुझी

प्रतिक्रिया.” त्याची वही पहात तो म्हणाला, “तुझे उद्‌गार ऐक --- ‘किती छान आहे! ही माझी असती तर!’ हे तुझे गुन्ह्याच्या दृष्टीने पहिले पाऊल होते --- आणि माझे पहिले पुरावा दर्शवणे. ‘ही माझी असती तर!’ पासून ‘मी ही माझी करेन.’ पर्यंतचा प्रवास! ‘ही मी माझी कशी बनवेन?’ हा सहज झालेला प्रवास. शांत बस. माझ्या पद्धतीप्रमाणे, गुन्ह्याकडे नेणारी अत्यंत हर्षभरित प्रवृत्ती! ते तू केलेले किरकोळ वस्तूचे अपवित्र कौतुक पुरेसे नव्हते. तू सिगरेट ओढतोस.”

मी भावनातिरेकाने ओरडलो, “पण मी तुला सांगितले आहे, की मी सिगरेट ओढणे सोडून दिले आहे.”

तो थंडपणे बोलला, “छट्! हे तू दुसऱ्यांदा सांगतो आहेस. अर्थात तू आधीही सांगितले होतेस. तुझ्यावरील आरोप अमान्य करण्यासाठी, मी विचारले नसतानाही, तू ठळकपणे तयार करून ते वाक्य पुढे ठेवलेस. तरीही मी आधी म्हटल्याप्रमाणे, तुझे काळे धंदे पुसून टाकण्यासाठी, केलेला तो दुर्दैवी प्रयत्न पुरेसा नव्हता. तुझ्यासारख्या माणसाने कुठल्या उसळणाऱ्या, करायला लावणाऱ्या हेतूने हे केले, हे मला अजून शोधून काढायचे आहे. प्रेम --- हा सर्वात बळकट हेतू मला सर्व कृत्यांमध्ये दिसला. मला वाटते, तू त्याला प्रेमच म्हणणार.” तो कटूपणे म्हणाला. “तुझ्या बाहीवर याचा सर्वात मोठा मला निष्कर्षाप्रत आणणारा पुरावा आहे.”

मी किंचाळत ओरडलो, “पण --- “

त्याने गर्जना केली, “शांतता! तू काय बोलणार, हे मला माहिती आहे. तू म्हणणार की तू जरी फरकोटातील तरुण व्यक्तीला आलिंगन दिले असलेस, तरी

त्याचा चोरीशी काय संबंध आहे? मग मला तुला सांगू दे की फरकोट फक्त तुझ्या त्याच्या गुण आणि चारित्र्याशी दुर्दैवी लागते असणे दाखवते. तू तुझा मान त्यासाठी विकला आहेस. तो फरकोट घालणाऱ्या माणसाने तुझ्याकडून ती सिगरेट केस खरेदी केली आहे.

"तुझा हेतू उघड केल्यावर, आता मी प्रत्यक्ष गुन्ह्याकडे वळतो. सामान्य लोकांनी त्यापासून सुरवात केली असती --- व नंतर हेतूचा शोध घेत बसले असते. माझी पद्धत अशी नाही."

त्याचा युक्तिवाद इतका जोरदार होता, की मला मी निष्पाप असल्याचे माहिती असूनसुद्धा, मी माझे ओठ शिवले व माझ्या [न केलेल्या गुन्ह्याचे] पुढील वर्णन ऐकायला उत्सुकतेने तयार झालो.

"मी तुला ज्या रात्री ती सिगरेट केस दाखवली, त्याच रात्री तू गुन्हा केलास. मी निष्काळजीपणे ती खणात टाकली. तू त्या खुर्चीत बसला होतास आणि त्या मांडणीतून काहीतरी घ्यायला उठायचे ठरवलेस. पण न उठता, त्या क्षणी तू चोरलेला ऐवज सुरक्षित केलास." शांतता! "पुढील रात्री मी तुला मोठा कोट घालायला मदत केली, ते तुला आठवते का? तुझ्या हात त्याच्या आत जाण्यासाठी मी मदत करत होतो. असे करतांना मी स्प्रिंग टेपने खांद्यापासून शर्टाच्या कफपर्यंत तुझा हात मोजला. नंतर शिंप्याला भेट दिल्यावर माझे मोजणे बरोबर असल्याचे नक्की झाले. ते अंतर बरोबर तुझ्या खुर्चीपासून त्या खणापर्यंतचे होते!"

मी अवाक् झालो.

बाकीचे फक्त पुराव्याचे आधार असलेल्या गोष्टी होत्या. तू परत खणाशी

काही लुडबुड करताना मला सापडलास. दचकू नकोस. मफलर घालून खोलीत शिरलेला परका माणूस मीच होतो. अजून मी काय केले, तर तुला एकट्याला खोलीत ठेऊन, खणाच्या मुठीला थोडा साबण फासून ठेवला. आपण वेगळे झालो, तेव्हा तुझ्या हाताला साबण लागलेला होता. पुढचा काही सुगावा लावण्यासाठी, तू झोपला होतास, तेव्हा मी हळूच तुझे खिसे तपासले. तू जाऊ लागलास, तेव्हा मी तुला मिठी मारली --- ते अशा चाचपण्यासाठी होते, की तू अंगावर कुठे ती सिगरेट केस लपवली तर नाहीस ना. यामुळे माझी खात्री झाली, की तू आधीच ती कुठेतरी ठेऊन दिली असणार कारण तुझा हेतू ती चोरण्याचा होता. अजून मला विश्वास वाटतो, की तुला पश्चात्ताप होत असणार आणि तू ती कुठे लपवली आहेस, याची कबुली देशील. मी दोनदा तुला मी तुझ्या मागावर असल्याचे जाणून घेण्याची, संधी दिली. एकदा निग्रोचे विशेष प्रकारचे कपडे घालून आणि दुसऱ्यांदा एका कर्ज देणाऱ्या दुकानदाराच्या खिडकीत डोकावून, जिथे तू तुझा चोरीचा माल दिलास.”

मी ओरडलो, “पण, जर तू त्या दुकानदाराला विचारले असतेस, तर तुला समजले असते की ती किती अन्याय --- “

तो जोरात ओरडला, “मूर्खा, ती तुझी सूचना होती --- ते दुकान शोधण्याची. तुला असे वाटते का, की मी तू दिलेल्या सूचना पाळेन? एका चोराने दिलेल्या! उलट त्यांनी मला सांगितले, की मी कुठल्या गोष्टी टाळायला पाहीजेत.”

मी कटूपणे बोललो, “आणि समजा, तू तुझा खणदेखील तपासला नसतास तर?

तो शांतपणे म्हणाला, “नाही.”

मी पहिल्यांदाच चिडलो. मी जवळच्या खणाशी जाऊन तो जोराने बाहेर ओढला. तो पूर्वीप्रमाणेच अडकला. त्याचा अर्धा भाग बंदच राहिला. थोडी खटपट करून, माझ्या लक्षात आले, की खणाच्या वरील भागात काहीतरी अडकले होते आणि ते मुळीच हलत नव्हते. ती तीच ती हरवलेली सिगरेट केस होती. मी आनंदाने ओरडत त्याच्याकडे वळलो. पण त्याच्या चेहऱ्यावरील भाव बघून, मला दुःख झाले. त्याच्या भेदक, एकटक नजरेमध्ये आता मी नगण्य किमतीचा असल्याची भावना दिसून येत होती. तो हळूच बोलला, "माझा गैरसमज झाला. मी तुझ्या भित्र्या स्वभावाला व अशक्तपणाला गृहीत धरले नाही. तुझ्या गुन्हा करण्यात मी तुला फार उंचीचा समजलो. पण आता मला समजले, की त्या रात्री तू त्या खणाशी का खटपट करत होतास. काही अस्पष्ट अशा साधनाने --- बहुतेक दुसऱ्या चोरीसाठी --- तू कर्ज देणाऱ्याच्या दुकानातून सिगरेट केस बाहेर काढलीस व एखाद्या चाबकाचा मार खाल्लेल्या राक्षसाप्रमाणे गुपचूप, वेड्यावाकड्या पद्धतीने परत खणात ठेऊन दिलीस.

तू हेमलॉक जोन्सला फसवायला बघितलेस. शिवाय माझी न चुकायची शक्यता तू नष्ट केलीस. जा! मी तुला स्वातंत्र्य देतो. शेजारील खोलीत थांबलेल्या तीन पोलिसांना मी बोलावत नाही. पण माझ्या दृष्टीसमोरून कायमचा नाहीसा हो!"

परत एकदा मी विचार करू शकत नसल्यासारखा व जमिनीत गाडला गेल्यासारखा उभा राहिलो. त्याने मला कानाला घट्ट धरून, हॉलमध्ये नेले आणि दार लावले. ते परत सताड उघडले व त्याने माझी टोपी, मोठा कोट, छत्री आणि बूट बाहेर फेकून दिले आणि दार माझ्यासाठी कायमचे बंद केले.

त्यानंतर मी त्याला कधीच भेटलो नाही. तरीपण मला हे सांगितले पाहिजे, की त्यानंतर माझा व्यवसाय वाढला. मी माझी प्रॅक्टीस सुधारली आणि माझे काही रुग्ण बरेही झाले. मी श्रीमंत झालो. मी पश्चिमेकडे घर घेतले व बग्गीही घेतली. पण मला विचार केल्यावर, त्या नवलपूर्ण माणसाच्या अंतर्दृष्टीचे व भेदकतेचे नेहमी आश्चर्य वाटते. जर मी कधी जागृतावस्थेत नसतो, तरीही खरेच त्याची सिगरेट केस मी चोरली नसती.

# The Beauty Mask

# सुंदर चेहरेपट्टी

By

ARTHUR B. REEVE



“ओहो, मिस्टर जमेसन, जर ते फक्त तिला उठवू शकले तर --- काय झाले आहे, ते शोधता येईल. काहीतरी करा! हा संशय मला आणि आईला दोघीनाही मारतो आहे.”

ही एक रुचीपूर्ण गोष्ट आहे हे लक्षात आल्यामुळे, ‘माझे शहर’ च्या संपादकाने मला हे काम दिले होते. माझे काम एवढेच होते, मॉर्निंग स्टारमधील दोन परिच्छेदांवरून ही बातमी तयार करायची.

***व्हर्जिनिया ब्लॅकले ही एकोणीस वर्षांची रिव्हरसाईड रस्त्यावर रहाणाऱ्या मिसेस ब्लॅकले यांची मुलगी, सहा दिवस कोमात आहे --- ती***

***शुद्धीवर येण्याचे काही चिन्ह नाही.***

***सोमवारपासून कुटुंबातील कोणी ना कोणी व्यक्ती सतत तिच्या शेजारी आहे. तिच्या आईने व बहिणीने, दोघींनीही सतत तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे. पण तिच्याकडून काही म्हणावा असा, प्रतिसाद मिळत नाही आहे. कुटुंबाचे डॉक्टर, डॉक्टर कॅलव्हर्ट हेनेस आणि खूपसे विशेषज्ञ या विचित्र आजाराने गोंधळून गेले आहेत***.

मरण आणि रोग या सारख्या नकोशा विषयातील झोपेबद्दल मी ऐकले होते. पण मी अशी पहिलीच केस हाताळत होतो आणि ती मिळाल्याने मला आनंद झाला होता.

सगळ्यांना माहिती होते त्याप्रमाणे, स्टुअर्ट ब्लॅकलेपासूनच्या सर्व मंडळींनी वारसाहक्काने न्यूयॉर्कच्या वरच्या भागातील जमिनींच्या व्यवहारामधील चांगले भाग्य मिळवले होते आणि त्यांच्या आईच्या मृत्युनंतर व्हर्जिनिया आणि सिंथिया या दोन मुली वारसाहक्काने शहरातील सर्वात श्रीमंत मुली ठरल्या असत्या.

त्या हडसनच्या समोरील मोठ्या दगडी घरात रहायच्या. काही कारणाने मी चुकून, त्यांना माझे कार्ड पाठवले. मिसेस ब्लॅकले व तिची मुलगी, दोघी मला त्यांच्या स्वागतकक्षात भेटल्या. मी कार्डावर काय लिहिले होते, त्याचा त्या कदाचित विचार करत असाव्यात, की मला त्याना काही मदत करायची असावी.

मिसेस ब्लॅकले ही मध्यम वय उलटलेली, नीटनेटकी पण फार उदास स्त्री होती. मी माझे काम काय आहे, ते सांगितल्यावर, ती उद्गारली, “सिंथिया, हा अजून एक वार्ताहर आहे. नाही, मी काही बोलू शकत नाही --- एकही शब्द नाही.

मला काही माहिती नाही. डॉक्टर कॅलव्हर्ट हेनेस यांना भेटा.

"मी --- "

सिंथिया  मध्येच म्हणाली, "पण आई, जरा शांतपणे घे. व्हर्जिनियाच्या आजारपणाची बातमी वर्तमानपत्रात छापून आली आहे. त्यांच्यापैकी कुणाला काही उपाय माहिती असू शकतो. कोणी सांगावे?"

पण तरी मिसेस ब्लॅकले म्हणाल्या, "तरीही मी काही सांगू शकत नाही. मला ही प्रसिद्धी आवडत नाही. तुमच्या गरीब बिचाऱ्या वडिलांसाठी या वर्तमानपत्रांनी त्रास देण्याशिवाय काही केले होते का? नाही, मी काहीही बोलणार नाही. त्याने काहीही चांगले होणार नाही. आणि सिंथिया, तूदेखील काळजी घेतलेली बरी."

मिसेस ब्लॅकले यांनी दाराकडे पाठ फिरवली. पण तिच्या आजारी बहिणीपेक्षा काही वर्षांने मोठ्या असलेल्या सिंथियाने नक्कीच सुटवंगपणा हासील केला होता. निदान ती एका सामान्य वार्ताहराला सहन करू शकत होती, जो माझ्याहून जास्त टाळण्यासारखा वाटत नव्हता.

मी विनंती केली, "अशी शक्यता आहे की अशा केसेसची माहिती असणारे कुणी ते वाचेल."

तिची आई निघून गेल्यावर ती देखील कां कू करू लागली. तिने माझ्याकडे क्षणभर पाहिले मग तिने स्वतःला सावरले आणि मी आधीच सांगितलेली तिची विचित्र मागणी माझ्यासमोर मांडली.

तिच्या भावनांचा निचरा होण्यासाठी तिला कुणा बाहेरच्या माणसाबरोबर बोलायचे होते. स्वागतकक्षात जणु काही मी अगदी योग्य वेळी आलो होतो.

आम्ही उभे असतांना चाणाक्षपणे इकडचे तिकडचे काही प्रश्न विचारतांना मला यशस्वीपणे गोष्ट मिळू शकली. ती बातमीपेक्षा मानवामध्ये रस घेणारी होती. मी व्हर्जिनियाचा, ती कोमात जाण्यापूर्वीचा एक फोटोही मिळवू शकलो.

थोडक्यात तिच्या बहिणीने सांगितल्याप्रमाणे, तरूण असलेल्या व कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या हॅम्पटॉन हेनेसशी, व्हर्जिनियाचा साखरपुडा झाला होता. ते तेच कॉलेज होते, जिथे त्याचे वडील हृदयरोग विभागात प्राध्यापक होते. ते कुटुंब दक्षिणेकडील प्रसिद्ध कुटुंब होते. ते युद्धातून कधीच सावरले नाही व शेवटी न्यूयॉर्कला रहायला गेले. माझ्या माहितीप्रमाणे, वडील, डॉक्टर कॅलव्हर्ट हेनेस, हे औषधशास्त्र विषयातील तज्ञ होतेच, पण ते ब्लॅकले कुटुंबाचे घरचे डॉक्टर होते. सिंथिया ब्लॅकले म्हणाली, “दोनदा लग्नाची तारीख ठरवली गेली. पण नंतर पुढे ढकलली गेली. काय करावे, हे आम्हाला समजत नव्हते आणि हॅम्पटॉन काळजीत पडला होता.”

मी विचारले, “म्हणजे ही कोमात जाण्याची दुसरी वेळ होती?

“हो. काही आठवड्यात. पण दुसऱ्यांदा ती फार दिवसांची नसून, एखाद्या दिवसाची होती.”

हे ती चाचरत बोलली. मी तिकडे लक्ष दिले नाही. एक तर तिला वाटले असणार, की या सर्वामागे काहीतरी जास्त असले पाहिजे. किंवा तिला आईने सांगितलेले आठवले, की वार्ताहरांशी जास्त बोलून काही उपयोग नाही. तिला कळत नव्हते, की ती फार बोलली, की काय!

आधीचे स्पष्टीकरण लक्षात घेऊन, मी घाईघाईने पण मुद्दाम विचारले,

“यामागे काही वेगळाच हात असल्याची भीती तुम्हाला वाटते आहे

का?”

सिंथिया ब्लॅकलेने तिची आई गेलेल्या दाराकडे पाहिले. ती भीतीने थरथरत उत्तरली, “मला माहिती नाही. मी तुमच्याशी का बोलते आहे, मला कळत नाही. मी इतकी घाबरले आहे, कारण वर्तमानपत्रे काही नको ते छापतील.”

मी रेटा देत, तिच्या डोळ्याशी डोळा भिडवत म्हणालो, “जर मी मला समजलेली गोष्ट मागे घ्यायचे ठरवले, तर तुम्ही मला खरे काय ते सांगाल का?”

ती हलक्या आवाजात उत्तरली, “हो, पण --- “ आणि मग थांबली.

मी विनंती केली, “मी माझ्या मित्राला, विद्यापीठातील प्राध्यापक केनेडी यांना इथे बोलावतो. तुम्ही त्यांना ओळखता का ?”

तिने उत्सुकतेने विचारले, “ते येतील?”

तिने अजून काही म्हणायच्या आत, मी स्वागतकक्षातील फोन उचलून, आश्वासन दिले, “नक्की.”

चांगल्या नशीबाने मला क्रेग प्रयोगशाळेत भेटला आणि घाईघाईने उचारलेले काही शब्द, त्याची रुची वाढवण्यासाठी पुरेसे ठरले. सिंथिया उद्दीपित होत, ओरडत बोलली, “मला आईला सांगायला पाहिजे. नक्कीच ती काही हरकत घेणार नाही. तुम्ही इथे थांबाल का?”

मी क्रेगसाठी थांबलो असतांना, जरी मला त्यासंबंधी फारसे काही माहिती नसले, तरी मी ती केस सोडवण्याचा विचार करू लागलो. मला खात्री वाटू लागली, की मी चूक करत नसून, यात काही गूढ असावे.

अचानक मी सावध झालो. दोन स्त्रिया पुढील खोलीत बोलत होत्या. जरी ऐकू येण्यासाठी तो आवाज फार हळू होता, तरी एवढे नक्की होते, की सिंथियाला

तिच्या आईचे मन वळवायला त्रास होत होता, की सर्व काही ठीक होईल. मिस ब्लॅकले इतकी का घाबरत होती? बहुधा तो नुसता नकोसा खोडसाळपणा होता. एखाद्याला असे वाटणे साहजिक आहे, यात तिला कोणाचा तरी संशय येतो आहे. तिला तो कोण तेदेखील माहिती आहे पण ती सांगू शकत नाही. तिची मुलगी शुद्धीवर येण्याव्यतिरिक्त ते काहीतरी आहे. मला वाटते, ती स्वतः गोंधळलेली होती.

काही मिनिटात माझ्याकडे येत सिंथिया पुटपुटली, “बिचारी माझी आवडती आई! तिला काय हवे आहे, हे तिला समजत नाही --- फक्त आमची व्हर्जिनिया आधी जशी होती, तशी आम्हाला परत मिळाली पाहिजे, एवढेच ती जाणते.”

आम्हाला क्रेगसाठी फार वेळ थांबावे लागले नाही. मी फोनवर बोललो, तेवढे शब्द त्याची रुची वाढवण्यासाठी पुरेसे ठरले होते. मिसेस ब्लॅकले व सिंथिया दोघीही पहिल्यांदा थोड्या घाबरत, पण नंतर त्याच्या वागण्याने आश्वासितपणे त्याला भेटल्या. मी वचन दिल्याप्रमाणे त्यातील काहीच आमच्या वर्तमानपत्रात जाहीर केले नाही. ते अरुचीपूर्ण ठरले असते.

मिसेस ब्लॅकले दबलेल्या भावनेने किंचाळल्या, “ओहो, कुणीतरी माझ्या लहानशा मुलीला ती होती तशी परत केले, तर!” आणि सिंथियाबरोबर वरच्या मजल्यावर निघून गेल्या.

माझा या प्रकरणाबद्दल काय ग्रह झाला, हे मी क्षणभर क्रेगला एकट्याला स्पष्ट केले. पण तेव्हढे पुरेसे होते.

तो कुजबुजला, “तू मला बोलावलेस, म्हणून मला आनंद झाला. यात

काही विचित्र आहे.”

आम्ही त्यांच्याबरोबर भिंतीवर फुले काढलेल्या, छोट्याशा छान झोपायच्या खोलीपर्यंत गेलो. तिथे व्हर्जिनिया ब्लॅकले झोपत असे आणि तिथे आम्ही पहिल्यांदा तिला पाहिले. लहानशा पलंगाजवळ केनेडीने त्याची खुर्ची ओढून घेतली आणि तो स्वतः डॉक्टर असल्यासारखा तिला तपासू लागला.

ती कुठल्या परिस्थितीत होती, हे थोडेसे मला जाणवले तसे व नंतर तिने मला जसे सांगितले तसे, मी तुम्हाला सांगतो.

ती तिथे आळसटल्यासारखी, जेमतेम श्वासोच्छवास करत झोपली होती. एकेकाळी ती गोरी, उंच, बारीक व रानटी डौल असलेली होती. पण आता ती पूर्णपणे बदलली होती. माझ्या खिशातील फोटोमधील ती आणि तिचे आताचे दिसणे, यातील फरक जाणवल्याशिवाय मला राहवेना.

तिचा फक्त श्वासोच्छवासच मंद नव्हता, तर तिची नाडीही जेमतेम लागत होती. मिनिटाला चाळीसपेक्षाही कमी होती. तिचे तापमान सामान्यपणे असते, त्यापेक्षा खूप कमी होते आणि रक्तदाब कमी होता. एके काळी ती जाणीवपूर्वकपणे पूर्ण वाढ झालेली, सुदृढ स्त्री दिसायची. पण आता तिच्यात वर्णन करण्यास कठीण असा काही विचित्र बदल झालेला दिसत होता. आता ती तरुण स्त्री नव्हती, असे नाही. पण लैगिक दृष्ट्या ती तशी वाटत नव्हती. जशा काही तिच्या दुय्यम लैगिक गुणांना ती दुरावली होती. पण बरा शब्द --- तृतीयपंथी!

सांगायला विचित्र, आळसटल्यासारखी असली, तरीही खायला काही तयार गोष्टी तरी लागत होत्या. ती पडत नव्हती. पण ती थुलथुलीत व पोकळ दिसत होती व एकंदरीत चयापचयाचा वेग कमी झालेला दिसत होता, तरी तो

गुंगीच्या झोपेमुळे असावा. खरे तर तिचे वजन वाढत होते!

त्याला या गोष्टी एकापाठोपाठ एक अशा लक्षात आल्या. केनेडी तिच्याकडे खूप वेळ काळजीपूर्वक बघत होता. मी त्याची नजरेची दिशा धुंडाळत होतो. तिच्या नाकाच्या वरती, भुवयांच्या वर एक विशिष्ट अशी सुजलेली लाल खूण होती. ती बरी होण्यास कठीण वाटत असून, तिला उणेपणा आणत होती.

शेवटी त्याने मिसेस ब्लॅकलेला विचारले, "हे काय आहे?"

ती हळू आवाजात उत्तरली, "मला माहिती नाही. आम्हाला सर्वांना ती दिसते आहे. ती असली झोप सुरु झाल्यावरच आली आहे."

ती कशामुळे आली असावी, असे तुम्हाला वाटते?"

तिने कबूल केले, "व्हर्जिनिया व सिंथिया या दोघीही चेहरा विषेतज्ञाकडे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवण्यासाठी जात होत्या. काही परिणाम होण्यासाठी त्या नंतर चेहरा मास्कने झाकत असत. मला माहिती नाही, हे त्यामुळे तर नसेल?"

केनेडीने सिंथियाच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिले. तिच्या चेहऱ्यावर लाल खूण नव्हती. पण आता दोघींपैकी कुणाच्याही चेहऱ्यावर सुरकुत्या नक्कीच नव्हत्या.

सिंथिया बचाव करत बोलली, "आई, हे डॉक्टर चॅपेलचे काम नसणार."

केनेडी उद्गारला, "डॉक्टर चॅपेल?"

मिसेस ब्लॅकले बोलली, "हो, डॉक्टर कार्ल चॅपेल. कदाचित तुम्ही त्याचे नाव ऐकले असेल. पंधराव्या रस्त्यावर त्याचे सौदर्य पार्लर आहे. तो --- "

सिंथिया तिचे बोलणे तोडत म्हणाली, "हे काहीतरीच आहे. कार्ल

म्हणाला होता, माझा चेहरा व्हर्जिनियापेक्षा वाईट आहे आणि म्हणून त्याच्यावर परिणाम व्हायला वेळ लागेल.”

“सिंथियाकडे माझे लक्ष होते. डॉक्टर चॅपेल तिच्यासाठी फक्त सौदर्यवृद्धी करणारा नसून, काही जास्त वाटत होता.”

केनेडीने विचारपूर्वक सिंथियाच्या सुंदर त्वचेवरून, व्हर्जिनियाच्या लाल खुणेकडे कटाक्ष टाकला.

जरी तो काही बोलला नाही, तरी मला त्याचे मन त्या गोष्टीत असल्याचे जाणवत होते. मला असे सौदर्य डॉक्टर्स माहिती होते, की जे तुमची त्वचा बाळासारखी एकदम स्वच्छ व मृदुमुलायम करून देण्याची हमी देत. सहसा त्यांच्या अननुभवी मलमामुळे व रसायनांमुळे त्या स्त्रियांची त्वचा ते जन्मभरासाठी, उलट आहे त्यापेक्षा खराब करत असत. ही अशा प्रकारची केस होती का? पण मग सिंथियाच्या सुंदर त्वचेचे काय?

मोठी बहीण मात्र सौदर्य डॉक्टरचे नाव काढताच चमकली व ते तिने न लपवता दाखवले. केनेडीने त्याची मनात नोंद घेतली पण काही बोलला नाही.

केनेडी उठत, विषय बदलत बोलला, “मला वाटते, मी डॉक्टर कॅलव्हर्ट हेनेसना भेटलो, तर तुमची काही हरकत नसावी.”

मिसेस ब्लॅकले जोर देत बोलली, “काहीच हरकत नाही. जर त्यामुळे व्हर्जिनियाला यातून बाहेर पडायला मदत होणार असेल --- ते सुरक्षित असेल --- तर मला तुम्ही ते केलेले आवडेल.”

आम्ही निघालो, तेव्हा सिंथिया शांत होती. डॉक्टर चॅपेल यांचे नाव या केसमध्ये निघेल, असे तिला वाटले नव्हते.

नशीबाने आम्हाला डॉक्टर कॅलव्हर्ट हेनेस घरीच सापडले. हा त्यांचा नेहमीचा कामाचा वेळ नव्हता. केनेडीने स्वतःची ओळख ब्लॅकले कुटुंबाचा मित्र, अशी करून दिली. मी स्टार वर्तमानपत्रात ही गोष्ट जाहीरपणे न मांडण्याची दक्षता घेणार असल्याची ब्लॅकले कुटुंबाने खात्री केली होती. डॉक्टर हेनेसने अजून काही स्पष्टीकरण मागितले नाही.

तो साधारण साठीचा मनुष्य होता. एका डॉक्टरसाठी महत्वाचा असलेला आत्मविश्वास जिंकायचा गुण त्याच्यात होता. तो श्रीमंत तर होताच, पण त्याच्या व्यवसायात त्याचे चांगले नाव राखून होता.

जसे केनेडीने आमचा इथे येण्याचा उद्देश सांगून संपवला, तसे डॉक्टर चॅपेलने खोल उसासा टाकत, मान हलवली.

तो म्हणाला, "मला ब्लॅकले कुटुंबाबद्दल काय वाटते, ते तुम्हाला समजेल. कुठल्याही परिस्थितीत --- विशेषतः आताच्या परिस्थितीत मला माझी मुलाखत घेतली जाणे अनैतिक वाटते."

केनेडीने ज्या कामाला सुरवात केली होती, त्याला अनुलक्षून, मी म्हणालो, "तरीही आम्हाला सरळ मार्गाने चालण्यासाठी थोडेफार काही सांगितलेत तर काही नुकसान होईल, असे मला वाटत नाही. मी तुम्हाला काही आग्रह करणार नाही."

आम्हाला आमच्या कल्पनेवर सोडून देण्यापेक्षा, काही बोलणे बरे, हे त्याला समजले.

त्याने सुरवात केली, "ठीक आहे. अशा झोपेची नेहमीची कारणे मी आजमावून बघितली आहेत. हे काही आपोआप सुचणारे किंवा भानवर नसणे

नाही. मी आशावादी विचार करणारा आहे. इथे काही फीट येण्याचा प्रकारही दिसत नाही. हे विषबाधेमुळे झाले असावे, समजलात का?"

मी सहजपणे न समजल्याचे कबूल केले.

ते म्हणाले, "तसे नव्हे. आम्ही याला मेंदूवर परिणाम करणारे जुनाट नसांचे दुखणे, नार्कोलेप्सी  म्हणतो --- झोपाळूपणाचे रोगनिदानशास्त्र --- अचानक आवरता येणार नाही इतकी झोप येणे. काही वेळा हे सातत्याने होते वा कधी ठराविक कालावधीने होते. मला हा आजार झटका आल्याने, फीट आल्यामुळे वा जंतुंमुळे होणारा आजार वाटत नाही. सद्‌गृहस्थहो, याचे साधे कारण मला किंवा माझ्या कुठल्या मित्रांना जराही माहिती नाही. तरीही --- "

ही काही रोग्यांशी सल्लामसलतीची वेळ नव्हती. त्यामुळे दार उघडले आणि एक, अस्वस्थ चेहऱ्याचा, उंचनिंच व धट्टाकट्टा पण पोरकट माणूस आत शिरला.

डॉक्टरांनी ओळख करून दिली, "माझा मुलगा. थोडेच दिवसात हा आमच्या हेनेज कुटुंबाच्या मालिकेतील सहावा डॉक्टर होईल."

आम्ही हातमिळवणी केली. सिंथिया अजिबात अतिशयोक्ती करत नव्हती, जेव्हा ती असे म्हणत होती की त्याच्या नियोजित वधूला जे काही झाले त्यामुळे तो फारच काळजीत पडला होता. आमच्या भेटीबद्दल परत सगळे सांगणे काही अवघड नव्हते. हळूहळू मी बोलण्यात केनेडीलाच पुढाकार घ्यायला लावले, जेणेकरून आमची बाजू चुकीची दिसू नये.

व्हर्जिनियाच्या चेहऱ्यावर असलेल्या लाल खुणेवर क्रेगने एक शेरा मारण्याच्या बऱ्याच पूर्वी तरुण हॅम्पटन उद्दीपित झाल्यासारखा वाटत होता.

त्याचे वडील जगातील इतर कुणाहीपेक्षा त्यांच्या लाडक्या असलेल्या त्या तरुणाकडे उदारपणे पहात बोलले, “मी साहजिकच त्याच्याकडे एका प्रेमिकापेक्षा एक डॉक्टर म्हणून बघत होतो. मी त्याला प्रेमिक म्हणून बघू शकत नव्हतो. खरेच ही केस मी ऐकलेल्या केसेसमधील फारच उल्लेखनीय म्हणावी लागेल.”

तो तरुण त्याच्या वडिलांकडे वळत, मध्येच बोलला, “त्या सौदर्य डॉक्टरला तुम्ही भेटला आहात का?”

क्रेगने गुळमुळीतपणे विचारले, “कार्ल चॅपेल नावाच्या सौदर्य डॉक्टरबद्दल तुम्ही ऐकले असेल?”

“मला वाटते, खरे तर तो सिंथियाशी लग्न करणार आहे.” हॅम्पटन उद्दीपित झाल्यासारखा वाटला. त्याच्या बोलण्यात छुपे शत्रुत्व दिसत होते आणि असे का असावे, याबद्दल मी मनाशी नवल करत होतो. यामागे सुप्त असूया असावी का?

डॉक्टर हेनेस शांतपणे बोलले, “तुम्हाला असे म्हणायचे आहे --- की या डॉक्टर चॅपेलने --- “

तो केनेडीने पुढाकार घेण्यासाठी थांबला.

केनेडीने प्रश्न केला, “मला वाटते, तुम्ही मिस ब्लॅकलेच्या नाकावरील लाल खूण पाहिली असेल?”

डॉक्टर हेनेस बोलले, “हो, तो डाग चकाकतोदेखील.” एव्हाना हॅम्पटन फारच उद्दीपित झाल्यासारखा वाटत होता. त्याने प्रश्न केला, “काय? तुम्हाला काय वाटते, यामागे गोंधळ असणारे बोगस औषध असावे का?”

त्याच्या वडिलांनी तरुणाला झापले, “हॅम्पटन, काळजी घे.”

क्रेग पुढे रेटत तरुणाला बोलला, “मला त्याला भेटायचे आहे. तू त्याला ओळखतोस का?”

“ओळखतोस का? मी म्हटले पाहिजे, की हो. दिसायला चांगला, चांगली प्रॅक्टीस आणि सर्व काही, पण --- का बर, त्याने नक्की त्या मुलीला भूल घातली असणार. सिंथियाला वाटते, तो नवलपूर्ण आहे.” क्रेगने सुचवले, “मला त्याला भेटायला आवडेल.”

हॅम्पटनने कबूल केले. “ठीक आहे.” क्रेगच्या शब्दाखातर तो डॉक्टर चॅपेलला भेटवायला तयार झाला. “मला तो माणूस आवडत नाही. पण तुमच्याबरोबर त्याच्या सौदर्य पार्लरमध्ये यायची माझी तयारी आहे.”

क्रेग बोलला, “आभारी आहे.” एवढे बोलून आम्ही मोठ्या डॉक्टर हेनेजची रजा घेतली.

जातांना वाटेत अनेक वेळा हॅम्पटनने काही दाखले देत, चॅपेलने सौदर्यच्या व्यवसायाचे कसे बाजीरीकरण केले आहे, हे सांगितले. हे विचित्र शेरे त्याच्या तोंडी शोभत नव्हते.

पाचव्या रस्त्यावरील एका मोठ्या इमारतीत, नवीन दुकानांच्या ओळीत, चॅपेलचे पार्लर होते. तिथे रोज हजारो स्त्रियांची ये जा असे. तो त्या जागेला त्वचाशास्त्राची संस्था म्हणत असे. पण हॅम्पटन म्हणाल्याप्रमाणे, तो तिथे प्रॅक्टीस करत होता.

“नखरेल, सौदर्यवृद्धी करणारी सर्जरी.”

आम्ही एका दारातून शिरलो, तेव्हा आम्ही दुसऱ्या दाराने स्त्रियांना बाहेर पडतांना पाहिले. क्रेग कुजबुजला, की जेव्हा साठीचे सोळाचे दिसायला बघतात,

तेव्हा त्याना एक दुसऱ्याशी ओळख करून घ्यायची नसते. आपण असे काही सौदर्य उपाय करतो, हे त्यांना सगळ्यांपासून चोरून ठेवायचे असते.

आम्ही थोडा वेळ एका खासगी खोलीत थांबलो. शेवटी डॉक्टर चॅपेल स्वतः आले. तो देखणा व बघताक्षणी बायकांना भूल पडेल, असा माणूस होता. त्याने डॉक्टर हेनेसबरोबर हातमिळवणी केली. मला डॉक्टर चॅपेल यांची वागणूक मित्रत्वाची वाटली. पण डॉक्टर हेनेसचा दृष्टीकोन वैद्यकीय व्यावसायिकाचा होता.

परत मला मध्ये घालण्यात आले. ते तिथे असण्याचे कारण माझ्यावर ढकलत होते. तरीही वर्तमानपत्रात काम केल्याने तुम्हाला एक गोष्ट माहिती होते, की दुसरे काही नाही तरी दिलासा.

मी धीर करून म्हणालो, "मिस व्हर्जिनिया ब्लॅकले नावाची स्त्री तुमच्याकडे सौदर्यवृद्धीसाठी आली होती का?"

"मिस ब्लॅकले? ओहो, हो. आणि तिची बहीणसुद्धा."

त्याने नावे सांगितली, ते पुरेसे होते. मध्यस्थ म्हणून माझी काही गरज नव्हती.

हॅम्पटन निष्काळजीपणे, अचानक बोलला, "तुम्ही तिच्या चेहऱ्याला सौदर्यप्रसाधने लावतांना काहीतरी केले असणार. तिच्या नाकाच्या वर एक लाल डाग आहे. तो अजून आहे, तसाच आहे."

भावनेच्या भरात मध्येच बोललेल्या या वक्तव्यावर केनेडी हसला. पण तरी झाले ते बरेच झाले असावे.

बोलतांना प्रत्येक शब्दावर डोके हलवत, डॉक्टर चॅपेल बोलला, "म्हणजे मी तिचे दिसणे बिघडवले, असे तुम्हाला म्हणायचे आहे का? चेहऱ्यावरील

सुरकुत्या गेल्या की!"

हॅम्पटन कटूपणे बोलला, "पण तिच्या चेहऱ्यावरील या नवीन लाल खुणेचे काय?"

डॉक्टर चॅपेल बोलला, "त्याचे मला काही माहिती नाही व ---झोपेचेही. मी माझे काम केले आहे."

वरवर तो शांत दिसत असला, तरी तो आतून अस्वस्थ असल्याचे कुणीही ओळखले असते. अशा वेळी त्याच्या व्यवसायिक किर्तीला बट्टा लागला नसता का? परदेशातील त्याच्या श्रीमंत ग्राहकांना असले काही कळले असते तर?

मी त्याच्या पार्लरकडे बघून, आश्चर्य करत होतो, की हा मनुष्य किती थापाड्या आहे! अशा केसेसमध्ये दोन तीन वेळा गोष्टी कोर्टात गेलेल्या त्याने ऐकल्या होत्या.

सर्वसामान्यपणे ही फसवेगिरीची किंवा अजून काही जास्त भानगडीची केस होती. दिसायला चांगल्या स्त्रियांचे कायमचे नुकसान झाल्याच्या बऱ्याच केसेस मी ऐकल्या होत्या. फायदा झालेला क़्वचितच ऐकला होता. चॅपेलने अज्ञानाने काही केल्यामुळे ती खूण कायमची राहिली होती का? की तो प्रामाणिक पणे काळजीपूर्वक काम करणाऱ्या थोड्या लोकांपैकी होता?

काहीही असले तरी केनेडीने त्याचा हेतू साध्य केला होता. तो चॅपेलला भेटला होता. जर त्याचा काही गुन्हा असता, तर त्याने काही करून फसवायचा प्रयत्न करून, चपळपणे कसब वापरून, ते लपवले असते. हॅम्पटनला दाबून टाकून, चपळाईने त्यातून यशस्वीपणे आम्ही आमचे अंग काढून घेतले.

आम्ही लिफ्टमध्ये खाली आल्यावर, शहरात जाणाऱ्या बसमध्ये उडी

मारत, हॅम्पटन जोरात नाकाने आवाज करत बोलला, "कायदेशीर वैद्यकीय शाखा सोडून, त्याने ही सौंदर्यशास्त्र शाखा घेतली. मी तुम्हाला सांगतो, हा काही व्यवसाय होऊ शकत नाही. एवढेच काय डॉक्टराना स्वतःची जाहिरात करायची परवानगी नाही, तरी हा ती खुशाल करतो!"

जरी क्रेगला तिथे जायचे नव्हते, तरी आम्ही हॅम्पटनचा निरोप घेऊन, प्रयोगशाळा गाठली. ही भेट फक्त काही उपकरणे गोळा करण्यासाठी होती. विजेचा दाब कमीजास्त करणारे उपकरण, व्यवस्थित खोक्यात बसवलेली हवा काढलेली नळी आणि तत्संबंधित इतर काही वस्तू. काही वेळाने आम्ही परत ब्लॅकले घरी गेलो.

व्हर्जिनियाच्या प्रकृतीत काही बदल नव्हता. मिसेस ब्लॅकले आम्हाला उत्सुकतेने भेटली. केनेडीने सांगितले, की आमच्याकडे विशेष असे सांगण्यासारखे काही नाही, तेव्हा तिने सुटका झाल्या सारखे भाव दाखवल्याचे आम्हाला वाटले.

वरील मजल्यावर आजारी मुलीच्या खोलीत क्रेग गुपचूप कामाला लागला. एका सॉकेटमधील दिवा काढून, आमचे नवीन एक्स रे फोटोग्राफीचे उपकरण बसवले बऱ्याच दृष्टीने काळजीपूर्वकतेने, त्याने खूप कोनांमधून व्हर्जिनियाच्या डोक्याचे फोटो घेतले. मग काही न बोलता, तो निघून गेला.

आम्ही मिसेस ब्लॅकलेचा निरोप घेऊन, हॉल ओलांडत असतांना, पडद्यामागून एक आकृती आली. ती सिंथिया होती. तिला एकटीला आम्हाला भेटायचे होते.

तिने घोगऱ्या कुजबुजत्या आवाजात विचारले, "तुम्हाला --- असे वाटत नाही का, की डॉक्टर चॅपेलला यात काही माहिती आहे?

केनेडी तिला टाळत बोलला, “मग हॅम्पटन हेनेज इथे असला पाहिजे.”

प्रश्न अगदी तर्कशुद्ध असल्यासारखे तिने कबूल केले, “हो, त्याने मला तुम्ही कार्लला भेटल्याचे सांगितले.”

आता तिला काळजी लपवायचे काही कारण नव्हते. खरेच, मला तसे काही कारण दिसत नव्हते. जर केनेडीच्या मनात जराही संशय असेल, तर मुलगी तिच्या प्रियकराची काळजी करणार, हे नैसर्गिक होते.

क्रेग एवढेच उत्तर देत होता, की अजून तरी त्याला काही सापडले नाही. त्यावरून मला एवढे लक्षात आले, की त्याचे चांगले समाधान झाले होते. प्रत्येकाला एकमेकांविरुद्ध भडकावून देणे व त्यायोगे सत्य शोधायचा प्रयत्न करणे. तो बोलला, “मला काही सापडताच मी तुम्हाला आणि तुमच्या आईला सांगेन.

तुम्हीही तुम्हाला माहिती असलेले सर्व काही मला सांगितले पाहिजे.”

शेवटच्या शब्दांवर जोर देण्यासाठी तो थांबला. मग हळूहळू दाराकडे वळला. माझ्या डोळ्याच्या कोपऱ्यातून, मला दिसले, की सिंथिया त्याच्यामागे एक एक पाऊले टाकत चालली आहे.

तिने हाक मारली, “अहो प्राध्यापक केनेडी.” क्रेग वळला.

तिने सुरु ठेवले, “मी एक गोष्ट विसरले. आईला काहीतरी झाले आहे.” ती थांबली व मग सुरु केले, “व्हर्जिनियाला हा आजार होण्यापूर्वीच मी हा तिच्यातील हा बदल पाहिला आहे. ती फार काळजी करते. ओहो, प्राध्यापक केनेडी, हे काय आहे? आम्ही सगळया इतक्या सुखात होतो आणि आता --- व्हर्गी, आई --- जगात या दोघीच तर मला आहेत. मी आता काय करू?”

प्राध्यापक केनेडी हळूवारपणे म्हणाले, “म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे

आहे?”

“मला माहिती नाही. अलीकडे आई वेगळीच वागते आणि आता प्रत्येक रात्री, ती बाहेर जाते.”

त्याचा बेत यशस्वी होत असल्याचे पाहून केनेडी उत्तेजन देत बोलला, “कुठे?”

“मला माहिती नाही. पण ती आनंदी होऊन परत येते.” ती कशामुळे कुणास ठाऊक, पण हुंदके देत, थरथरत होती.

तिचा हात दोन्ही हातात घेऊन केनेडी म्हणाला, “मिस ब्लॅकले, फक्त माझ्यावर विश्वास ठेव. जर माझ्या हातात असेल, तर तुला या छळणाऱ्या परिस्थितीतून मी बाहेर काढेन.”

ती काही आभाराचे शब्द पुटपुटली आणि आम्ही बाहेर पडलो.

आम्ही शहर ओलांडत प्रयोगशाळेकडे निघालो असतांना, केनेडी खोल विचार करत बोलला, “हे विचित्र आहे. आपल्याला मिसेस ब्लॅकलेवर लक्ष ठेवले पाहिजे.” एवढेच बोलणे झाले. जरी यामागे काय आहे, हे मला माहिती नसले, तरी निदान हे काठावरचे गूढ मला समजले होते.

प्रयोगशाळेत, त्याने घेतलेल्या फोटोंवरून केनेडीने काही मिनिटात

अभ्यास सुरु केला. त्याला काही महत्वाचे सापडले असल्यासारखे, त्याने थोड्याच वेळात माझ्याकडे बघितले. मी त्याच्याजवळ जाऊन, त्याने काढलेल्या फोटोंकडे बघितले. माझ्यासाठी ते काही खास नव्हते. पण केनेडीसारख्या त्याचा अभ्यास केलेल्यांसाठी, ते प्रत्येक मिनिटाला उजेड कमीजास्त करून काढलेले अर्थपूर्ण फोटो होते.

एक टोकेरी पेन्सिल त्या एका फोटोच्या कडेने फिरवत, व नंतर त्याच्याकडे असलेल्या तशाच स्थितीतील दुसऱ्या फोटोवर ती फिरवत, केनेडी म्हणाला, "हे बघ, कवटीच्या हाडातील खोलगट भागात, जिथे वाटाण्याच्या आकाराची पिट्यूटरी ग्रंथी असते तिथे हा आकार हळूहळू कमी कमी होत जातो आहे. पण हा ट्यूमर नाही. खूप वेळ तो फोटोंकडे बघत राहिला व बोलला, "पुरेशा यांत्रिक दाबामुळे असा फरक पडणे शक्य नाही."

ती काहीही समस्या असली, तरी त्यावर त्याला मदत करणे शक्य नसल्याने, मी त्याला प्रयोगशाळेत फेऱ्या मारतांना बघत राहिलो. शेवटी त्याच्या घड्याळाकडे बघत, त्याने शेरा मारला, "मला वेगवेगळया परिस्थितीतील एक्स रे परत काढला पाहिजे. आज रात्री सिंथियाने दिलेल्या पुराव्याचा उपयोग करून, आपल्याला काम केले पाहिजे. वाल्टर, टॅक्सी मागव."

जिथे टॅक्सी उभी केलेली कुणाच्या लक्षात आली नसती, अशा ब्लॅकले घरापासून एक चौक अंतरावर आम्ही एका मोठ्या इमारतीपाशी, थांबलो. जर काही काम असेल तर ते सावली पाडायचे होते. एखाद्याने घरावर लक्ष ठेऊन असावे, कारण तेवढ्यात कुणी आपल्या नकळत बाहेर पडून पसार होऊ शकते.

जेव्हा मिसेस ब्लॅकलेला घराबाहेर पडून रस्त्याला लागलेले आम्ही

पाहिले, तेव्हा आमची ही कारवाई शेवटी यशस्वी झाली. तिचा पाठलाग करणे सोपे होते, कारण तिला माहिती नव्हते, की तिचा पाठलाग केला जातो आहे. रस्ता ओलांडून ती गरीब वस्तीतून पुढे जात राहिली. त्यापैकी एका गरीब घरासमोर ती थांबली. आमची टॅक्सी आरामात जात होती. तिने उजव्या हाताचे शेवटचे एक बटण दाबलेले आम्ही पाहिले. मग ती दारातून आत गेली व जिना चढू लागली.

लगेच केनेडीने चालकाला टॅक्सी थांबवायला सांगितली. आम्ही तिच्या नकळत पाठलाग चालू ठेवला. एक दार ओलांडून आम्ही इमारतीत शिरलो. पत्रपेटीवर मिसेस रेबा राईनहार्ट असे नाव होते. याचा अर्थ काय होता?" न दिसण्याइतका काळोख झाला नसल्याने, आम्ही नंतर तिथे अजून एक टॅक्सी थांबलेली पाहिली. त्यातून एक मनुष्य उतरला व मागे चालू लागला. तो चॅपेल होता. करण्यासारखे काही नव्हते. पण या गोष्टीचा उत्तम फायदा करून घ्यायला हवा होता.

रस्त्याच्या तिरप्या उजेडात, केनेडी, टेहेळणी करत होता. तो बोलला, "सावली पाडणाऱ्यांना आपण संरक्षण देतो आहोत."

तो मोकळेपणे चॅपेलला बोलला, "आदल्या रात्री सिंथियाने मला तिच्या आईचा पाठलाग करायला सांगितले होते. त्यामुळे मी तो करतो आहे."

हे सहज दिलेले उत्तर होते, असे मला वाटले.

केनेडीने फसवायचा प्रयत्न केला. "मग कदाचित तुला रेबा राईनहार्टबद्दल काही माहिती असेल."

चॅपेलने आपल्याला कितपत माहिती आहे, अशा अर्थाने क्षणभर पाहिले. केनेडीने फाशावरील दोनची जोडी खेळली, जसे काही ते चार एक्के होते.

तो संशयाने उत्तरला, "फारसे नाही. मला माहिती आहे, की मिसेस ब्लॅकले आजारी वाटणाऱ्या म्हातारीला पैसे देते आहे. एकदा मला तिला बघता आले होते. मला वाटते, ही हळूहळू खंगत जाण्याची वाईट केस आहे. एका शेजाऱ्याने मला सांगितले, ती कॉलेज दवाखान्यात होती. ही डॉक्टर हेनेसची केस आहे. पण त्याने तिला त्याच्या मुलाच्या हवाली केले आहे. मी हॅम्पटन हेनेसलाही

इथे पाहिले आहे.”

चॅपेलचे शब्द गंभीर वाटत होते. पण मग मी असा विचार केला की आम्हाला हॅम्पटनने जे सांगितले, त्याला एक वेगळा अर्थ असावा. ते एकमेकांविरुद्ध खेळ खेळत होते का? कदाचित --- पण तो काय खेळ होता? या सर्वांचा अर्थ काय? मिसेस ब्लॅकले म्हातारीला पैसे का देत होती? दान म्हणून?

तिढा सुटत नव्हता. केनेडी आणि चॅपेल दोघेही एक प्रकारे एकमेकांना गृहीत घरत होते. त्यांनी त्यांच्या टॅक्सी सोडून दिल्या होत्या का आणि ते बरीच थिएटर्स असलेल्या न्यूयॉर्कच्या भागाकडे, एकमेकांकडे लक्ष ठेवत, पण लक्ष नसल्याचे भासवत चालले होते. शेवटी आम्ही अलग झालो. क्रेग आणि मी मोठ्या इमारतीतील आमच्या सदनिकेपर्यंत गेलो. तिथे तो अनेक तास अभ्यासिकेत बसला. आतापर्यंत या केसमध्ये कायकाय झाले, याबद्दल करायला खूप काही होते. तो रात्रभरही बसला असेल. काही झाले तरी, त्याने मला सकाळी लवकर उठवले.

तो म्हणाला, “प्रयोगशाळेत चल. तू गोंधळात पडलास तरी, मला परत ते एकस रे मशीन घेऊन ब्लॅकलेंकडे जायचे आहे. मला अशी आशा आहे की फार उशीर झाला नसेल.”

मी त्याच्याबरोबर निघायला वेळ लावला नाही. आणि आम्ही पाहुण्यांनी भेटायची वेळ संपायच्या आत तिथे पोचलो. केनेडीने मिसेस ब्लॅकलेंना भेटायचे असल्याचे सांगितले आणि पटपट एक्स रे उपकरण लाऊन ठेवले. “ती आजारी पडण्यापूर्वी जसा सौदर्यमास्क लावत होती, तसा मास्क तुम्ही लावावा, असे मी तुम्हाला सांगतो.”

केनेडी सांगत होता, तसे तिने केले. व्हर्जिनिया लावत होती, तसा रबरी मास्क लावला.

केनेडीने सांगितले, “तुम्ही तो मास्क जपून लाऊन ठेवा.” मग त्याने त्याचे फोटो घेणे संपवले.

“याबद्दल कुणाला काही सांगू नका. तुमच्या कुटुंबातही ही गोष्ट तात्पुरती सुरक्षित ठेवा.”

घाईने आम्ही परत प्रयोगशाळेत गेलो व परत केनेडी त्या फोटोंवर कामाला लागला. या वेळेस मला फार थांबावे लागले नाही. त्याचे काम पटपट झाले. तो जोराने ओरडल्यामुळे, मी त्याच्याजवळ गेलो.

व्हर्जिनियाच्या कपाळावर जिथे तो लाल डाग दिसत होता व सूज आली होती, त्याच्या विरुद्ध बाजूला कवटीमध्ये हाडातील खोलगट भागात, जिथे वाटाण्याच्या आकाराची पिट्यूटरी ग्रंथी असते, तिथे त्या फोटोत एक विशिष्ट ठिपका दिसत होता.

त्याने स्पष्ट केले, “त्या मास्कमधील कशाने तरी या एक्स रे फोटोला असे झाले आहे.” आता त्याचा चेहरा जिवंत झाला.

मी त्याला काही विचारण्यापूर्वी, त्याने तो त्याच्या रिकाम्या वेळात ज्या गोष्टींचा अभ्यास करायचा त्या गोष्टी ठेवलेला खण उघडला. त्यातील पाणी भरलेले काचेचे इंजेक्शन त्याने काढले. त्याकडे घाईघाईने पाहून, खिशात टाकले. हॉलमधून आम्ही कुणाची तरी पाऊले वाजलेली ऐकली. तो चॅपेल होता. तो फार दुःखी दिसत होता. त्याची स्त्री गिऱ्हाइके आता त्याची ही केस फेल गेल्याचे ऐकल्यावर त्याच्याकडे फिरकणार नाहीत, याचे त्याला दुःख होत असावे का?

मला नवल वाटले. की ते त्याहून जास्त काही होते?

तो किंचाळला, “ती मेली. ती म्हातारी काल मेली.”

एकही शब्द न बोलता केनेडीने आम्हाला प्रयोगशाळेबाहेर घालवले. एक्स रे चे फोटो खिशात घालत, तोदेखील निघून गेला.

आम्ही घाईने निघतांना चॅपेलने आम्हाला सांगितले, की त्याने एका शेजाऱ्याला काही प्रलोभन दाखवून, त्या म्हातारीवर लक्ष ठेवायला सांगितले होते. त्या शेजाऱ्याने आताच ती म्हातारी मेल्याचे सांगितले.

आम्ही त्या म्हातारीच्या घराच्या गरीब वस्तीत शिरताच तिचा एक शेजारी बोलला, “हृदयाच्या झटक्याने ती वारली.” असे डॉक्टर म्हणाले.

चॅपेल काळजीपूर्वक प्रेताकडे लक्ष देत म्हणाला, “अंगातील रक्त कमी झाल्याने [ॲनिमिया] ती वारली. केनेडीने देखील वाकून गरीब बिचारे, झिजलेले प्रेत तपासले. असे करतांना त्याला उशीखाली सरकवलेले एक जाड कापडाचे पाकीट दिसले. त्याने ते हळूच बाहेर ओढले व उघडले. आत खूप चुरगळलेल्या जुन्या चिठ्ठ्या व पत्रे होती त्याने पहिले पत्र उघडून, त्यावर घाईघाईने नजर फिरवली.

तो खोलीतील शेजाऱ्यांकडे बघत व कुणी पाकीट पाहिले तर नाही ना, याची खात्री करत, गुप्ततेने कुजबुजला, “वाल्टर, ही चिठ्ठी वाच. ही तिची गोष्ट आहे.”

एक नजर पुरेशी होती. पहिले पत्र म्हाताऱ्या स्टुअर्ट ब्लॅकलेचे होते. रेबा राईनहार्ट हिने गुपचूप त्याच्याशी लग्न केले होते --- आणि कधीच घटस्फोट घेतला नव्हता. एकामागून एक पत्र तिची गोष्ट सांगत गेली.

मी भरभर विचार केला. मग तिचा ब्लॅकले संपत्तीवर हक्क होता. त्याशिवाय, ब्लॅकले यांच्याकडे स्वतःचे असे काही नव्हते. फक्त मागच्या पिढीच्या इच्छापत्राने जे काही मिळाले असेल, तेवढेच. तिने त्यावरून हक्क दाखवून काही भांडण केले होते की काय, हे जाणून घेण्यासाठी मी ती पत्रे वाचली. ती वाचतांना मला स्टुअर्ट ब्लॅकलेचे चित्र मनाशी रेखाटता आले. बळकट, फटकळ, अप्रामाणिक, अनैतिक असा तो माणूस होता. त्याला जे पाहिजे होते, ते त्याने मिळवले. शिरजोर, मुखस्तंभ, विचित्र अशा या माणसाला न्यूयॉर्कचा भविष्यकाळ समजला होता. त्या आधारावर त्याने त्याचे भविष्य घडवले.

म्हातारीच्या गोष्टीप्रमाणे, त्यांचे लग्न हे पूर्णपणे गुप्त होते.

त्याने तिचा हट्ट धरला तेव्हा तिने लग्नाची मागणी केली. त्याने लग्नासाठी असमर्थता दाखवली. त्याच्याकडे वारसाहक्काने आलेली संपत्ती त्याचीच राहील. पण असे तेव्हाच होईल जेव्हा तो एकपत्नीव्रत आचरेल व त्याला एकच विश्वासू पत्नी असेल --- अशी अट होती. रेबा राईनहार्ट काही त्याची विश्वासू पत्नी नव्हती आणि तिने तसे व्हायला नकार दिला होता. इतरही काही कौटुंबिक कारणे होती. त्यांनी असे समजून लग्न केले, की तो त्याच्या या बाबतीत गुप्तता राखून, तिला सुरक्षितपणे भेटू शकेल. तिच्या गोष्टीप्रमाणे हे युक्तीने फसवणे होते. जेव्हा तिला समाजमान्यता हवीशी वाटू लागली, तेव्हा तो उत्तरला, की हे लग्न कायदेशीर नाही. लग्नसमारंभ न केल्याने त्यांनी लग्न रजिस्टर करायचे टाळले आहे. ती त्याची कायदेशीर पत्नी नाही. त्यामुळे तिला काहीही हक्क मिळणार नाहीत. पण त्याने तडजोड म्हणून, काही गोष्टी स्विकारल्या. जर ती पश्चिमेकडे गेली व त्याच्या आयुष्यात लुडबुड केली नाही, तर तो तिला ठराविक रक्कम देईल. फसल्यासारखे

तिने ते मान्य केले व कॅलीफोर्नियाला निघून गेली. त्याला कसे कुणास ठाऊक पण समजले, की ती मेली. त्यानंतर अनेक वर्षांनी, त्याने परत लग्न केले.

मध्यंतरी तिने घरात पैसे गुंतवले. ते वाढले. पहिले लग्न फसल्यामुळे दुसरे लग्नही केले. मग तिचा दुसरा नवरा वारल्यावर, ती दरिद्री झाली. तोपर्यंत स्टुअर्ट ब्लॅकलेही मेला होता. ती पूर्वेला आली. तेव्हापासून ती पहिले लग्न खरे सिद्ध करायची व पैसे मिळवायची खटपट करत होती. ही आतून हलवणारी गोष्ट होती.

आमचे वाचून झाल्यावर केनेडीने ती पत्रे ताब्यात घेऊन ठेवली. म्हातारीच्या मरणाने व या नवीन शोधामुळे चॅपेल उद्दीपित झाला होता. त्याला घेऊन केनेडी घाईने ब्लॅकले घराकडे गेला. मध्ये फक्त तो डॉक्टर हेनेस व त्याचा मुलगा, याना फोन करण्यासाठी थांबला.

सगळीकडे बातमी पसरली होती. सिंथिया ब्लॅकले आम्हाला हॉलमध्ये भेटली. ती थोडी घाबरलेली पण बरीचशी सुटकेचा निःश्वास टाकणारी दिसत होती.

ती ओरडली, "ओहो प्राध्यापक केनेडी, हे काय आहे, मला माहिती नाही, पण आई खूप वेगळी वाटते आहे. हे सर्व काय आहे?"

केनेडी काहीच बोलले नाहीत. मग ती चॅपेलकडे वळली. तो म्हणाला,

'मी मिसेस ब्लॅकलेकडे लक्ष ठेऊन होतो. ती कुजबुजली,

"कार्ल, काय झाले आहे?"

तो कुजबुजत बोलला, "मी सांगू शकत नाही." मग अस्वस्थतेने त्याने आम्हा सर्वांकडे पाहिले.

"तुमची बहीण बरी आहे का?"

सिंथियाच्या चेहऱ्यावर ढग दाटून आले. आईसाठी ती थोडी बरी वाटत असली, तरी व्हर्जिनियासाठी ती काळजीतच होती.

चॅपेल दृष्टीआड होऊ नये म्हणून मी मध्येच बोललो, “इकडे या.” आणि केनेडीमागून आम्ही वरील मजल्यावर गेलो.

आम्हाला क्रेग तिथे व्हर्जिनियाच्या पलंगाजवळ बसलेला दिसला. तो झोपलेल्या मुलीच्या हाताला एक इंजेक्शन देत होता. मिसेस ब्लॅकले उत्सुकतेने मुलीवर वाकली होती. ती बदललेली दिसत होती. अजूनही व्हर्जिनियाची काळजी होतीच. पण तिची तीव्रता कमी झाली होती. मी केनेडीकडे इतका रंगून जाऊन पहात होतो, की मला डॉक्टर हेनेस व हॅम्पटन आत आल्याचे कळलेच नाही. पण चॅपेलने त्यांना पाहिले व तो वळला. क्षणभर त्याने हॅम्पटनकडे पाहिले. मग ओठाचा कोपरा थोडासा दुमडत, तो हळू आवाजात बोलला, “जर तुम्हाला रोग्याच्या जीवनमरणात रुची असेल, तर ॲनिमिया असलेल्या रोग्याला हृदयरोगाचे उपचार करणे, नैतिकतेला पूर्णपणे धरून आहे का?

मी हॅम्पटनचा चेहरा जवळून पाहिला. त्यातील प्रत्येक रेषेवर राग होता. पण तो काही बोलण्यापूर्वी डॉक्टर हेनेस पुढे आले.

धमकीवजा बोट चॅपेलकडे दाखवत, ते जवळजवळ ओरडले, “माझ्या मुलाचा अंदाज बरोबर होता. मुद्द्यावर येत मी विचारतो, सर, तुम्ही हे स्पष्ट करा की मिस व्हर्जिनियाच्या कपाळावर तो डाग कसला होता?

हॅम्पटन पण तेच बोलला. ”हिम्मत असेल तर ते स्पष्ट करा.”

सिंथियाने भीतीने तिचे रडणे दाबले. क्षणभर मला वाटले, दोन तरुण माणसे भावनेच्या भरात सर्व काही विसरतील.

पटकन त्या दोघांच्या मध्ये येत केनेडी म्हणाले, “एक सेकंद. मला बोलू दे. सर्वांकडे बघतांना, त्यांचा आवाज हुकमत दर्शवणारा होता.

त्यांनी मुद्दाम सुरु ठेवले, “मिस व्हर्जिनियाचा त्रास असा आहे, की शास्त्रज्ञांनी अलीकडे एनडोक्राइन ग्रंथीचा शोध लावला आहे. या केसमध्ये पिट्युटरी. माझे एक्स रे चे फोटो हेच सांगतात. इतरांच्या फायद्यासाठी मी हे स्पष्ट करतो. कवटीमध्ये हाडातील खोलगट भागात पिट्युटरी ही दोन भागातील लंबवर्तुळाकार ग्रंथी असते. त्याभोवती स्नायूंचे आवरण असते. त्याने व्हर्जिनियाच्या कपाळावर जिथे तो लाल डाग होता तिथे दाखवत, म्हटले, “याखाली ती असते.” आधीचा फ्रेंच सर्जन त्याला शेंदरी लिपस्टिक म्हणाला होता. पूर्वीच्या लोकांना वाटायचे, की त्यातून नाकामध्ये शेंबूड वहातो. मागील शतकातील बऱ्याचशा शास्त्रज्ञांना खात्री वाटत होती, की त्याची गरज संपल्याने उत्क्रांतीत ते नाहीसे झाले. आज आपल्याला जास्त माहिती आहे.

नलीकेशिवाय असलेल्या ग्रंथींची व अंतर्गत स्त्रावांची हळूहळू माहिती होत गेली. त्या आपल्यासमोर आधुनिक चित्राचे कोडे असल्यासारख्या असतात. त्यामुळे, मी तुम्हाला अलीकडील संशोधनाच्या आधारे सांगू शकतो, की पिट्युटरी ग्रंथींची भूमिका काय आहे. डॉक्टर गुशिंग व त्याचे सहकारी यांनी जॉन हॉपकिन्समध्ये असा शोध लावला, की त्यांची अशी प्रवृत्ती असते, की त्यातील स्त्राव पूर्णपणे किंवा जवळजवळ संपला, की खूप आळसटल्यासारख्या अवस्थेत जायचे.”

आता सर्वांचे डोळे केनेडीकडे लागले होते. त्याने चपळतेने सरळ त्याच्या बोलण्याचा ओघ त्या बिचाऱ्या मुलीकडे वळवला.

तो तिच्या दिशेने हात हलवत, पुढे बोलला, “हे खूपसे आनंदाने खेळण्यासारखे आहे --- यामुळे आळसटलेपणा, कमी तापमान, मंद नाडी व श्वसन, कमी रक्तदाब, आणि जाणीव कमी असणे, मेद वाढणे व लैगिकता कमी होणे असे होते.

याचे नाव आहे --- डायस्ट्रोफिया ॲडीपोसोजेनिटल्स”

त्याने डॉक्टर हेनेसकडे बघून मान हलवली. पण थांबला नाही. सोम्नोलेन्स शीतनिद्रा व या अवस्थेत खूप साम्य आहे. ग्रंथी जेव्हा चलनवलन करत असेल, तेव्हा हायपोपिट्याटॅरीझम होते. हे नैसर्गिक शीतनिद्रेसारखे असते. परंतु हिवाळा व अन्न याचा काही संबंध नसतो. हे कपाळाखालील लहानशा ग्रंथीशी संबंधित असते.

पिट्युटरी ग्रंथीतील स्राव कमी झाल्यास, शरीर आळसावते.

सतत झोपायचा रोग जडतो. पिष्टमय पदार्थ चरबीच्या रुपात शरीरात साठवले जातात. डॉक्टर हेनेस, मला नवल वाटते, की ही लक्षणे तुमच्या लक्षात कशी आली नाहीत?

मिसेस ब्लॅकलेच्या पुटपुटण्यामुळे डॉक्टर हेनेसचे उत्तर ऐकू आले नाही. मला वाटते मला पांढऱ्या अंथरुणावरील स्थिर चेहऱ्याची हालचाल दिसली.

मिसेस ब्लॅकलेने तिच्या मुलीशेजारी गुडघे टेकून हाक मारली, “व्हर्गी! व्हर्गी!”

“मी इथे आहे, आई ”

व्हर्जिनियाचे डोळे थोडेसे उघडले. चेहरा एक दोन इंच हलला. ती खूप प्रयत्न करत होती. पण तो फक्त क्षणभर टिकला. नंतर ती परत आठवडाभर डॉक्टरांना व सर्जनना गोंधळवणाऱ्या विचित्र अवस्थेत गेली.

मिसेस ब्लॅकलेच्या खांद्यावर शांतपणे हात ठेवत केनेडी म्हणाला, “झोप उडाली आहे. आता ती अर्धवट जागृतावस्थेत आहे. आता लवकरच चांगली सुधारणा होईल.”

मी तिला दिल्यानंतर रिकाम्या झालेल्या इंजेक्शनला हात लावत, विचारले, “आणि ते?”

पिट्यूटरी ग्रंथीच्या पुढील भागातील द्राव --- पिट्यूट्रीन. कुणाचातरी असा हेतू असावा, की तात्पुरते तिला अशा अवस्थेत न्यायचे व मग परत पिट्यूट्रीनच्या सहाय्याने उमलणाऱ्या  स्त्रीत्वात आणून सोडायचे. आणि अशा तऱ्हेने तिचे दुःख दूर करायचे.”

केनेडीने खिशात हात घातला व त्याने घेतलेला दुसरा एक्स रे फोटो काढला. आपोआप मिसेस ब्लॅकलेने आज्ञा पाळली. चॅपेलने हरकत घेण्याची माझी अपेक्षा होती. पण मरणाच्या शांततेचा कुणीही भंग केला नाही.

मास्क काढत, केनेडी बोलला, “जुने नसांशी संबंधित दुखणे! मी शोधून काढले, की ते पिट्यूटरी ग्रंथींवर परिणाम झाल्याने झाले आहे. तिने मास्क घातलेला असतांना काढलेला हा एकस रे फोटो आहे.” त्याने हलकेच फोटोतील डोळयांच्या वरील भागात बोट फिरवले. “वाल्टर, तुझ्या हाताला तिथे एक उंचवटा लागेल.”

मी तसे केले. तो मला तितकासा जाणवला नाही. पण तिथे काहीतरी होते.

मी विचारले, "ते काय होते?"

केनेडी उत्तरला, "शरीराच्या खूप संरक्षित व सहज पोचता येणार नाही, अशा भागात असलेल्या पिट्यूटरीपर्यंत कसे पोचायचे? जर तुम्ही माझी एक्स रे प्रतिमा अभ्यासली असेल, तर तुम्हाला समजेल की मला पहिला पुरावा कसा मिळाला. त्या जागेवर काही होते. त्यामुळे तो भाग थोडा फुगीर झाला होता. ते काय होते? --- शिशाच्या वेष्टनात काळजीपूर्वक रीत्या, डोळ्यांचे संरक्षण होईल, असा ठेवलेला रेडियम मास्क होता. पण त्याच्यापासून निघालेला उजेड सरळ ग्रंथीवर पडून, तिच्यावर परिणाम होत होता. त्यामुळे ग्रंथीतील स्राव थांबला."

चॅपेलने सुस्कारा टाकला. तो फिका पडला व रागावला.

अचानक विषय बदलत, केनेडी म्हणाला, "तुमच्यापैकी काही जणांनी रेबा राईनहार्टबद्दल ऐकले असेल."

तिच्यासमोर बॉम्ब फुटला असता, तरी ती दचकली नसती, एवढी मिसेस ब्लॅकले दचकली. अजूनही व्हर्जिनियाच्या अंथरुणासमोर गुडघे टेकत, तिने तिचा आश्चर्य वाटलेला चेहरा केनेडीकडे वळवला. तिने दोन्ही हात जुळवत, त्याला दया दाखवण्याची विनंती केली व बोलली,

"माझ्या मुलीसाठी, मी तिला विकत घायला बघत होते --- त्यांचे नाव चांगले रहावे म्हणून --- त्यांच्या भविष्यासाठी. त्यांचे भविष्य!"

केनेडी खाली वाकून बोलला. "मला ते सर्व माहिती आहे." तिला आश्वस्त केल्यावर तो आमच्याकडे वळून म्हणाला, "त्या म्हातारीच्या मागे अद्भुतरम्य रुचीचे गुपित होते. आता ज्या जमिनीवर लक्षाधीशांची घरे, राजेशाही हॉटेले व प्रसिद्ध सिनेमागृहे उभी आहेत, अशा जमिनीवर विधवेचा हक्क दाखवून

लाखो डॉलरची मागणी करण्यासाठी --- पैसे मागण्यासाठी कोर्टात जायचा ती विचार करत होती.”

सिंथिया पुढे सरकली आणि रागाने थरथर कापणाऱ्या आईच्या गळयात तिचे हात टाकले.

केनेडी बोलला, “अजून कुणाला तरी स्टुअर्ट ब्लॅकलेचे जुने लग्न माहिती होते. रेबा राईनहार्टबद्दल माहिती होते. ती कधीही मरेल, हेदेखील माहिती होते. पण ती वारल्याशिवाय कुणीच ब्लॅकले त्यांचे भविष्य खात्रीलायक रीत्या जाणत नव्हते.

मला असे वाटले, की चॅपेलला हा सर्व बेत माहिती होता व तो सिंथियाचे भविष्य सुरक्षित करू इच्छित होता.

मी हॅम्पटन हेनेसच्या नजरेला पकडले. त्याचे डोळे अंथरुणावरील चेहऱ्यावर खिळले होते.

व्हर्जिनिया पुन्हा थोडी हलली. यावेळेस तिचे डोळे पूर्ण उघडले. तिच्या दृष्टीला तिचा प्रियकर पडला आणि ती मलूलपणे हसली.

‘हा हॅम्पटन असेल का? तो असणे शक्य वाटत नाही.’

केनेडी ताण घेत म्हणाला, “म्हातारी मेली. तिचा पैसाही तिच्याबरोबर गेलेला आहे.”

सौदर्य मास्क, एक्स रे फोटो आणि मिसेस राईनहार्टची कागदपत्रे हे सर्व गोळा करून, केनेडीने अचानक जोर देऊन म्हटले,

“चॅपेलला खर्च करायला लावून, रेबा राईनहार्ट मरेपर्यंत वाट बघणे, चुकीच्या निदानावर विश्वास ठेवणे व हॅम्पटनला अनुभव नसणे, या सर्वांमुळे लग्न पुढे ढकलणे, हे लवकर निकाल लागायचा खात्रीचा मार्ग होता. डॉक्टर हेनेस, ही तुमची तुमच्या मुलासाठीची बेजबाबदार महत्वाकांक्षा होती. त्याने तुम्ही पुढे पुढे चालत राहिलात.

व्हर्जिनिया ब्लॅकले हिची तब्येत आणि सौदर्य जोपर्यंत पूर्णपणे पूर्वीसारखे होत नाही, तोपर्यंत मी हे पुरावे जपून ठेवेन.”

# A Jury of Her Peers

# तिच्या मैत्रिणींची ज्युरी

By Susaan Glaspell




जेव्हा मार्था हॅलेने वादळी दार उघडले आणि उत्तरेकडील वारा तिला चाटून गेला, तेव्हा ती तिचा मोठा लोकरी रुमाल आणण्यासाठी धावली. जेव्हा तिने तिचे डोके घाईने गोल वळवले, तेव्हा तिच्या डोळ्याला स्वयंपाकघरातील भिंतीचा फटका बसला. डिक्सन भागात तिला बोलावणारे असे असामान्य काही झाले नव्हते. पण तिला काय दिसले असेल, तर तिचे स्वयंपाकघर आता सोडून जायच्या अवस्थेत नव्हते. तिचा पावाचा लगदा  एकत्र करण्यासाठी तयार होता. अर्धे पीठ मळून झाले होते आणि अर्धे व्हायचे होते.

तिला अर्धवट काम बघण्याचा तिटकारा होता. पण मिस्टर हॅलेसाठी गावातील चमू थांबला होता. मग शेरीफ धावत आला व सांगू लागला, की त्याची

बायको मिसेस हॅलेलाही बोलावते आहे --- आणि हसत, तो म्हणाला, ती एकटी यायला घाबरते आहे आणि तिला बरोबर कुणीतरी दुसरी बाई पाहिजे.

त्यामुळे तिने मग सर्व पसारा होता, तसाच टाकला आणि तिच्या नवऱ्याचे बोलणे ऐकले, "थंडीत लोकांना तिष्ठत ठेऊ नकोस."

तिने वादळाचे दार परत उघडले आणि ती तीन पुरुष आणि एक बाई यांच्यात जाऊन मिसळली. ते दोन सीट असलेल्या मोठ्या बग्गीत थांबले होते.

तिने तिच्याभोवती दोर बांधल्यावर, तिने त्या बाईकडे पाहिले. ती तिच्या मागील सीटवर बसली होती. मागील वर्षीच्या या भागातील जत्रेला ती मिसेस पीटर्सला भेटली होती. तिच्यासंबंधी तिला आठवणारी गोष्ट म्हणजे, ती शेरीफच्या बायकोसारखी दिसत नव्हती. ती लहानशी आणि बारीक होती. तिचा आवाजही फार नाजूक होता., गोरमन जाण्यापूर्वी व पीटर्स येण्यापूर्वी शेरीफची बायको, मिसेस गोरमनचा आवाज हा [प्रत्येक शब्द कायद्याला धरून उच्चारलेला असायचा.] पण जर मिसेस पीटर्स शेरीफच्या बायकोसारखी दिसत नसेल, तर पीटर्सने तिला ती तशी दिसेल, असे बनवले. तो स्वतःला शेरीफ म्हणून निवडून आणू शकेल असा पक्का माणूस होता --- तो मोठ्या आवाजाचा जाड माणूस होता. जसे काही गुन्हेगार असलेले व नसलेले यांच्यातील फरक माहिती असल्यामुळे बहुधा, तो केलेले कायदे खूप काळ टिकावेत अशा मताचा होता. सुरा घुसावा तसे मिसेस हॅलेच्या मनात आले, की सर्वांशी इतक्या आनंदाने वागणारा व थोडा तरी दयाळू असल्याने, असा उत्साही माणूसच शेरीफ व्हायला योग्य आहे.

सगळे पुरुष आपापसात बोलत आहेत. मग आपण बायकांनी कसे गप्प बसायचे म्हणून शेवटी मिसेस पीटर्स म्हणाल्या, "वर्षातील या दिवसात, हा प्रदेश फारसा सुखावह नसतो." त्या डोंगरावर गेल्या होत्या आणि आजूबाजूचा प्रदेश बघून, त्यांना फारसे बोलावेसे वाटेना. म्हणून सचिव, मिसेस हॅले यांनी त्यांचे उत्तर

संपवले. मार्चमधील ही थंड सकाळ फार एकाकी वाटत होती. ती खोलगट, दरीसारख्या भागात होती आणि त्याबाजूची पॉपलरची झाडेही एकाकी दिसत होती. माणसे त्यांच्याकडे बघून काय झाले, याबद्दल बोलत होती. त्या भागातील वकील एका घोड्याच्या टांग्याच्या एका बाजूला वाकून, ते पोचत आले होते, त्या भागाकडे सतत बघत होता.

स्वयंपाकघराच्या दारातून बाहेर पडत त्या दोघी पुरुषांकडे निघाल्या, तेव्हा मिसेस पीटर्स उदास होत म्हणाल्या, “तुम्ही माझ्याबरोबर आल्याने मला आनंद झाला. तिने दारात पाऊल ठेवल्यावर व दाराच्या कडीवर हात ठेवल्यावरही, मार्था हेलला वाटत होते, की ती हा उंबरठा ओलांडू शकणार नाही, कारण तिने पूर्वी तो कधी ओलांडला नाही. वेळोवेळी तिच्या मनात येई, “जरी मिनी फॉस्टर गेली वीस वर्षे मिसेस राईट होती, तरी मी बाहेर जाऊन तिला भेटले पाहिजे. पण नंतर काहीतरी काम निघे आणि मिनी फॉस्टर तिच्या मनातून निघून जाई. पण आता ती येऊ शकत होती.

पुरुष माणसे स्टोव्हजवळ गेली. बायका दाराशी गर्दी करून उभ्या राहिल्या. तरुण हेंडरसन, त्या भागातील वकील वळून बोलला, “स्त्रियांनो आगीपाशी या.”

मिसेस पीटर्स एक पाऊल पुढे गेली व थांबली. ती म्हणाली, “मला --- थंडी वाजत नाही. म्हणून मग दोन्ही बायका दाराशी थांबल्या. त्या पहिल्यांदा स्वयंपाकघराच्या आजूबाजूलाही बघत नव्हत्या.

त्यांच्यासाठी शेकोटी करायला शेरीफने त्याचा नोकर पाठवला होता, हे चांगले झाले असल्याचे, पुरुष मंडळी म्हणत होती. मग शेरीफ पीटर्स स्टोव्हच्या मागून पुढे आला. त्याच्या कोटाची बटणे काढली आणि त्याचे हात स्वयंपाकघराच्या टेबलावर अशा रीतीने ठेवले, की आता कामकाज सुरु होणार असे जणू तो म्हणत होता. तो कामाचा आवाज काढून बोलला, “मिस्टर हॅले,

आता आपण काही सुरु करण्यापूर्वी, तुम्ही मिस्टर हेंडरसनला विचारा, की तुम्ही काल सकाळी इथे आलात, तेव्हा तुम्ही काय पाहिले.”

मिस्टर हेंडरसन स्वयंपाकघराच्या आजूबाजूला बघत होता. तो म्हणाला, “तसेही, इथले काही हलवले आहे का? तो शेरीफकडे वळला. “सर्व वस्तू काल तुम्ही जशा ठेवल्यात, तशाच आहेत का?”

पीटर्सने कपाटापासून सिंककडे पाहिले. तिथून स्वयंपाकघरातील टेबलाच्या एका कडेला असणाऱ्या लहानशा डोलणाऱ्या खुर्चीकडे पाहिले.

“हो, सगळे तसेच आहे.”

वकील बोलला, “काल इथे कुणीतरी विसरले असणार.”

यावर विचार करत, शेरीफ बोलला, “अरे हो, मला सांगू दे की तो जो मनुष्य वेडा झाला, त्याच्यासाठी मी फ्रँकला मॉरीस सेंटरला पाठवले, कारण मी दिवसभर कामात होतो. तुम्ही आजपर्यंत ओमाहाहून परत याल, हे मला माहिती होते. जॉर्ज, आणि मी जोपर्यंत येथील सगळे काही बघत नाही --- “

झाले गेले सोडून देत, वकील म्हणाला, “ठीक आहे, मिस्टर हॅले, तुम्ही काल सकाळी इथे आलात, तेव्हा काय झाले, ते सांगा.”

ज्या आईचे मूल नुकतेच एखादा शब्द बोलू लागले आहे, अशी नको ते होणार असल्याची भावना घेऊन, मिसेस हॅले अजून दाराला टेकून उभ्या होत्या. लेविस नेहमीप्रमाणे फिरत होता आणि सगळ्या गोष्टी एकत्र करत होता. ती आशा करत होती, की तो सगळे सरळ साधेपणाने सांगेल. ज्यामुळे मिनी फॉस्टरसाठी सर्व काही कठिण करून ठेवेल, अशा उगीच गरज नसलेल्या गोष्टी तो सांगत बसणार नाही. त्याने एकदम सुरवात केली नाही. तिने बघितले की तो विचित्र दिसत होता --- स्वयंपाकघरात तो असा काही उभा होता, की जसे काही काल त्याने काय पाहिले हे सांगायचे, म्हणजे जणू त्याच्यावर संकट आले होते.

वकिलाने आठवण केली. “तर सांगा मिस्टर हेल.”

मिसेस हेलच्या नवऱ्याने सुरवात केली. "हॅरी आणि मी बटाट्यांचे ओझे घेऊन निघालो." हॅरी हा मिसेस हॅले यांचा मोठा मुलगा होता. आता तो त्यांच्याबरोबर नव्हता, कारण ते बटाटे काल शहरात कधीच पोचले नाहीत. तो आज ते घेऊन गेला होता. त्यामुळे शेरीफ जेव्हा असे सांगायला थांबला, की वकीलाला त्याची गोष्ट सांगण्यासाठी त्याला मिस्टर हॅले त्याच्याबरोबर यायला हवे आहेत, त्यामुळे सर्व काही स्पष्ट होईल, तेव्हा हॅरी घरी नव्हता. मिसेस हॅलेला अजून अशी भीती वाटत होती, की हॅरीने पुरेसे गरम कपडे घातले नव्हते --- उत्तरेकडचा वारा किती बोचरा आहे, याची त्यांना कोणालाच कल्पना नव्हती.

हॅले हाताने दाखवत, सांगत होता, "आम्ही या रस्त्याने आलो आणि जेव्हा आम्हाला घर दिसू लागले, तेव्हा मी हॅरीला म्हणालो, "असे बघ, जॉन राईट फोन घेतो का, हे मी बघणार आहे." त्याने हेंडरसनला स्पष्ट केले, "जोपर्यंत मला माझ्याबरोबर जायला कुणी मिळत नाही, तोपर्यंत मला परवडणार नाही, अशा किमतीला बटाटे विकत घ्यायला ते येणार नाहीत. मी एकदा हे वेटबरोबर बोललो आहे. पण त्याने मला असे सांगत धुडकावले --- काही झाले तरी लोक जरा अतीच बोलतात. तो फक्त शांतता राखायला सांगत होता. तर्क करा, तो स्वतःशी किती बोलला असेल! पण मी विचार केला, जर मी घरात गेलो व त्याच्या बायकोशी हे बोललो, की सर्व बायकांना फोन आवडतो आणि या एकाकी रस्त्यावर, फोन असणे केव्हाही चांगले राहील --- मी हॅरीला म्हटले, की मी एवढेच बोलणार होतो --- त्याच वेळी मी हेदेखील म्हणालो, त्याची बायको जॉनपेक्षा वेगळे काय बोलेल, ते मला माहिती नाही --- "

'आता, तो बघा तो आलाच. तो नको त्या गोष्टी बोलेल.' मिसेस हॅलेने नवऱ्याला डोळ्यांनी दटावायचा प्रयत्न केला. पण नशीबाने वकील मध्येच बोलला, "मिस्टर हॅले, ते आपण जरा नंतर बोलू. मला त्याबद्दल बोलायचे आहे, पण मी जास्त उत्सुक यासाठी आहे, की तुम्ही इथे पोचलात तेव्हा काय झाले?"

यावेळेस त्याने मुद्दाम, काळजीपूर्वक सुरवात केली, "मी काही पाहिले

किंवा ऐकले नाही. मी दार वाजवले. तरीही आत सर्व शांत होते. मला माहिती होते, की तो आत असणार --- आठ वाजून गेले होते. मी परत जोराने दार वाजवले. मला वाटले कोणीतरी ‘आत या’ असे म्हणाले. पण माझी खात्री नव्हती. तरी मी दार उघडले --- हे दार.”

जिथे दोन स्त्रिया उभ्या होत्या, तिकडे व खुर्चीकडे हाताने निर्देश करत, तो बोलला, “आणि त्या डोलणाऱ्या खुर्चीत मिसेस राईट बसल्या होत्या.”

स्वयंपाकघरातील प्रत्येकाने त्या खुर्चीकडे पाहिले. मिसेस हॅलेच्या मनात आले, की ती खुर्ची जराही मिनी फॉस्टरला शोभेलशी  दिसत नव्हती --- वीस वर्षापूर्वीच्या मिनी फॉस्टर सारखी! ती खुर्ची गडद लाल होती. पाठीला लाकडी आधार होता आणि मधला आधार गेलेला होता व ती एका बाजूला कललेली होती.

वकील चौकशी करत होता. “ती कशी दिसत होती?”

हॅले बोलला, “ती विचित्र दिसत होती.”

“विचित्र म्हणजे?” हे विचारल्यावर त्याने वही व पेन्सिल काढली. मिसेस हॅलेला पेन्सिल बघायला आवडत नसे. त्याने गरज नसलेल्या गोष्टी उगीचच सांगू नयेत म्हणून, तिने तिचे डोळे तिच्या नवऱ्यावर स्थिर ठेवले. उगीचच त्या गोष्टी वहीत नोंदवल्या जाऊन अंगाशी येतील, असे तिला वाटत होते.

हॅले जपून बोलत होता, जसे काही पेन्सील त्याच्यावर पण परिणाम करत होती. “म्हणजे तिलाही माहिती नसावे, की ती पुढे काय करणार आहे आणि एक प्रकारे केले आहे."

“तुम्ही आल्याचा तिच्यावर काय परिणाम झाला?”

मी म्हणालो, “मला नाही वाटत तिला काही वाटले असेल --- किंवा उलटेही असेल. तिने काही लक्ष दिले नाही.”

“मिसेस वेटबद्दल काय? ती थंड होती, नाही का?”

ती बोलली, "असे आहे का? आणि तिच्या ॲप्रनच्या प्लेट्स घालू लागली.

"खरे तर मी चकित झालो. तिने मला स्टोव्हपाशी बोलावले नाही किंवा बसायलाही सांगितले नाही. ती तिचे काम करत होती. तिने माझ्याकडे पाहिलेही नाही. म्हणून मी म्हटले, "मला जॉनला भेटायचे आहे."

मग ती --- हसली. मला वाटते, तुम्ही त्याला हसणे म्हणाल.

मी हॅरी आणि बाहेरच्या लोकांबद्दल विचार केला. म्हणून मी थोड्या जोरात म्हटले, "मी जॉनला भेटू शकतो का?"

ती हळूच म्हणाली. "नाही."

मी विचारले, "तो घरी नाही का?"

तिने माझ्याकडे बघत म्हटले, "हो. तो घरी आहे."

मी कंटाळून विचारले, "मग मी त्याला का भेटू शकत नाही?"

ती थंडपणे बोलली, "कारण तो मेला आहे." आणि परत ॲप्रनच्या प्लेट्स घालू लागली.

मी जे ऐकले, त्यावर विश्वास न बसल्यासारखे, मी विचारले, "मेला आहे?"

तिने फक्त मान हलवली. ती जराही विचलित झाली नाही. मागे पुढे डुलत राहिली.

काय बोलावे, हे न कळून मी विचारले, "पण तो आहे कुठे?"

तिने वरती बोट दाखवले --- वरच्या खोलीत.

मी वरती जायला म्हणून उठलो. या वेळेपर्यंत मला काय करावे, ते कळत नव्हते. मी जागच्याजागी चुळबुळ करत म्हणालो, "तो कशामुळे मेला?"

ती म्हणाली, "त्याच्या गळयाभोवतीच्या दोरीमुळे मेला." आणि परत

ॲप्रनच्या प्लेट्स घालू लागली.

हॅले बोलायचा थांबला आणि, जसे काही काल सकाळपासून ती बाई अजून तिथे बसून असल्यासारखा, तो डोलणाऱ्या खुर्चीकडे एकटक बघत राहिला. कुणीच बोलले नाही. जणू काही सर्वांना ती बाई कालपासून तिथे बसलेली दिसत होती.

शांतताभंग करत शेवटी वकिलाने विचारले, “आणि मग तू काय केलेस?

मी बाहेर जाऊन हॅरीला बोलावले. मला वाटले कदाचित --- मला मदत लागेल. हॅरी आत आला आणि आम्ही वरच्या मजल्यावर गेलो. त्याचा आवाज कुजबुजणारा झाला. “तिथे तो --- पडला होता.”

वकील मध्येच बोलला, “मला वाटते, मी वरच्या मजल्यावर जावे. तिथे तू मला सर्व काही दाखव. तर आता पुढची गोष्ट सुरु कर.”

“पहिल्यांदा माझा विचार असा होता, की त्याच्या गळ्याभोवतीची दोरी सोडवायची. असे दिसत होते --- “

पण त्याच्याकडे जाऊन हॅरी बोलला, “नको, तो मेला आहे, हे ठीक आहे, पण आपण कशालाही हात लावायला नको.” म्हणून मग आम्ही खाली आलो.

ती अजूनही तशीच बसलेली होती. मी विचारले, ”कुणाला कळवले आहे का?”

ती काही लागते नसल्यासारखी बोलली, “नाही.”

हॅरीने काम असल्यासारखे विचारले, “मिसेस वेट, हे कुणी केले?” तिने काम थांबवले. ती बोलली, “मला माहिती नाही.”

हॅरीने विचारले, “माहिती नाही?”

“तू त्याच्याबरोबर अंथरुणात झोपली नव्हतीस?

ती म्हणाली, “हो.”

“पण मी आतमध्ये होते. कुणीतरी त्याच्या गळ्याभोवती दोरी बांधली व ती घट्ट करून त्याचा गळा आवळला.”

हॅरीने विचारले, “आणि तुला जाग आली नाही?”

ती बोलली, “नाही, मला जाग आली नाही.”

“असे झालेच कसे, अशा रीतीने आम्ही तिच्याकडे बघत असतांना ती म्हणाली, “मी गाढ झोपते.”

“हॅरी तिला अजून काही प्रश्न विचारणार होता, पण मी त्याला म्हटले, हे आपले काम नाही. त्यासंबंधीचे ऑफिसर किंवा शेरीफ ते काम करतील. त्यामुळे हॅरी जाता येईल, तितक्या वेगाने मुख्य रस्त्यावर आला --- टेलीफोन असणारा नदीचा रस्ता!”

तुम्ही ऑफिसर किंवा शेरीफकडे जाणार म्हटल्यावर, तिने काय केले? वकिलाने सर्व काही लिहिण्यासाठी पेन्सिल हातात घेतली.

हॅले कोपऱ्यातील एक खुर्ची दाखवत बोलला, की ती हात एकमेकात गुंफून, खाली बघत, त्या खुर्चीतून उठून या खुर्चीत बसली. मला असे वाटले, की काही बोलायला पाहिजे. म्हणून मी म्हणालो, की मी हे बघायला आलो होतो, की जॉनला टेलीफोन बसवायचा आहे का. यावर ती हसू लागली. मग ती हसायची थांबली व माझ्याकडे घाबरून बघू लागली.”

हलणाऱ्या पेन्सिलीच्या आवाजाने, गोष्ट सांगणाऱ्या माणसाने वर पाहिले. “मला माहिती नाही.” तो घाईने बोलला, “कदाचित ती घाबरली नसेल. ती घाबरली होतीच, असे मला म्हणायचे नाही. लवकरच हॅरी आला. डॉक्टर लॉइड आले. तू आणि मिस्टर पीटर्स, तुम्हाला माहिती नसलेले, हे एवढेच मला माहिती आहे.”

हे तो सुटकेचा निःश्वास टाकत बोलला. सुस्कारा टाकत, जरासा हलला. वकील जिन्याच्या दाराशी गेला.

“मला वाटते, आपण पहिल्यांदा वर जाऊ --- मग बाहेर कोठारात व आसपास जाऊ.

तो थांबला आणि स्वयंपाकघरात सगळीकडे नजर टाकली. त्याने शेरीफला विचारले, “तुमची खात्री आहे, की इथे महत्वाचे काही नव्हते? हेतूवर काही प्रकाश टाकेल, असे काही?”

शेरीफने देखील स्वतःच्या समाधानासाठी सगळीकडे पाहिले.

केससाठी निरुपयोगी अशा इथल्या वस्तु पाहून तो हसून म्हणाला, “इथे तर सगळ्या स्वयंपाकघरातील वस्तू आहेत. वकील एका कपाटाकडे बघत होता. विशिष्ट पण कसेतरी बनवलेले! अर्धे कपाट आणि अर्धे कोनाडा असलेले! त्याचा वरील अर्धा भाग भिंतीत होता आणि खालील अर्धा भाग नेहमीचे स्वयंपाकघरातील सामान ठेवायचे कपाट होते. या वेगळेपणाने त्याला आकर्षित केले. त्याने एक खुर्ची आणून, वरील भाग उघडून आत बघितले. थोड्या वेळाने त्याने चिकट झालेला त्याचा हात बाहेर काढला.

तो पश्चात्तापदग्धतेने बोलला, “इथे सगळा गोंधळ आहे.”

दोन बायका जवळ आल्या आणि शेरीफची बायको मिसेस हॅलेकडे सहानुभूतीपूर्वक पहात म्हणाली, “ओहो, तिचा फळांचा मुरांबा.” ती वकिलाकडे वळली व स्पष्ट केले, “काल रात्री जेव्हा खूप थंडी पडली, तेव्हा ती काळजीत पडली. तिला वाटले शेकोटी बंद पडेल व तिच्या बरण्या कदाचित फुटतील.

मिसेस पीटरचा नवरा जोरात हसू लागला.

“वा! वा! काय बाई आहे! लोणचे, मुरांब्याची काळजी करते आहे आणि नवऱ्याचा खून करते आहे. तिला खून केल्याबद्दल अटक करा.”

तरूण वकीलाने लक्ष देऊन ऐकले. तरूण वकिलाने त्याचे ओठ उघडले,

“मला वाटते, तिला लोणचे, मुरांब्याच्या काळजीपेक्षा अजून कसली तरी काळजी गंभीरपणे वाटत असावी.”

स्वभावाने खूप चांगला, मिसेस हॅलेचा नवरा बोलला, “ओहो, ठीक आहे. बायका क्षुल्लक गोष्टींची काळजी करत असतात.”

दोन बायका अधिक जवळ आल्या. त्यांच्यापैकी कुणीच बोलले नाही. वकिलाला अचानक त्याच्या पद्धती आठवल्या. त्याने त्याच्या भविष्याचा विचार केला.

तरुण राजकीय नेत्याच्या धैर्याने तो म्हणाला, “आणि तरीही, तिची काळजी समजण्यासाठी बायकाच पाहिजेत, नाही का?”

बायका काही बोलल्या नाहीत. ताठ राहिल्या. तो सिंककडे जाऊन त्याचे हात धुऊ लागला. कागदी रोल उलगडून, हात पुसण्यासाठी त्याचा चांगला भाग शोधू लागला.

“घाणेरडा रोल! घर नीट राखलेले नाही, असे तुम्ही म्हणाल का, बायकांनो?”

त्याने सिंकखालील घाणेरड्या भांड्यांवर लाथ मारली.

मिसेस हॅले कडकपणे बोलली, “शेतावर खूप काम करायचे पडले आहे.”

“मला खात्री आहे. तरीही” --- थोडे वाकत ती पुढे बोलली, “मला डिक्सन गावातील काही शेतघरे माहिती आहेत. त्यात कागदी रोल नसतात.”

त्याने थोडा धक्का देऊन, रोलर टॉवेलची बरीचशी लांबी उलगडली. “हे टॉवेल फार लवकर खराब होतात. पुरुष माणसांचे हात नेहमी कदाचित पाहिजे तेवढे स्वच्छ नसतात.”

तो हसत बोलला, “पण तुम्ही तुमच्या स्त्रीत्वाला एकनिष्ठ असता.”

त्याने थांबून तिच्याकडे निरखून पाहिले. “पण तुम्ही आणि मिसेस राईट तर शेजारी होतात. मला वाटते, तुमची मैत्रीही होती.”

मार्था हॅलेने मान हलवली.

“पण अलीकडे मी तिला फारशी भेटले नाही. मी या घरीही आले नाही --- एक वर्षापेक्षा जास्त काळ झाला असेल.”

“आणि असे का? ती तुम्हाला आवडत नाही का?”

ती उत्साहाने बोलली, “मला ती आवडते. शेतकऱ्यांच्या बायकांचा हात सढळ असतो, मिस्टर हेंडरसन.” आणि मग --- तिने स्वयंपाकघरात सगळीकडे नजर टाकली.

त्याने विचारले, “काय झाले?”

ती जवळजवळ स्वतःशीच म्हणाली, “ही कधीच खूप आनंदी जागा वाटली नाही.”

त्याने संमती दर्शवत म्हटले, “नाही वाटली. मला वाटते, कोणीच या जागेला आनंदी म्हणू शकणार नाही. मला वाटते, तिला घर कसे छान ठेवावे, याची काही जाणच नव्हती.”

ती पुटपुटली, “मला माहिती नाही, राईटला तरी ती आहे की नाही. त्याने लगेच विचारले, “म्हणजे तुम्हाला म्हणायचे आहे, की त्या दोघांचे पटत नाही?

ती ठामपणे बोलली, “नाही. मला असे काहीच म्हणायचे नाही.”

त्याच्यापासून दूर जात, ती पुढे बोलली, “पण मला नाही वाटत की जॉन राईट जिथे असेल, ती जागा याहून जास्त आनंदी होऊ शकेल.”

तो म्हणाला, “मिसेस हॅले, मी याबद्दल तुमच्याशी जरा नंतर बोलतो. मला वर काय काय घडले, ते जाणून घ्यायचे आहे.”

तो जिन्याच्या दाराकडे गेला. त्याच्या मागे दोन माणसे होती.

शेरीफने चौकशी केली, “मला वाटते, मिसेस पीटर्सने जे केले ते योग्यच केले असेल?”

“तिला मिसेस राईटसाठी काही कपडे घ्यायचे होते आणि काही फुटकळ

वस्तू. काल आम्ही इतक्या घाईत निघालो.”

स्वयंपाकघरातील सर्व वस्तूंमध्ये एकटूयाच असणाऱ्या त्या दोघींकडे वकिलाने बघितले.

त्याचे डोळे शेरीफच्या बायकोमागे उभ्या असलेल्या, मोठ्या शेतकरी बाईकडे लागले होते. तो मिसेस पीटर्सना म्हणाला, “हो, मिसेस पीटर्स, ते आमच्यापैकी एक आहेत.” तो हे जबाबदारीच्या जाणीवेने म्हणाला, “मिसेस पीटर्स, काही उपयोगी सापडले, तर तुमचे लक्ष असू द्या. काही सांगता येत नाही. कदाचित तुम्हा बायकांना काही हेतू सापडेल आणि आपल्याला तेच हवे आहे.”

शेरा मारण्यासाठी तयार झालेल्या एका दिखाऊ माणसाच्या फॅशन दाखवण्यानंतर, मिस्टर हॅलेने त्याचा चेहरा चोळला.

तो म्हणाला, “पण स्त्रियांना या प्रकरणातील पुरावा शोधायचा असल्याबद्दल काही माहिती आहे का?” एवढे बोलून, तो  इतरांच्या मागे जिन्याच्या दाराशी गेला.

त्या बायका पदरव ऐकत, काही हालचाल न करता शांत राहिल्या. आवाज प्रथम वरील खोलीतून व नंतर जिन्यावरून येत होता. नंतर काही विचित्र गोष्टीपासून सुटका झाल्याच्या आविर्भावात, मिसेस हॅले वकिलाने लाथेने उडवलेली सिंकखालील घाणेरडी भांडी नीट रचून ठेऊ लागल्या.

ती थोडी चिडत म्हणाली, “मला पुरुष मंडळींनी स्वयंपाकघरात आलेले आवडत नाही. “नको त्या गोष्टीत नाक खुपसून टीका करणे”

शेरीफची बायको घाबरत, शरण आल्यासारखी म्हणाली, “ते फक्त त्यांचे कर्तव्य म्हणून आले होते.”

ते काहीतरी नको ते करत असल्याच्या भावनेने, मिसेस हॅले म्हणाल्या, “कर्तव्य म्हणून आले, तर ठीक आहे. पण माझ्या अंदाजाप्रमाणे, शेकोटी पेटवायला आलेला तो शेरीफ ती न पेटवताच गेला. “ तिने रोलरला एक धक्का

दिला. मी लवकरच त्याचा विचार करेन. तिच्या घरात सगळे एवढे घाईने शिरले होते आणि तरीही तिचे घर चकचकीत असण्याची फोल अपेक्षा तो करत होता.”

तिने स्वयंपाकघरात नजर फिरवली. ते इतके काही वाईट रीत्या पसरलेले नव्हते. खालील फळीवरील साखरेच्या डब्याकडे तिने पाहिले. त्याचे झाकण निघाले होते. त्याच्या कडेला एक अर्धी भरलेली कागदी पिशवी पडली होती.

मिसेस हॅले त्याकडे गेली.

ती हळूहळू स्वतःशी बोलली, “ती यात काही भरत होती.”

तिच्या मनात तिच्या स्वयंपाकघरातील अर्धवट चाळलेल्या पिठाचा विचार आला. तिला अचानक मध्येच बोलावले गेले. त्यामुळे तिने पसारा तसाच टाकला होता. मिनी फॉस्टरला कशामुळे एवढी घाई झाली होती? ते काम अर्धवट का पडले? ती ते पुरे करायला निघाली. अर्धवट कामांचा तिला नेहमी त्रास होई. तिने आजूबाजूला बघितले आणि पाहिले की मिसेस पीटर्स तिला बघत होती --- काम सुरु करून, काही कारणाने अर्धवट पडलेले काम मिसेस पीटर्सने बघावे, असे तिला वाटत नव्हते.

ती बोलली, “तिच्या मुरांबे व लोणचाच्या बरण्या लाजलावण्या आहेत.”

एवढे बोलून ती वकिलाने उघडलेल्या कपाटापाशी गेली. असे पुटपुटत खुर्चीवर चढली, “मला नवल वाटते, ते सर्व नाहीसे झाले आहे.”

ते दृष्य बघणे पुरेसे नकोसे होते. शेवटी ती म्हणाली, “पण इथे एक धड अवस्थेत दिसते आहे.” तिने ते उजेडात धरले. “या चेरीज आहेत.” तिने परत पाहिले व बोलली, “फक्त याच धड अवस्थेत दिसत आहेत.”

एक सुस्कारा टाकत, ती खुर्चीवरुन उतरली. सिंककडे गेली व बाटली धुतली. गरम हवेमुळे तिचे खपून केलेले काम फुकट गेल्याबद्दल, तिला फारच वाईट वाटले असणार. तिला गेल्या उन्हाळयात तिने केलेला चेरीचा मुरांबा आठवला.

तिने बरणी टेबलावर ठेवली. अजून एक सुस्कारा टाकून ती परत डोलणाऱ्या खुर्चीत बसायला गेली. ती सरळ झाली. मागे झाली. अर्धवट वळली. काहीतरी कारणाने ती खुर्चीत बसली नाही. इकडे तिकडे बघत उभी राहिली. काल तिथे बसलेली बाई ॲप्रनला प्लेट्स घालत असलेली तिला दिसली.

तिला शेरीफच्या बायकोचा नाजूक आवाज आला. "पुढील खोलीच्या कोनाड्यातून मला त्या वस्तू आणायला हव्यात." तिने दुसऱ्या खोलीचे दार उघडले. आत जायला निघाली आणि मागे फिरली. तिने उदास होत विचारले, "मिसेस हॅले, तुम्ही माझ्याबरोबर येता का? तुम्ही मला त्या वस्तू आणायला मदत करू शकाल."

त्या लवकरच मागे झाल्या --- त्या रिकाम्या बंद, थंडगार खोलीत जाण्यात अर्थ नव्हता.

मिसेस पीटर्सने तिच्या हातातील वस्तू टेबलावर टाकल्या व घाईने स्टोव्हपाशी जात बोलली, "अरे बापरे!"

गावामध्ये अडकलेल्या बाईला हवे असलेले कपडे तपासत मिसेस हॅले उभी राहिली.

ठिकठिकाणी शिवलेला एक ओंगळ काळा स्कर्ट हातात धरत, ती उद्गारली, "राईट मेला."

"मला वाटते, त्यामुळेच तिने सर्व तिच्यापाशीच ठेवले असावे. मला वाटते तिला असे वाटले असावे, की ती तिच्या वाट्याचे काम करू शकणार नाही आणि मग जेव्हा तुम्हाला ओंगळ वाटते, तेव्हा तुम्ही तुमच्या कामात आनंद घेऊ शकत नाही. जेव्हा ती गावातील चर्चमधील कोरस गाणी गाणारी एक मुलगी मिनी फॉस्टर होती, तेव्हा ती छान कपडे घालत असे आणि उत्साहात असे. पण ते --- ओहो, तेव्हा ते वीस वर्षांपूर्वीचे होते." ज्यात कोवळीक आहे अशा काळजीपूर्वकतेने तिने ओंगळ कपड्यांची घडी केली आणि ते टेबलाच्या

कोपऱ्यात ढीग करून ठेवले. तिने मिसेस पीटर्सकडे पाहिले आणि त्या बाईच्या चेहऱ्यावर असे काही होते, की ज्याने ती चिडली.

ती स्वतःशी बोलली, "तिला काही पर्वा नाही. मिनी फॉस्टर जेव्हा मुलगी होती, तेव्हा तिचे कपडे छान होते का, याने तिला काय फरक पडत होता?"

मग तिने परत पाहिले. तिला खात्री नव्हती. खरे तर, तिला कधीही मिसेस पीटर्सबद्दल काही खात्री नव्हती. तिची पद्धत फार अवघड होती आणि तरीही तिचे डोळे खूप काही कळल्यासारखे दाखवत, मिसेस हॅलेने विचारले, "हे सर्व तुम्ही घेऊन जाणार होतात का?"

शेरीफची बायको म्हणाली, "नाही." ती म्हणाली, तिला ॲप्रन हवा होता. तिच्या उदासवाण्या पद्धतीने ती बोलली, "मजेशीर गोष्ट हवी असणे! कारण तुरुंगात फारसे काही खराब होत नाही, पण मळते, हे सर्व जण चांगले जाणतात. तिला फक्त एवढे जाणवून द्यायचे आहे, की तिला जास्त नैसर्गिक वाटावे. जर तुम्हाला ॲप्रनची सवय असेल --- "

ती म्हणाली की ते कपाटातील सर्वात खालच्या खणात होते. हो --- हे बघा आहेत. आणि मग तिची लहानशी शाल नेहमी जिन्याच्या दारावर लटकत असे.

तिने वरच्या मजल्यावर जाणाऱ्या मागील दारातून छोटी करडी शाल आणली व मिनिटभर त्याकडे बघत उभी राहिली.

अचानक मिसेस हॅलेने भरभर दुसऱ्या बाईकडे एक पाऊल टाकले.

"मिसेस पीटर्स!"

"काय मिसेस हॅले?"

"तुम्हाला वाटते का, की तिने हे केले असेल?"

मिसेस पीटर्सच्या घाबरलेल्या डोळ्यात दुसरे काही तरळले.

ती म्हणाली. “ओहो, मला माहिती नाही.” तिचा आवाज त्या विषया पासून दूर चालला होता.

मिसेस हॅले ठामपणे बोलली, “मला नाही वाटत, की तिने हे केले असेल. ॲप्रन व लहानशा शालीबद्दल विचारणे आणि तिच्या फळांची काळजी करणे.”

मिस्टर पीटर्स म्हणाले, “वरील खोलीतून पायरव आला.” ती थांबली. वर पाहिले. मग खालच्या आवाजात बोलली, “मिस्टर पीटर्स म्हणतात, हे तिच्यासाठी वाईट दिसते. मिस्टर हेंडरसन भयानक फसवे व विरोधभासात्मक बोलतात. ती जागी झाली नाही, असे सांगून, ते तिचे हसे करणार आहेत.

क्षणभर मिसेस हॅलेला काही उत्तर सुचले नाही. मग ती बोलली, “मला वाटते, त्याच्या गळ्याभोवती दोरी आवळली जात असतांना --- जॉन राईट जागा झाला नाही.”

मिसेस पीटर्स म्हणाली, “नाही, हे विचित्र आहे. त्याना वाटते, की माणसाला मारायचा हा मजेशीर प्रकार आहे.”

ती हसू लागली व अचानक थांबली.

मिसेस हॅले सहजपणे म्हणाली, “मिस्टर हॅले तेच तर म्हणाले. घरात बंदूक होती. तो म्हणतो आहे, की तेच त्याला समजत नाही.”

बाहेर येत, मिस्टर हेंडरसन म्हणाले, “केससाठी कसली गरज असते तर हेतू. अचानक आलेला राग किंवा काही तशीच भावना.”

मिसेस हॅले बोलली, “मला तर इथे आसपास रागाची काही चिन्हे दिसत नाहीत. मला नाही --- “

ती थांबली. जसे काही तिचे मन कशात तरी अडकले. स्वयंपाकघराच्या मध्यभागी असलेल्या ताटल्या पुसायच्या फडक्यावर तिची नजर गेली.. ती हळूहळू टेबलाशी गेली. त्याचा अर्धा भाग स्वच्छ होता, तर उरलेला घाणेरडा होता. तिचे

डोळे नकळत साखरेच्या डब्याकडे व त्याशेजारी असलेल्या अर्ध्या रिकाम्या कागदी पिशवीकडे गेले. काम सुरु झाले --- आणि संपले नाही.

क्षणभराने ती थोडी मागे झाली व सुटका झाल्यासारखे म्हणाली, "त्यांना वर काय सापडते आहे, याचे मला नवल वाटते. मला आशा आहे की, तिने वर काही गोंधळ करून ठेवला नसेल.

"तुला माहिती आहे" --- ती थांबली व बळ एकत्र करून बोलली, "हे काही गुप्त दिसते आहे. तिला गावात कुलुपबंद करून ठेवायचे आणि इथे येऊन, तिच्या घरातच तिच्याविरुद्ध पुरावा शोधायचा.

शेरीफची बायको म्हणाली, "पण मिसेस हॅले, कायदा हा कायदा आहे."

मिसेस हॅले थोडक्यात उत्तरल्या, "."मला ते मान्य आहे."

ती स्टोव्हकडे वळली. त्या विस्तवाविषयी बढाई मारत काही बोलू लागली. तिने त्यावर मिनिटभर काम केले. आणि जेव्हा ती सरळ झाली तेव्हा ती दिमाखाने मोडक्या कडांवर चिमटा धरत बोलली,

"कायदा हा कायदा आहे --- आणि वाईट स्टोव्ह हा वाईट स्टोव्ह आहे. तिला यावर स्वयंपाक करायला कसे काय आवडते? तिने ओव्हनचे दार उघडले आणि त्याबद्दल ती मतप्रदर्शन करू लागली. पण ती स्वतःच्याच विचारात गढून गेली, याचा अर्थ काय होईल, वर्षामागून वर्षे त्या स्टोव्हशी कशी झुंज द्यायची?

मिनी फॉस्टरला ओव्हनमध्ये भाजून काढायचा विचार तिच्या मनात आला. "व्यक्तीला नाराज केले जाते आणि मग तिचा धीर गळून पडतो." असे मिसेस पीटर्सला बोलतांना ऐकून, ती चक्रावून गेली. शेरीफच्या बायकोने स्टोव्हकडून सिंककडे बघितले --- बाहेरून आणलेल्या पाण्याच्या पेल्याकडे पाहिले. दोन्ही बायका तिथे शांत उभ्या राहिल्या. त्यांना वरती पुरुष माणसांचा पदरव ऐकू येत होता. ते स्वयंपाकघरात काम करणाऱ्या बाईविरुद्ध पुरावा शोधत होते.

ते ज्या पद्धतीने वस्तूंकडे बघत होते, वस्तूच्या आरपार दुसऱ्या कशाकडेतरी बघत होते, ते आता शेरीफच्या बायकोच्या डोळ्यावर आले. नंतर मिसेस हॅले तिला म्हणाली, "मिसेस पीटर्स, तुम्ही तुमच्या वस्तूंना त्यांनी हात लावायची तयारी ठेवा. आपण बाहेर जाऊ, म्हणजे त्याचे तुम्हाला एवढे काही वाटणार नाही."

मिसेस पीटर्स खोलीच्या मागील बाजूस गेली आणि तिने घातलेला लांब फरचा कोट टांगून ठेवला. क्षणभराने कापडाचे तुकडे असलेली मोठी शिवणाची पिशवी हातात धरून ती उद्गारली, "बहुधा, ती गोधडी शिवत होती."

त्यातील काही तुकडे मिसेस हॅलेने टेबलावर पसरले. त्यातील बरेचसे जवळजवळ ठेऊन ती म्हणाली, "हा मोठी गोधडी शिवायचा बेत दिसतो. ती छान होईल, नाही का?"

त्या त्या गोधडीत इतक्या गुंतून पडल्या होत्या, की त्यांना जिन्यात वाजलेली पाऊले कळली नाहीत. जिन्याचे दार उघडणार, तोच मिसेस हॅले म्हणाली, "तुम्हाला काय वाटते, ती हे तुकडे गोधडीला शिवणार होती, की नुसत्या गाठी मारणार होती?

शेरीफने त्याचे हात पसरले. "त्यांना आश्चर्य वाटते आहे, की ते तुकडे गोधडीला जोडणार होती, की नुसत्या गाठी मारणार होती! त्या बायकांच्या पद्धतीसाठी ते हसले. स्टोव्हवर त्यांनी हात गरम केले. मग वकील थोडक्यात बोलला, "आपण बाहेर कोठारात जाऊ आणि ते स्वच्छ करून घेऊ."

तीन माणसे बाहेर गेल्यावर , दार लावल्यावर, मिसेस हॅले पश्चात्तापपूर्वक म्हणाली, "मला नाही वाटत की तिथे फार काही विचित्र आहे. ते पुरावा गोळा करेपर्यंत आपण थांबलो आहोत आणि लहानसहान गोष्टी करण्यात आपला वेळ घालवतो आहोत. यात हसण्यासारखे काही आहे, असे मला वाटत नाही."

शेरीफची बायको क्षमायाचनेच्या सुरात बोलली, "अर्थात त्यांच्या मनात

भयंकर महत्वाच्या गोष्टी आहेत.”

ते गोधडीच्या तुकड्यांचे निरीक्षण करायला आले. मिसेस हॅले ते कसे छान व सारख्या पद्धतीने शिवले आहेत ते बघतांना ज्या बायकांनी ते शिवले, त्यांच्या विचारात गुंतली होती. जेव्हा तिने शेरीफच्या बायकोला विचित्र आवाजात असे म्हणतांना ऐकले,

“अरेच्चा, हा एक बघा.”

तिने तो तुकडा उचलून घेऊन बघितला.

मिसेस पीटर्स त्रासदायक आवाजात बोलली, “इतर सर्व एकसारखे व छान आहेत --- पण --- हा. असे दिसते आहे, की ती काय करणार आहे, ते तिला समजत नव्हते!”

त्यांचे डोळे मिळाले --- काहीतरी चमकले व त्यांच्यामधून गेले. नंतर जणू त्याचा परिणाम म्हणून, त्या एकमेकींपासून दूर झाल्या. एक क्षण मिसेस हॅले तिथे हात दुमडून, बसली. तो एक तुकडा इतर तुकड्यांहून वेगळा शिवलेला होता. मग तिने गाठ सोडवून दोरा ओढला.

शेरीफच्या बायकोने दचकून विचारले, “मिसेस हॅले, तुम्ही काय करत आहात?

मिसेस हॅले हळूच म्हणाली, “जे एक दोन टाके चांगले घातले गेले नाहीत, ते उसवते आहे.”

थोड्या नाईलाजाने मिसेस पीटर्स म्हणाली, “मला नाही वाटत, की आपण इथे कशाला हात लावावा.”

मिसेस हॅले तसेच करत उत्तरली, “मी या बाजूचा शेवट पुरा करते.” तिने सुईत दोरा घातला व खराब टाके उसवून, तिथे शांतपणे चांगले टाके घालू लागली. मग तिने तो थंड, घाबरट  आवाज ऐकला, “मिसेस हॅले,”

काय मिसेस पीटर्स?”

“ती कशामुळे इतकी उदास होती?”

जसे काही ती गोष्ट इतका वेळ घालवण्यायोग्य नसल्यासारखे, मिसेस हॅले म्हणाली, “ओहो, मला माहिती नाही. ती अशी का होती, ते मला माहिती नाही. पण जेव्हा मी खूप दमलेली असते, तेव्हा मी असे फार विचित्र टाके घालते.”

तिने दोरा तोडला आणि डोळयाच्या कोपऱ्यातून, मिसेस पीटर्सकडे पाहिले. छोटासा, वाकलेला शेरीफच्या बायकोचा चेहरा ताठर झालेला पाहिला. तिचे डोळे कशात तरी डोकावून बघत होते. पण पुढच्याच क्षणी ती हलली आणि तिच्या क्षीण, बिनफसव्या आवाजात बोलली, “मला ते कपडे गुंडाळून ठेवले पाहिजेत. आपल्याला वाटते आहे, त्यापेक्षा ते लवकरच इथे येतील. मला नवल वाटते, मला कागद आणि दोरा कुठे मिळेल.”

इकडेतिकडे बघत मिसेस हॅले म्हणाली, “कदाचित त्या कपाटात.”

एक वेडावाकडा टाका दुरुस्त करायचा राहिला होता. मिसेस पीटर्सची पाठ वळली. मार्था हॅलेने तो दुरुस्त केला. त्याची इतर ठिकाणच्या नाजूक, छान टाक्यांबरोबर तुलना केली.

फरक चक्रावून टाकणारा होता. मग तो भाग हातात धरून, तिला विचित्र वाटू लागले. जसे काही आधीचे टाके घातलेल्या बायका हे बघत होत्या आणि तिच्याशी बोलू बघत होत्या.

मिसेस पीटर्सचा आवाज आल्याने ती दचकली. “इथे पक्ष्यांचा पिंजरा आहे. मिसेस हॅले, तिच्याकडे पक्षी होते का?”

“मला नाही माहित, होते की नाही.” मिसेस पीटर्सने धरलेला पिंजरा बघण्यासाठी ती वळली. ती सुस्कारा टाकत बोलली, “मी इथे खूप दिवसात आलेली नाही. गेल्या वर्षी एक मनुष्य छोटे, पिवळे, गाणारे पक्षी विकायला आला होता --- पण तिने तो घेतला का, हे मला माहिती नाही. कदाचित घेतला असेल. तो पक्षी छान गात असे.”

मिसेस पीटर्सने स्वयंपाकघरात अवतीभवती पाहिले.

“इथे पक्षी असावा हे मजेशीर वाटते.” ती अर्धवट हसली --- मध्ये अडथळा ठेवायचा प्रयत्न. “पण तिच्याकडे एखादा पक्षी असला पाहिजे --- नाहीतर तिच्याकडे पिंजरा कशाला असेल? मला नवल वाटते, त्या पक्ष्याला काय झाले असेल?”

तिचे शिवणकाम करतांना मिसेस हॅले म्हणाली, “मला वाटते, मांजराने त्याला मारले असेल.”

“नाही. तिच्याकडे मांजर नव्हते. काही लोकांना असतात, तशा तिला मांजराबद्दल भीतीच्या भावना होत्या. जेव्हा काल त्यांनी तिला आमच्या घरी आणले, तेव्हा माझे मांजर खोलीत आले आणि ती उदास होऊन मला त्याला बाहेर घालवायला सांगू लागली.”

मिसेस हॅले हसत म्हणाल्या, “माझी बहीण बेसी तशी आहे.”

शेरीफच्या बायकोने काही उत्तर दिले नाही. शांततेमुळे मिसेस हॅले वळल्या. मिसेस पीटर्स पिंजऱ्याचे निरीक्षण करत होत्या.

ती हळूच म्हणाली, “याच्या दाराकडे बघा. तो मोडला आहे. एक सळई ओढून काढली आहे.”

मिसेस हॅले जवळ आली.

“असे दिसते आहे, कुणीतरी त्याच्या बरोबर दांडगाई केली आहे.”

परत त्यांच्या --- चक्रावून गेलेल्या, प्रश्नांकित व घाबरट नजरा मिळाल्या. क्षणभर कुणीच बोलले वा हलले नाही. मग मिसेस हॅले वळून लांब जात, मोकळेपणे बोलल्या, “जर ते काही पुरावा शोधत असतील, तर त्यांनी हे बघावे, असे मला वाटते. मला ही जागा आवडली नाही.”

मिसेस पीटर्स म्हणाल्या, “तुम्ही माझ्याबरोबर आलात, यामुळे मी आनंदी

झाले.” त्यांनी पिंजरा टेबलावर ठेवला व त्या खाली बसल्या. “इथे एकटे बसून मला एकाकी वाटले असते.”

तिच्या आवाजात सहजता आणत मिसेस हॅले म्हणाली, “हो, नक्कीच, नाही का?

तिने शिवणकाम उचलले पण आता तिने ते तिच्या मांडीवर ठेवले. ती वेगळ्या आवाजात पुटपुटली, “

“मिसेस पीटर्स, पण मला काय वाटते, ते मी तुम्हाला सांगते. ती इथे असतांना मी केव्हातरी यायला हवे होते. खरच, यायला हवे होते.”

“पण मिसेस हॅले, तुमचे घर आणि तुमची मुले, यात, तुम्ही फार व्यग्र होतात.”

मिसेस हॅले पटकन म्हणाल्या, “तरी मी येऊ शकले असते. पण हे घर आनंदी नसल्याने, मी दूर राहिले. पण म्हणूनच मी यायला हवे होते. मी --- “ तिने आसपास पाहिले --- मला ही जागा कधीच आवडली नाही. कदाचित ही खाली दरीसारख्या भागात असल्याने असेल. इथून रस्ता दिसत नाही. मला माहित नाही कशी, पण ही फार एकाकी जागा आहे. मी मिनी फॉस्टरला भेटायला इथे कधीतरी यायला हवे होते. आता मला दिसते आहे --- “ काही भावना तिने शब्दात मांडल्या नाहीत.

मिसेस पीटर्स म्हणाल्या, “जाऊ दे, त्याचा खेद करू नका. काही तरी झाल्याशिवाय, हे दुसऱ्या लोकांना कसे वाटते, ते आपण बघत नाही.

शांततेनंतर, मिसेस हॅले विचार करत म्हणाल्या, “मुले नसल्याने काम कमी असते. त्यामुळे घर शांत रहाते आणि राईट दिवसभर कामाला बाहेर --- आणि तो आला तरी, काही विशेष फरक नाही. मिसेस पीटर्स, तुम्हाला जॉन राईट माहिती होता का?”

नाही. मी त्याला गावात पाहिले होते. ते म्हणत, तो चांगला माणूस होता.”

जॉन राईटची शेजारीण गंभीरपणे म्हणाली, “हो, चांगला. तो पित नसे. दिलेला शब्द पाळत असे. कर्ज फेडत असे. पण मिसेस पीटर्स, तो कठीण माणूस होता. त्याच्याबरोबर दिवसाचा वेळ घालवायचा म्हणजे --- ती थांबून, थोडी शहारली. म्हणजे थंडी हाडापर्यंत जाण्यासारखे होते.”

तिच्यापुढील टेबलावर ठेवलेल्या पिंजऱ्याकडे तिचे लक्ष गेले. ती कटूपणे म्हणाली, “मला वाटते, तिला एखादा पक्षी हवा होता.”

अचानक ती पुढे वाकून पिंजऱ्याकडे निरखून बघू लागली. पण मग काय कारणाने तिने तो आणला नसेल?

मिसेस पीटर्स म्हणाल्या, ‘मला माहिती नाही. तो आजारी पडून मेला असेल.”

पण असे म्हटल्यावर तिने जाऊन, मोडके दार झुलवले. त्याने भारल्या गेल्यासारख्या दोघी त्याकडे बघत राहिल्या.

मिसेस हॅलेने विचारले, “तुम्हाला ती माहिती नाही का?

शेरीफची बायको म्हणाली, “त्यांनी काल तिला आणेपर्यंत नाही.”

“ती --- मला वाटते ती पिंजऱ्यातील पक्ष्यासारखीच होती.”

“खरेच गोड आणि छान, पण जरा घाबरट आणि --- थरथरणारी होती. ती --- कशी --- बदलली!”

ती बराच वेळ स्तब्ध राहिली. शेवटी काही आनंदी विचाराने आणि सुटका झाल्यासारखे, रोजच्या जगात येत, ती उद्गारली, “मिसेस पीटर्स, तुम्ही हा पिंजरा घेऊन का जात नाही? त्यामुळे कदाचित तिचे मन रीझेल."

शेरीफची बायको म्हणाली, “ही छान कल्पना आहे.” जसे काही तिलाही साध्या दयाळूपणाच्या वातावरणात यायचे होते. “असे करण्यासाठी कोणाची हरकत नसेल, नाही का? आता मी काय न्यावे बरे? मला नवल वाटते तिचे कापडाचे तुकडे इथे तिच्या सामानात आहेत?”

त्या शिवणाच्या पिशवीकडे वळल्या.

मिसेस हॅले कापडाची गुंडाळी उलगडत बोलली, “हे काही लाल आहे. त्याखाली खोके होते. इथे तिची कात्री आहे आणि इतर गोष्टी.” तिने त्या हातात धरल्या. “काय छान खोके आहे.

ती जेव्हा मुलगी होती, तेव्हाच हे तिच्याकडे होते --- खूप काळापूर्वीपासून.”

तिने क्षणभर ते हातात धरले व एक सुस्कारा टाकत, उघडले. क्षणार्धात तिचा हात तिच्या नाकाशी गेला.

“का --- ?”

मिसेस पीटर्स जवळ आली. मग उलटी फिरली.

मिसेस हॅले डगमगत बोलली, “या रेशमी कापडात काहीतरी गुंडाळलेले आहे.”

मिसेस पीटर्स खोल आवाजात म्हणाली, “ही कात्री नाही.

तिचा हात स्थिर नव्हता. मिसेस हॅलेने ते रेशमी कापड उचलले. ती ओरडली, “ओहो, मिसेस पीटर्स! हे --- “

मिसेस पीटर्स जवळ आली. ती कुजबुजली, “हा पक्षी आहे. त्याची मान --- त्याच्या मानेकडे बघा --- ती सर्व --- दुसरी बाजूही.”

तिने खोके तिच्यापासून लांब धरले. शेरीफची बायको वाकून, पुन्हा जवळ आली.

हळू व खोल आवाजात ती बोलली, “कुणीतरी याची मान मुरगळली आहे.”

मग दोन्ही स्त्रियांच्या नजरा पुन्हा मिळाल्या --- यावेळेस काही समजल्याच्या थाटात, मिळाल्या. त्यांची भीती वाढली. मिसेस पीटर्सनी मेलेल्या

पक्ष्याकडून दार मोडलेल्या पिंजऱ्याकडे बघितले. दाराबाहेरून आवाज आला.

मिसेस हॅलेने ते खोके गोधडीच्या तुकड्यांखाली पिशवीत लपवले आणि धपकन खुर्चीत बसली. मिसेस पीटर्स टेबलाला धरून उभी राहिली. वकील आणि शेरीफ बाहेरून आत आले.

वकील गंभीर गोष्टींकडून हास्यविनोदाकडे वळला. ती हे तुकडे गोधडीला शिवणार होती, की नुसत्या गाठी मारणार होती, हे तुम्ही ठरवले का?

शेरीफच्या बायकोने गोंधळून सुरवात केलो, "आम्हाला वाटते, ती --- गाठी मारणार होती."

ते शेवटचे शब्द उच्चारताना तिचा आवाज बदलल्याचे वकील दुसरे काही करत असल्याने, त्याच्या लक्षात आले नाही.

तो सहनशीलपणे बोलला, "ओहो, माझी खात्री आहे, हे फार रुचीपूर्ण आहे. त्याचे लक्ष पिंजऱ्याकडे गेले.

"पक्षी उडून गेला का?"

मिसेस हॅले आवाज चमत्कारीकपणे सर्वसामान्य ठेवत म्हणाली, "आम्हाला वाटते तो मांजराच्या तावडीत सापडला असावा."

काही विचार करत असल्यासारखा, तो वरखाली चालत होता.

त्याने अनवधानाने विचारले, "इथे मांजर आहे का?"

मिसेस हॅलेने शेरीफच्या बायकोकडे बघितले.

मिसेस पीटर्स म्हणाली, "आता नाही. तुम्हाला माहिती आहे का, जे श्रद्धाळू असतात. ते पक्षी सोडून देतात." ती तिच्या खुर्चीत मटकन बसली.

वकिलाने तिच्याकडे काही लक्ष दिले नाही. तो भाषण चालू ठेवण्याच्या इराद्याने पीटरला म्हणाला, "इथे बाहेरून कोणी आलेले दिसत नाही."

"त्यांची स्वतःची दोरी. आता आपण परत वरती जाऊ आणि छडा

लाऊ. कोणीतरी माहीतगार असणार --- "

त्यांच्यामागे जिन्याचे दार लागले आणि त्यांचे आवाज ऐकू येईनासे झाले. दोन बायका निःश्चल बसल्या. त्या एकमेकींकडे बघत नव्हत्या. पण कशात तरी डोकावत होत्या व मागे बघत होत्या. त्या जे बोलत होत्या, त्याबद्दल त्यांना भीती वाटत होती. पण बोलल्याशिवाय तर रहावत नव्हते.

मार्था हॅले हळू व सावकाश म्हणाली, "तिला पक्षी आवडत असत. ती त्याला त्या छान पेटीत पुरणार होती."

मिसेस पीटर्स श्वास रोकत म्हणाली, "मी जेव्हा मुलगी होते, तेव्हा माझ्याकडे पिल्ले होती. एका मुलाने कुऱ्हाड घेतली आणि माझ्या डोळ्यांसमोर --- मी तिथे पोचण्यापूर्वी --- तिने लगेच चेहरा झाकून घेतला. त्यांनी जर मला अडवले नसते, तर मी – "

तिने जिन्यातून येणाऱ्या पदरवाकडे पाहिले आणि बोलणे अशक्तपणे संपवले, "त्या मुलाला जखमी केले असते."

मग त्या न हलता, न बोलता बसल्या.

शेवटी मिसेस हॅलेनी विचित्र वाटून, सुरु केले, "मला नवल वाटते, हे कसे असेल, की कोणीच मुले अवतीभवती नाहीत." तिची नजर स्वयंपाकघरावरून फिरली, जसे काही या स्वयंपाकघरात एवढी वर्षे काय चालले होते, याचा ती विचार करत होती. ती बोलली,

"राईटला पक्षी आवडत नसत. गाणारे काहीच आवडत नसे. ती गात असे. त्याने तेही मारले." तिचा आवाज दाटला.

मिसेस पीटर्स अस्वस्थपणे हलली.

"अर्थात आपल्याला माहिती नाही, की पक्ष्याला कुणी मारले."

मिसेस हॅलेचे उत्तर होते, "मला जॉन राईट माहिती आहे."

शेरीफची बायको म्हणाली, “मिसेस हॅले, त्या रात्री या घरात ती भयंकर गोष्ट केली गेली. मनुष्य झोपलेला असतांना त्याला मारणे --- त्याचा श्वास अडेल, अशा तऱ्हेने त्याच्या गळ्याभोवती दोरी बांधणे.”

मिसेस हॅलेचा हात पिंजऱ्याकडे गेला.

“त्याची मान. त्याचा श्वास अडेल, अशा तऱ्हेने --- “

मिसेस पीटर्स रानटीपणे कुजबुजल्या, “आपल्याला माहिती नाही, त्याला कुणी मारले.”

“आपल्याला माहिती नाही.”

मिसेस हॅले हलली नाही. जर वर्षानुवर्षे काहीच न घडता गेली, तर मग निदान एक तुमच्यासाठी गाणारा पक्षी तरी --- पण हे भयानक आहे --- पक्षी मरून गेला तर --- अजूनच भयानक आहे.”

हे जणू काही ती नव्हे, तर तिच्या आतले कुणी बोलले आणि मिसेस पीटर्सला समजले, की तिला हे माहिती नव्हते.

ती विचित्र, एकसुरी आवाजात म्हणाली, “मरणे म्हणजे काय, हे मला माहिती आहे. जेव्हा डाकोटामध्ये आम्ही रहात होतो आणि माझे पहिले बाळ --- दोन वर्षांचे असतांना --- दगावले आणि नंतर परत झालेच नाही --- “

मिसेस हॅले शहारली.

तुला काय वाटते, “त्यांना पुरावा केव्हा सापडेल?”

त्याच तऱ्हेने मिसेस पीटर्स परत म्हणाली, “मरणे म्हणजे काय, हे मला माहिती आहे.” मग तीही मागे झाली. “मिसेस हॅले, कायद्याप्रमाणे गुन्हेगाराला शिक्षा होणारच.” ती तिच्या ठाम पद्धतीने बोलली.

उत्तर होते, “तुम्ही मिनी फॉस्टरला बघायला पाहिजे होते. “ती जेव्हा पांढरा ड्रेस घाले, निळी रिबीन बांधे तेव्हा ती चर्चच्या रांगेत उभी राहून, गाणे

म्हणे.”

त्या लहानशा मुलीचे मनःपटलावरील चित्र आणि ती वीस वर्षे शेजारी रहात असे, ही गोष्ट आणि तिला जिवंत काही न मिळाल्याने येऊ शकणारे मरण हे सगळे तिच्या अंगावर धाऊन आले.

ती रडक्या सुरात बोलली, “ओहो, मी इथे अधूनमधून यायला हवे होते. न येणे गुन्हा होता. त्याला कोण शिक्षा करणार?”

मिसेस पीटर्स जिन्याकडे घाबरट चेहऱ्याने बघत, बोलली, “ते एवढे मनावर घेऊ नको.”

“तिला मदतीची गरज आहे, हे मला समजायला पाहिजे होते. तुम्हाला सांगते, मिसेस पीटर्स, हे विचित्र आहे. आणि आपण फार लांब रहातो. आपण सर्व एकाच परिस्थितीतून जात असतो फक्त वेगळ्या प्रकारची एकच गोष्ट! जर तसे नसते, तर तुम्ही आणि मी का समजलो असतो? आता, या मिनिटाला आपल्याला जे कळले, ते का कळले असते?”

तिने डोळा चोळला. नंतर टेबलावरील फळांची टोपली पाहून, ती त्याकडे गेली आणि म्हणाली, “जर तुमच्या जागी मी असते, तर मी तिला फळे नाहीशी झाल्याचे सांगितले नसते. तिला सर्व काही ठीक असल्याचे, सांगितले असते. हे घे. ---तिच्याजवळ हे सिद्ध करण्यासाठी --- तिला हे कधीच कळणार नाही की हे फुटले होते की नव्हते.”

ती निघून गेली.

मिसेस पीटर्स फळांच्या बाटलीपाशी गेली, जसे काही तिला ती घेऊन आनंद झाला होता होता --- जसे काही ती एखाद्या ओळखीच्या वस्तूला हात लावत होती. तिला काही करायचे होते. ती उठली. ती ते गुंडाळण्यासाठी, काही शोधू लागली. तिने खोलीतून आणलेल्या कपड्यांच्या ढिगातून तिने परकर घेतला आणि उदासीनतेने तो बरणीभोवती गुंडाळू लागली.

उंच, खोट्या आवाजात ती बोलली, "हे चांगले आहे, की पुरुष माणसे आपल्याला ऐकू शकत नाही आहेत!"

तिने घाईने सर्व काही एखाद्या मृत छोट्या पिवळ्या पक्ष्याप्रमाणे पसरून ठेवले. जसे काही त्याचा संबंध --- ओहो, ते हसणार तर नाहीत ना?"

जिन्यातून पायरव आला.

मिसेस  हॅले पुटपुटली, "त्यांना कळेल. किंवा कळणारही नाही."

वकील स्पष्टपणे बोलला, "नाही पीटर्स, फक्त त्यामागील कारण सोडून, हे अगदी पूर्णपणे स्पष्ट आहे. पण ज्युरींनो, हे जेव्हा बायकांच्या बाबतीत होते, तेव्हा काही खात्रीलायक रीत्या दाखवता येईल अशी --- ज्याची गोष्ट होऊ शकेल, अशी बाब असती तर! ही गोष्ट काही गुंतागुंतीची दिसते."

मिसेस हॅले गुप्तपणे मिसेस पीटर्सकडे बघत होती व मिसेस पीटर्स तिच्याकडे. झटकन त्यांनी एकमेकींपासून नजर वळवली. बाहेरचे दार उघडून मिस्टर हॅले आत आले. ते म्हणाले,

"आता मी आसपास शोध घेण्यासाठी माझ्याबरोबर एक गट आणला आहे. बाहेर खूप गार आहे."

वकीलाने अचानक जाहीर केले, "मी इथेच काही वेळ रहाणार आहे. तुम्ही माझ्याऐवजी फ्रँकला बाहेर पाठवू शकता, नाही का?"

त्याने शेरीफला विचारले. "मला येथील प्रत्येक गोष्ट तपासायची आहे. माझे समाधान झालेले नाही. आपण अजून चांगले काम करू शकतो."

परत एकदा दोन बायकांची नजरानजर झाली.

शेरीफ टेबलाशी आला.

"मिसेस पीटर्स जे करणार होती, ते तुम्हाला बघायचे आहे का?"

वकिलाने ॲप्रन उचलला. तो हसला.

“ओहो, मला वाटते, बायकांनी काढलेल्या त्या वस्तू धोकादायक नाहीत.”

मिसेस हॅलेचा हात आत खोके लपवलेल्या शिवणपिशवीवर होता. तिला वाटले, की तिने तो हात काढून घ्यायला पाहिजे. पण तिला ते जमले नाही. तिने खोक्यावर ठेवलेल्या गोधडीच्या तुकड्यांपैकी एक काढून घेतला. तिचे डोळे आगीसारखे पेटले. तिने ठरवले, की त्याने जर खोके घेतले, तर आपण ते त्याच्याकडून हिसकावून घ्यायचे. पण त्याने ते घेतले नाही. थोडेसे हसून, वळतांना तो बोलला,

“नाही, मिसेस पीटर्सवर देखरेख करायची गरज नाही.

त्यासाठी शेरीफच्या बायकोने कायद्याशी लग्न केले आहे. नाही का, मिसेस पीटर्स?”

मिसेस पीटर्स टेबलाच्या कडेला उभी होती. मिसेस हॅलेने तिच्याकडे एक कटाक्ष टाकला. पण तिला तिचा चेहरा दिसला नाही. मिसेस पीटर्स वळली होती. जेव्हा ती बोलली, तेव्हा तिचा आवाज बारीक येत होता.

ती म्हणाली, “नाही --- फक्त त्या पद्धतीने.”

“कायद्याशी लग्न!” मिसेस पीटर्सचा नवरा गालातल्या गालात हसला. तो पुढील खोलीच्या दाराकडे सरकला आणि वकिलाला म्हणाला, “ जॉर्ज, मला तू मिनिटभर इकडे यायला हवा आहेस. आपण या खिडक्यांचे निरीक्षण करू.”

“ओहो, खिडक्या!” वकील अधाशीपणे म्हणाला.

अजून दारात थांबलेल्या शेतकऱ्याला शेरीफ बोलला, “मिस्टर हॅले, आम्ही जरा बाहेर जात आहोत.”

हॅले घोड्यांच्या मागे गेला. शेरीफ दुसऱ्या खोलीत वकीलामागे गेला. परत एक क्षण दोन बायका स्वयंपाकघरात एकट्याच राहिल्या.

मार्था हॅलेने दोन्ही हात घट्ट जवळ घेत, दुसऱ्या बाईकडे बघत व तिला

धरत, उडी मारली. पहिल्यांदा तिला तिचे डोळे दिसले नाहीत. कायद्याशी लग्न हे शब्द सुचवल्यापासून शेरीफच्या बायकोने पाठ फिरवली नव्हती. पण आता मिसेस हॅलेने तिला वळवले.

तिच्या डोळयांनी तिला हळूहळू वळायचे नसतांना, वळवले. मिसेस पीटर्सने तिचे डोके दुसऱ्या बाईचे डोळे दिसेपर्यंत वळवले. क्षणभर त्या एकमेकींकडे असे बघत होत्या, की त्यात सुटकेचे वा माघार घेण्याचे भाव नव्हते. मग मार्था हॅलेचे डोळे त्या खोक्याकडे लागले होते, ज्यात असे काही होते, ज्याने --- तिथे नसलेल्या बाईवरील --- जी खरे तर तिथे सर्व वेळ त्यांच्याबरोबर होती --- आरोप सिद्ध झाला असता. थोडा वेळ मिसेस पीटर्स हलल्या नाहीत पण मग हलल्या. पुढे धाऊन त्यांनी गोधडीचे तुकडे मागे टाकले. खोके घेतले व ते तिच्या हातातील पिशवीत टाकायचा प्रयत्न केला. पण ते फार मोठे होते. नाईलाजाने तिने ते उघडले व पक्षी बाहेर काढू लागली. पण तिथे घोडे अडले. त्या पक्ष्याला हात लाऊ शकेनात. ती मूर्खासारखी हतबल होऊन उभी राहिली.

आतल्या दरवाज्यातून कडी काढल्याचा आवाज आला. मार्था हॅलेने शेरीफच्या बायकोच्या हातातून ते ओढून घेतले आणि शेरीफ व वकील स्वयंपाकघरात यायच्या आत, तिच्या कोटाच्या मोठ्या खिशात टाकले.

वकील गंभीर बाबी हसण्यावारी नेत म्हणाला, “हेन्री, छान! निदान आपल्याला एवढा तरी शोध लागला, की ती गोधडी बनवत नव्हती. बायकांनो, ती काय करणार होती, त्याला तुम्ही काय म्हणता?”

मिसेस हॅलेचा हात तिच्या कोटाच्या खिशावर होता.

“मिस्टर हेंडरसन, आम्ही त्याला गाठ मारणे म्हणतो”.

Missing Page Thirteen

# पान तेरा गायब

By

ANNA KATHARINE GREEN




अजून एक! अजून एक चांगले पैसे मिळवून देणारी भानगड, मग मी थांबायचे वचन देते, खरेच, अगदी खरेच नंतर मी थांबेन."

"पण पस, अजून एक कशाला? तू ठरवलेली रक्कम तुला मिळाली आहे --- किंवा त्याच्या अगदी जवळ पोचली आहेस --- आणि जरी तीन महिन्यातील माझी मदत फारशी नसली, तरी मी तुझ्या पैशांत पुरेशी भर नक्कीच घातली आहे."

"नाही आर्थर, नाही. तू मदत करतो आहेस. त्याबद्दल मी आभारी आहे. खरे तर तू माझ्यासाठी काम करत असल्याने, मी आनंदित झाले आहे. पण तुझ्या

आताच्या अवस्थेत, तीन किंवा सहा महिन्यात, मला पाहिजे तशी परिस्थिती येणे शक्य वाटत नाही. हे पुरेसे नाही. त्याने माझे समाधान झालेले नाही. मला ते खूप, ढीग भरुन पाहिजे. आणि वाहून जायला पाहिजे. जर काही चूक झाली, तर ती सुधारण्याची हमी मिळायला पाहिजे. असली गोष्ट करायला मला परत बोलावले जाता कामा नये. झाब्रीस्की दुःखांतिकेतून मी अजून बाहेर पडले नाही. ती मला सतत टोचत असते. ते माझ्या डोक्यातून जाण्यासाठी, काही नवीन काम मला मदत करेल. मला अपराधी वाटते, की त्यासाठी मी जबाबदार होते -- "

"नाही, पस, मला नाही वाटत की त्यासाठी तू जबाबदार होतीस. अशा गुंतागुंतीच्या मामल्यात असे काही होणारच होते. आता किंवा नंतर त्याने स्वतःला मारून घेण्याचा विचार केलाच असता --- "

"पण तिला नव्हे."

विचित्र आयुष्य जगण्यासाठी, तिने तिच्या आंधळ्या नवऱ्याला समजून घेण्यासाठी काही मिनिटे दिली असती?"

व्हायोलेटने काही उत्तर दिले नाही. तिला इतके नवल वाटले होते, की ती त्यात बुडून गेली होती. तो आर्थर होता का? काम करण्यातील काही आठवड्यांची जवळीक ही खरेच त्याच्या आयुष्यात बदल घडवणारी गंभीर गोष्ट होती का? या विचाराने तिचा चेहरा चमकून हसरा झाला. या आनंदाच्या पुराव्यामागचे कारण काय हे न समजून, त्याची काही जुनी शांतता दाखवत, काळजी न दाखवता, त्याने वाकून, तिचे चुंबन घेतले व बोलला, "व्हायोलेट, ते विसरून जा. कुणाहीमध्ये वा कुठल्याही प्रकारच्या गोष्टीमध्ये रस घेऊ नकोस. जर फार रस घेतलास, तर मला हा मूर्खपणा थांबवण्यासाठी, तुझ्या एखाद्या मित्राचा

सल्ला घ्यावा लागेल. मी काही नाव घेत नाही. ओहो, तुला इतके घाबरायची काही गरज नाही. फक्त व्यवस्थित वाग.”

तो सावकाश निघून गेल्यावर, तिने स्वतःशी म्हटले, “त्याचे बरोबर आहे. एकदम बरोबर आहे.” तरीही तिला अधिक पैसा हवा असल्याने ---

या दृष्याने धोक्याची घंटा वाजवली --- व्हायोलेटसारख्या तरुण मुलीला मध्यरात्री आलेल्या झटक्याने तेथील वातावरण तंग झाले.

दाट सावलीतील शेवटच्या अनोळखी घराच्या दारात एखाद्या बाईची उत्सुकतेने वाढलेली व मदतीसाठी हात पसरलेली आकृती कडेनी दिसू शकते. ती ती बघत असतांना अदृष्य होऊ शकते. पण एका गोंधळलेल्या क्षणी तिला तिच्या बसण्याच्या जागी खिळवून ठेवण्याचा परिणाम रहातो. ती काही साहसाची अपेक्षा करत असल्याने, हे विचित्र वाटते.

.खासगी नृत्याच्या जागेपासून अनेक मैल लांब जाऊन, गूढ आणि शोककारक गोष्टींना तोंड देण्याच्या तपासकामासाठी, एखादीला बोलावले जात नाही. पण व्हायोलेट स्ट्रेंज तिच्या अनेक प्रकारच्या विचित्र अनुभवांमुळे, संशयी स्वभावाची झाली होती. उदाहरणार्थ, ज्या घटनेमध्ये दार उघडे राहिले होते, ते मोठे संशयपूर्ण होते. फक्त अपेक्षित आकृतीची आठवण पलीकडील हॉलचे पुसटसे, सुखद दृष्य संभ्रमित करत होती. वर्णन करण्यास अवघड अशा भीतीने, तिच्या घशात आवंढा येत होता. जोराने खाली कोसळणारा आवाज किंवा कुठलेही शब्द त्यासाठी अपुरे होते. पण लवकरच हे संपले. तिचे पाय जमिनीला लागल्यावर, परीस्थिती बदलली. तिच्या भावना पूर्ववत झाल्या. ती बाई अदृष्य होऊन त्याजागी एक मनुष्याकृती उभी राहिली. ती आकृती ती फक्त ओळखतच नव्हती तर तिचा

त्या माणसावर पूर्ण विश्वास होता --- तो असा मित्र होता, की ज्याच्या नुसत्या अस्तित्वाने ती धीर धरु शकत होती. या ओळखीमुळे परीस्थिती बऱ्यापैकी समजू लागली. त्या चकाकीत डोळयाच्या व स्पष्ट दिसणाऱ्या चेहऱ्याच्या रोखाने ती चालू लागली व तिने रॉजर अपजॉनच्या दिशेने हात पुढे केले.

त्याने तिला हॉलमध्ये आणले तेव्हा ती हसत व लाजत उद्गारली, “तू इथे!” तिला असुविधेत टाकून, तो एकदम पुढे आला व माफी मागत स्पष्टीकरण देऊ लागला. घरात त्रास सुरु झाला होता --- भलताच त्रास.

सकाळपूर्वी ज्याचे स्पष्टीकरण देणे गरजेचे होते, असे काही घडले होते. नाहीतर या छताखालील एकापेक्षा जास्त माणसांचा आनंद व मान मोडून पडला असता.

त्याला माहिती होते, की उशीर झाला आहे --- तिला मोठी, अंधारी फेरी एकटीलाच मारावी लागणार आहे. परंतु एकदा त्याचे आयुष्य जवळजवळ मोडकळीस आणणाऱ्या प्रश्नाशी जोडलेली तिची यशस्विता त्याला कार्यालयात फोन करायचा धीर देऊन गेली आणि ---

तो आश्चर्याने ओरडला, “पण तू तर नाचायच्या कपड्यात आहेस. तुला असे वाटते का --- “

“मी तेथूनच आले आहे. नाचतांना मला शब्द ऐकू आले. मी घरी गेले नाही. मी घाई केली.”

त्याने मान्यता देत बघितले, पण तो असे बोलला, “मिस डीगबाय, ही अशी परीस्थिती आहे --- “

“जी बाई उद्या लग्न करणार आहे ती?”

“जी तशी आशा करते आहे, ती.”

“आशा करते आहे, म्हणजे?”

“जर आज या घरातील हरवलेली ठराविक वस्तू, उद्या इथे जेवणाऱ्यांपैकी कुणी त्यांचे घर सोडण्यापूर्वी सापडली, तर उद्या कोणीतरी लग्न करू शकेल.”

व्हायोलेटने तोंडातून आश्चर्योद्गार काढला.

तिने सुरवात केली, “तर मग मिस्टर कॉर्नेल,” रॉजरने घाईने व पूर्ण आत्मविश्वासाने म्हटले, “मिस्टर कॉर्नेलवर आमचा पूर्ण विश्वास आहे. पण हरवलेली वस्तू कदाचित अशी आहे, की तो तिची इच्छा करु शकतो. हजर असलेल्या सगळयांमध्ये त्याला एकट्यालाच ती सुरक्षित ठेवायची संधी आहे. त्यामुळे तुमच्या लक्षात येईल, की तो त्याच्या अभिमानासकट --- त्याच्यासारख्या श्रीमंत नसलेल्या माणसाच्या अभिमानासकट, एका बाईबरोबर लग्न करायला तयार आहे पण त्यासाठी त्या बाईने त्याचे निरागसत्व जाहीर करायला हवे. नाहीतर सेंट बार्थोलोम्युची दारे उद्या बंद रहातील.”

“पण ती वस्तू हरवली --- ती काय होती?

“मिस डीगबाय तुम्हाला त्यासंबंधी सांगेल. ती तुमचे स्वागत करायला थांबली आहे. त्याने त्यांच्या उजवीकडे असलेले अर्धवट उघडे दार हावभावासकट पाहिले.

व्हायोलेटने तिकडे नजर टाकली. मग ते उभे असलेल्या हॉलमध्ये वरखाली बघितले.

“तुम्हाला हे माहिती आहे का, की मी कुणाच्या घरात उभी आहे, हे तुम्ही मला सांगितलेलेच नाही. तिच्या घरात नाही, हे मला माहिती आहे. ती शहरात

रहाते.”

“आणि तू हार्लेमपासून बारा मैलांवर आहेस. मिस स्ट्रेंज, तू व्हॅन ब्रोकल्यनच्या घरात आहेस. ते प्रसिध्द असल्याचे तुला माहिती असेल. तू इथे पूर्वी कधी आली नव्हतीस का?”

“मी इथे आले होते. पण अंधारात मी काही ओळखले नाही. तपासकामासाठी किती उत्कंठावर्धक जागा आहे!”

“आणि मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन? तू त्याना कधी भेटली नाहीस का?”

“एकदा लहानपणी. तेव्हा त्यांनी मला घाबरवले.”

“आणि आतादेखील ते तुला घाबरवू शकतील. त्याबद्दल काही शंकाच नाही. काळाने त्याना नरम केले आहे. शिवाय, त्यांना फार आश्चर्य वाटू नये, अशा तऱ्हेने मी तयार केले आहे. तेव्हा मी त्यांना ओळख करून देणार असलेल्या स्त्रीकडे ते फक्त ती गुप्तहेर असल्यासारखे बघणार नाहीत.”

ती हसली. व्हायोलेट स्ट्रेंज खूप गोड तरुणी होती. शिवाय ती जगावेगळे गूढ शोधून काढणारी हुशार गुप्तहेर होती.

ती व मिस डीगबाय यांच्यातील भेट सहानुभूतीपूर्ण झाली. मिस डीगबायला गूढ सोडवणाऱ्या अशा त्या लहानशा फॅशनेबल सुंदरीकडे बघून पहिला धक्का बसणे अटळ होते. इतर वेळी मिस डीगबायची नजर व नाकडोळे आल्हादक होते. छानसा, नाजूक ड्रेस घातलेल्या परीसारख्या तिच्यासमोरील आकृतीवर ती नजर कदाचित थोडी रेंगाळली असेल, पण ती लगेच व्हायोलेटच्या स्थिर चकाकीत डोळयांमध्ये खोल बुडाली. गालावरील खोल खळया बघून, नेहमीच बघणाऱ्याचा ती अवर्णनीय रीत्या नाजूक असल्याचा व तोल सांभाळलेले

पण तितकेच बुद्धिमान असे खेळीमेळीचे लैंगिक आकर्षण असलेले एकमेव व्यक्तिमत्व असल्याचा अंदाज चुकत नसे. मिस डीगबायवर व्हायोलेटचा ठसा तसाच उमटला, जसा सगळयांवर उमटत असे. फ्लॉरेन्स डीगबायकडे कोणीच जास्त वेळ बघू शकत नसे आणि उच्च नैतिकता असलेला तिचा उत्साह आणि उदारता कोणी ओळखू शकत नसे. ती उंच होती. तिने जेव्हा वाकून व्हायोलेटचा हात हातात घेतला, तेव्हा त्यांच्या उंचीतील फरक ठळकपणे दिसला. प्रत्येकीतील वैशिष्ट्ये एका निरीक्षण करणाऱ्याच्या, तो स्तुती करेल इतपत लक्षात आणून देऊन गेला.

मध्यंतरीच्या काळात, चालू केसमधील तिची रुची जाणून, व्हायोलेट मिस डीगबायकडे घाईघाईने कटाक्ष टाकण्यापासून स्वतःला वाचवू शकली नाही. दुःखद घटनांची मालीका घडल्याने हादरलेल्या घरात शिरल्याने व आता तिची उत्सुकता शमल्याने, तिला आनंद झाला होता. परंतु परिणाम निराशादायक होता. भिंती व फर्निचर साधे होते. काही सूचक नव्हते. सर्व काही नवीन वा आधुनिक नव्हते. जे जुन्या काळी होते, ते तसेच होते. गॅसबत्तीने घर उजळवण्याऐवजी सगळीकडे मेणबत्त्या दिसत होत्या.

असे का असावे, यासाठी व्हायोलेट कारण शोधत असतांना, तिच्या कल्पनाशक्तीवर भूतकाळाच्या आवडीचा प्रभाव पडला. ते तिला कुठे घेऊन जाणार होते, कुणास ठाऊक! मिस डीगबायच्या डोळयातील मलूलपणाने तिला धाक दाखवला नसता, तर वर्तमानकाळातील उद्दिपिततेची जाणीव तिला कदाचित झाली नसती. लगेच ती सावध झाली व मन केंद्रित करून, ती सांगत असलेले ऐकू लागली.

ते थोडक्यात असे होतेः

या घरातील सहा माणसांना एकत्र आणणारे जेवण हे तिच्या होणाऱ्या, परंतु धाकधूक असलेल्या, लग्नाप्रीत्यर्थ थाटामाटात दिले गेले. मिस्टर स्पिएलहॅगेन या नव्या पाहुण्याच्या सन्मानार्थ देखील दिले गेले. त्याने या आठवड्यात, उत्पादक व्यापारी जग बदलून टाकेल, असे काही मौलिक शोध जाणकार लोकांना दाखवले होते.

त्याच्या या शोधांबद्दल बोलतांना, मिस डीगबाय फार खोलात शिरली नाही. ते प्रकरण तिच्या समजशक्तीपलीकडील होते. पण त्याचे महत्व सांगतांना, तिने म्हटले, की ते ज्यात आकडेमोड व समीकरणे आहेत, असे ते मिस्टर कॉर्नेल यांच्या स्वतःच्या कामाशी मिळतेजुळते होते. मिस्टर स्पिएलहॅगेनना आशा असलेले काम त्यांना मिळवून न देण्याचे व त्यांच्या आशा धुळीस मिळवण्याचे सामर्थ्य त्या मिस्टर कॉर्नेल यांच्या कामात होते.

या मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्या कामाच्या दोन प्रती होत्या. त्यातील एक बोस्टनमधील सुरक्षा लॉकरमध्ये ठेवलेली होती आणि दुसरी मिस्टर स्पिएलहॅगेन बरोबर घेऊन आले होते. आणि तीच आता हरवली होती. ती सोळा किंवा त्याहून जास्त पानांची होती आणि या संध्याकाळी या घरात हरवली होती. तीच तिला शोधून काढायची होती.

मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन यांचे आयुष्य म्हणजे काही कारणाशिवाय असलेले दुःखद आयुष्य होते. पण त्याचा आवडीचा असलेला एक विषय फार रसपूर्ण होता. तो स्फोटकांसंबंधी होता. जेवणाच्या वेळेचे बरेचसे बोलणे मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्या शोधाबद्दल आणि त्यामुळे उत्पादक व्यापारी जगावर होणाऱ्या

संभाव्य परिणामांबद्दल होते. हा शोध ज्यापासून लागला, ते समीकरण व्यापारी जगापासून गुप्त ठेवण्यात आले होते. त्यामुळे मिस्टर कॉर्नेल यांच्या रुचीवर चांगलाच परिणाम झाला. ती हे सर्व खूप रस घेऊन ऐकत होती. याबद्दलची समीकरणे व आडाखे जर आधीच उघड केले गेले असते, तर मिस्टर स्पिएलहॅगेन याना मिळणाऱ्या कामात बाधा निर्माण झाली असती आणि ते निराश झाले असते. त्यामुळे व्यापारी जगात काही बदल घडून येण्याची शक्यता होती. हे सर्व व्यापारी जगापासून गुप्त ठेवलेल्या आडाख्यांपासून बनवले गेले होते व याबद्दलच मिस्टर कॉर्नेल यांना रुची होती. ती लक्ष देऊन ऐकत असतांना, मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन यांनी माफी मागत, मध्येच असा शेरा मारला, की जर मिस्टर स्पिएलहॅगेन यांनी या बाबतीत मोठा अमूल्य शोध लावला असेल, तर तो तसाच होता. त्यासाठी त्यांनी अनेक प्रयोग करून बघितले होते. स्पिएलहॅगेन यांचे शोध बाजारात विकले जातील असे होते. मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन यांच्या त्याच प्रकारच्या कामात त्यांनी नावे देता येतील, अशा काही घटनांचा शोध लावला होता व त्यातील काही असामान्यपणे यशस्वी झाल्या असत्या. पण मिस्टर स्पिएलहॅगेन यांनी केलेल्या प्रयोगांमध्ये काही उणीवा होत्या. जर मिस्टर स्पिएलहॅगेन यांनी त्या सुधारल्या नाहीत, तर त्यांची पद्धत जितक्या वेळेस यशस्वी होऊ शकत होती, त्यापेक्षा जास्त वेळा अयशस्वी झाली असती.

तर ते त्या चुका दुरुस्त करायला तयार होते का? हो. हे ऐकून त्याना सुटल्यासारखे वाटले.

उत्तर झटपट मिळाले. हो. ते त्या दुरुस्त करतील. पण नंतर काही वेळाने पुढे बोलणे झाले, तेव्हा मिस्टर स्पिएलहॅगेन यांचा आत्मविश्वास कमी झाल्यासारखा वाटला. त्यांनी जेवणाचे टेबल सोडण्यापूर्वी, त्यांचे कागद परत

एकदा तपासून बघण्यासंबंधीचा विचार उघडपणे बोलून दाखवला. त्यामुळे मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन यांनी सुचवलेल्या सुधारणा ते त्यात करू शकले असते.

मिस्टर कॉर्नेल यांच्या चेहऱ्यावरील हावभावात त्या वेळी काही फरक दिसला असता --- पण तिला तो दिसला नाही. दुसऱ्यांनी शोधून काढलेल्या समीकरणांबद्दल व त्यांचे भविष्य उज्वल असण्याची खात्री असल्याबद्दल त्यांनी जी कटुता दाखवत शेरेबाजी केली, ते सगळ्यांना अपेक्षित होते. त्यामुळे अर्थात थोड्या वेळाने ते गायब झाले व असे होणार असे बहुधा सर्वांना वाटतच होते. स्त्रिया [ती सोडून अजून दोन होत्या.] संगीत खोलीत गेल्या आणि सर्व पुरुष सिगरेटी ओढण्यासाठी, वाचनालयाकडे वळले. इथे यावेळेपर्यंत चाललेले संभाषण एका विषयावरून थोडक्यात सुरु झाले, जेव्हा मिस्टर स्पिएलहॅगेन उदास होऊन, स्वतःवर जोर देत बोलले, “मी माझे कागदपत्र तपासून, त्यात सुधारणा केल्याशिवाय झोपू शकत नाही. मला त्यासाठी शांत जागा कुठे मिळेल? मला फार वेळ लागणार नाही. मी भरभर वाचतो.”

मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन उत्तर देण्यास सरसावले. सगळ्यांचे डोळे त्यांच्या कडे लागले होते, पण त्यांच्याकडून काहीच शब्द बाहेर येईनात. मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन यांची अशी अवस्था मित्रांना परिचित होती. त्यामुळे कुणीच त्याना त्यातून बाहेर काढायचा प्रयत्न केला नाही.

मग काय करावे बरे? त्यांची अशी मनोवस्था कधीकधी अर्धा तासदेखील टिकत असे आणि मिस्टर स्पिएलहॅगेन एवढ्या धीराचा माणूस नव्हता. एका खोलीशेजारील दार अर्धवट उघडे असलेले बघत, ते अस्वस्थपणा दाखवत होते. ते त्यांच्याभोवती असलेल्या लोकांना म्हणाले,

"ती मला पाहिजे तशी एकांतवास देणारी गुहा दिसते आणि तिथे उजेडही आहे. मी तिथे काही मिनिटे बसून काम केले, तर कुणाची काही हरकत आहे का?"

कुणी काही हरकत घेत नाही असे दिसल्यावर, ते उठले व दार थोडेसे ढकलून, ती पत्रे घालून सजवलेली व भरपूर उजेड असलेली लहानशी खोली बंद केली. पण त्यात फर्निचर काहीच नव्हते. एखादी खुर्चीदेखील नव्हती. अनेक खुर्च्यांपैकी हलकी केनची खुर्ची उचलत, परत मिस्टर स्पिएलहॅगेन त्या खोलीत गेले व त्यांच्यामागे खोलीचे दार लावून घेतले.

बराच वेळ झाला. टेबलावर लोकांना सेवा पुरवणारा माणूस एका ट्रेमध्ये प्रत्येकाला हवी असलेली दारू घेऊन आला. त्याच्या मालकाला एका जागी विचित्र मनस्थितीत खिळलेले पाहून, त्याने ट्रे खाली ठेवला व एका पेल्याकडे बोट दाखवत बोलला, "हा मिस्टर ब्रोकल्यन यांच्यासाठी आहे. त्यात त्यांची नेहमीची त्यांना शांत करणारी भुकटी आहे. आणि इतरांना पेय घेण्यास सांगून तो निघून गेला.

मिस्टर अपजॉनने पेला उचलून त्याच्याजवळ नेला आणि मिस्टर कॉर्नेल देखील तसेच करतांना दिसले. पण तेव्हा ते अचानक पुढे झाले, पेला घेतला व मिस्टर स्पिएलहॅगेन यांनी मुद्दाम स्वतःला बंदिस्त केलेल्या खोलीकडे निघाले.

त्यांनी हे सर्व का केले --- का? त्यांच्या हाताखालील पेला घेण्यापेक्षा, तो लांब असलेला व नोकराने तो मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन यांच्यासाठी, ठेवलेला पेला त्यांना बहुधा घ्यायचा होता. अनेक दुसरे दुःखी संकेत त्यांनी का पाळले, हे ते स्पस्ष्ट करू शकले नाहीत. खोलीत शिरल्यावर मिस्टर स्पिएलहॅगेन यांनी उदास

होऊन त्यांच्याकडे का पाहिले व मिस्टर स्पिएलहॅगेन यांचा हात ते वाचत असलेल्या कागदांवरुन ताणत, ते पेला घेत आहेत, हे मिस्टर कॉर्नेल यांच्या लक्षात यायच्या आत त्यांच्याकडे रोखून बघत, पेला घेऊन, यांत्रिकपणे का संपवून टाकला, याचे देखील स्पष्टीकरण मिस्टर कॉर्नेल देऊ शकले नाहीत. मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्या बोटांमधून दिसणाऱ्या कागदांवरील ओळी, त्याना दिसू नयेत यासाठी तो प्रयत्न असल्याचे स्पष्टपणे कळत होते. मग मिस्टर कॉर्नेल लाजले व मुद्दाम बेपर्वाईने अपराध्यासारखे निघून गेले. पण मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन अचानक येत, व ट्रेकडे एक कटाक्ष टाकत, त्यांचा हात अगदी जवळ ठेवत, आश्चर्याने बोलले, “डॉब्ज मला विसरलेला दिसतो.” मग खरे तर दुर्दैवी मिस्टर कॉर्नेलना समजले, की त्यानी काय केले. तो त्यांच्या यजमानांसाठीचा --- मिस्टर व्हॅन ब्रोकल्यनसाठीचा --- पेला होता. तो त्यांनी मिस्टर स्पिएलहॅगेन यांना नेऊन दिला व त्यांनी तो घटाघट पिऊन संपवला. त्या पेल्यात औषध होते. आपण काय मूर्खपणा केला, हे जाणून त्यांना अपराधी वाटू लागले आणि हा अपराध माफ करण्याबद्दल विनवणी करणे, किती शामळूपणाचे ठरले असते!

असे काही न करता, ते उठले आणि घाईघाईने दुःखाने सहानुभूतीदर्शक लाजणाऱ्या मिस्टर अपजॉनकडे एक कटाक्ष टाकत, त्यांनी आताच बंद केलेल्या मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्या  दाराशी पोचले. पण तसे करतांना, खांद्याला कुणी स्पर्श करत आहे, असे जाणवल्याने, त्यांनी मिस्टर ब्रोकल्यनच्या त्यांच्यावर खिळलेल्या नजरेला फारच गोंधळून, नजर दिली.

मिस्टर ब्रोकल्यन यांनी विचारले, “तुम्ही कुठे चालला आहात?”

प्रश्नार्थक आवाज, कडक नजर यामुळे लगेचच ते आश्चर्यचकीत झाल्याचे,

आनंदी नसल्याचे व त्याना काही लागते नसल्याचे सुचवत होते. पण मिस्टर कॉर्नेल कसेबसे चाचरत बोलले,

“मिस्टर स्पिएलहॅगेन त्याच्या कागदपत्रांवर नजर टाकत आहेत. जेव्हा तुमच्या माणसाने ट्रेमध्ये प्रत्येकाला हवी असलेली दारू आणली, तेव्हा चुकून तुमचा पेला उचलून, मी मिस्टर स्पिएलहॅगेन यांना दिला. तेव्हा मी फारच अवघडलो होतो. त्यांनी तो प्यायला आणि मी --- मला काळजी वाटते आहे, की त्यामुळे त्यांना काही त्रास तर झाला नाही ना?”

शेवटचे शब्द उच्चारल्यावर, त्याना असे जाणवले, की मिस्टर ब्रोकल्यनचा त्यांच्या खांद्यावरील हात घसरतो आहे. पण ते काही बोलले नाहीत व ते खोलीत शिरत आहेत असेही वाटेना.

नंतर त्याना झाल्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप झाला, कारण ते मिनिटाभरासाठी सर्वांच्या नजरेपासून दूर झाले, तेव्हा मिस्टर स्पिएलहॅगेनना बघून त्यांना धक्काच बसला.

अजूनही तिथे बसून व कागदपत्र हातात घेऊन, पण डोके पुढे पडलेल्या अवस्थेत ते डोळे मिटून, मरून पडले होते --- की झोपले होते की आणखी काही?--- त्यांना काही समजेना. पण ते दृष्य बघून ते सुन्न झाले.

काही झाले तरी हे तंतोतंत --- पूर्ण सत्य होते की नव्हते?

मिस्टर ब्रोकल्यनच्या उपस्थितीत मिस्टर कॉर्नेल नक्कीच ते असल्यासारखे दिसत नव्हते. जेव्हा मिस्टर ब्रोकल्यन यांनी हे जाहीर केले की त्या पेल्यातील दारूत जे औषध होते, ते काही त्रासदायक नव्हते आणि जर मिस्टर स्पिएलहॅगेनना होते तसेच राहून दिले, तर ते आपोआप ठीक होतील.

तेव्हा मिस्टर कॉर्नेल अर्धवट का होईना पण निश्चिंत झाले. तरीही ते खूप अस्वस्थ वाटत होते, त्यामुळे त्यांना वाचनालयाच्या खोलीत आराम करण्यासाठी नेण्याचे सर्वांनी ठरवले. पण हे करण्यापूर्वी, मिस्टर अपजॉननी मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्या हातातील महत्वाचे कागदपत्र गुळमुळीतपणे पकडून, मोठ्या खोलीतील रिकाम्या टेबलावर नेले. मिस्टर स्पिएलहॅगेन सुमारे पंधरा मिनिटांनी पुन्हा पूर्ववत होईपर्यंत ते तिथे सुरक्षित राहिले असते. असे करतांना काही कागद त्यांच्या हातून, पडले. ते त्यांनी उचलून घेतले व त्यासकट ते खोलीबाहेर पडले.

ते कागद उचलतांना त्यांचा चेहरा नेहमीप्रमाणे काळजीने ग्रासलेला होता. त्यामुळे इतरांना समजले की त्यांच्याकडून काय अपेक्षा करायची.

महत्वाचे समीकरण असलेले पान गायब झाले होते.

आता व्हायोलेटला समस्या काय होती, ते कळले.

II

तिथे तो कागद हरवला होता, यात काही शंका नव्हती. सर्वांना दिसले की तेरा क्रमांकाचे पान गायब होते. परत सगळे कागदपत्र खालीवर करून शोधले तरी, काही उपयोग झाला नाही. तेरा क्रमांकाचे पान सापडले नाहीच. चौदा क्रमांकाचे पान ढीगात सर्वात वर होते, तर बारा क्रमांकाचे पान तळाशी होते. पण मधले तेरा क्रमांकाचे पान कुठेच नव्हते.

ते कुठे नाहीसे झाले, आणि कुणाच्या हातून ते हरवले? कोणालाच कळेना किंवा निदान कुणीच तसे करायचा प्रयत्न केला नव्हता. पण प्रत्येकजण ते शोधू लागला.

पण कुठे शोधायचे? जवळील लहानशा खोलीत सिगरेटचे थोटूक लपवायलाही जागा नव्हती. ती एक पांढऱ्या चकाकीत प्रकाशित कागदांसारखा चौकोन असलेली, रिकाम्या भिंतींची, रिकाम्या फरशीची आणि फर्निचर म्हणजे एक खुर्ची असलेली खोली होती. ते उभे असलेली खोलीही तिथे कागद हरवला असेल, अशी वाटत नव्हती. फक्त तेथील कुणा व्यक्तीच्या अंगावरच तो असला तर असू शकत होता. हे या गूढाचे उत्तर होते का? कोणीच कुणावर संशय घेत नव्हते, पण मिस्टर कॉर्नेल काही तर्क करत, मिस्टर व्हॅन ब्रोकल्यनकडे चालत गेले व थंड आवाजात, पण दोन्ही गाल लाल करत प्रत्येकाला ऐकू येईल असे म्हणाले, "मी कसून तपास करण्याची विनंती करतो. लगेच आणि झडझडून!"

क्षणभराची शांतता, मग सर्वांची कुरकुरः "सगळ्यांची झडती घेतली जावी."

काळजीत पडून यजमान, मिस्टर ब्रोकल्यन यांनी विचारले, "मिस्टर स्पिएलहॅगेन शेजारील खोलीत त्यांचे कागदपत्र वाचण्यासाठी बसले, तेव्हा ते पान इतरांकडे राहीले असल्याची त्यांची खात्री होती का? ( तोपर्यंत, ते शुद्धीवर आले होते. )

जोरदार उत्तर आले, "नक्कीच. खरे तर मी झोपलो, तेव्हा त्या समीकरणाचाच विचार करत होतो."

"हे खात्रीपूर्वक सांगायला तुम्ही तयार आहात?"

"मी हे शपथपूर्वक सांगेन."

मिस्टर कॉर्नेलनी त्यांची विनंती परत थंडपणे बोलून दाखवली. "मी अशी विनंती करतो, की तुम्ही माझी कसून झडती घावी. मला लगेच संशयमुक्त होऊ द्या.

नाहीतर मी उद्या मिस डीगबायशी लग्न कसे काय करू शकेन?" त्यानंतर त्याला कुणी हरकत घेतली नाही. सर्वांनी त्या सुचवलेल्या गोष्टीवर एकमताने शिक्कामोर्तब केले. स्वतः मिस्टर स्पिएलहॅगेन यांनीदेखील! पण इतर प्रयत्नांप्रमाणे तो प्रयत्नदेखील अपयशी ठरला. हरवलेले पान सापडले नाही.

आता त्यांनी काय विचार करावा? काय धोरण अवलंबवावे?

आता काहीच करायचे शिल्लक राहिले नाही. पण तरी ते महत्वाचे पान शोधण्यासाठी काही प्रयत्न करणे गरजेचे होते. मिस्टर कॉर्नेल यांचे लग्न व मिस्टर स्पिएलहॅगेन यांचे व्यापारी जगातील यश हे सकाळी सहापर्यंत मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्या हातात होते. सकाळी लवकर निघणाऱ्या एका बोटीतून ते एका कारखानदाराबरोबर पाठवायचे ठरले होते.

पाच तास!

मिस्टर ब्रोकल्यनना काही सुचवायचे होते का? ते इतरांसारखेच दुग्ध्यात पडले होते. सगळेच चेहरा पाडून बसले होते. कुणीतरी सुचवले, "आपण स्त्रियांना बोलावू."

तसे केले गेले. तरीही आधी जेवढा ताण होता, त्याहून जास्त ताण मिस डीगबाय तिथे आल्यावर जाणवू लागला. पण ती डौलदार आणि उच्च अभिरुचीची स्त्री असून, असल्या संकटाने डगमगणारी नव्हती. जेव्हा काय झाले आहे, हे तिला सांगितले गेले, तेव्हा सर्व परीस्थितीचा सम्यक विचार करून, तिने प्रथम मिस्टर कॉर्नेलकडे व मग मिस्टर स्पिएलहॅगेनकडे पाहिले व शांतपणे हसून बोलली, "या प्रकरणात एकच स्पष्टीकरण शक्य आहे, मिस्टर स्पिएलहॅगेन मला

माफ करतील. पण असा विचार करण्यात त्यांची चूक होते आहे की त्यांनी गहाळ झालेले पान इतरांकडे पाहिले. त्यांनी त्याना सवय नसलेले, औषध घातलेले जे पेय प्यायले, त्यामुळे त्यांना भास होऊ लागले. ते समीकरणांचा विचार करत आहेत असे त्यांना वाटत असतांना, त्याना झोप लागली असणार याबद्दल मला काहीच संशय नाही. ते स्वभावाने प्रामाणिक, मोकळे व उदार आहेतच. पण मला मिस्टर कॉर्नेलबद्दलही तेवढाच विश्वास आहे.

मिस्टर ब्रोकल्यन यांच्याकडून काही सहजोद्गार निघाला व सगळयांकडून दबलेली कुजबुज ऐकू आली. पण मिस्टर स्पिएलहॅगेन यांनी या म्हणण्यावर विचार केला आणि मिस्टर कॉर्नेलकडून या अत्यंत अनपेक्षित व असामान्य बचावावर घाईने काहीच बोलले गेले नाही. पण नंतर ते म्हणाले, ““माझ्यात असलेला व मी तो सिद्ध करून दाखवू शकणारा आत्मविश्वास माझ्यात जागवल्याबद्दल मी मिस डीगबायचे आभार मानतो. मिस्टर यांच्यासाठी व यांच्यासाठी मला हे म्हटले पाहिजे. मी जेव्हा हातात पेला घेऊन तिथे अवतरलो, तेव्हा ते त्यांची समीकरणे तपासण्यात दंग होते, हे त्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांचा हात घाईघाईने लगेच ते वाचत असलेल्या त्यांच्या कागदपत्रावर पडला ते तुम्ही बघितले नसेल, पण मी बघितले आहे आणि त्यावरून मी निष्कर्ष काढला, की मी ते बघू नये, म्हणून मुद्दाम ते असे करत आहेत आणि मला तेव्हा नकळत त्या कागदावरील क्रमांक दिसला आणि तो तेरा होता.”

यावर मिस्टर स्पिएलहॅगेन यानी त्यांचे आभार मानले व त्यांच्या बोलण्यामुळे स्वतःच्या दृष्टीकोनात फरक पडल्याचे मान्य केले. ते मिस्टर कॉर्नेलकडे जात, बचाव करत म्हणाले, “ते नतद्रष्ट पण महत्वाचे पान गेले. पण

त्याच्या नाहीसे होण्याशी तुमचा काही संबध नाही.” त्यासरशी मिस्टर कॉर्नेलवरील सर्व आरोप पुसले गेले. सर्वांच्या चेहऱ्यावर सुटकेचे भाव आले. पण समस्या राहिलीच.

अचानक कोणाच्यातरी ओठांवर ते शब्द आले आणि ते उच्चारल्यावर, मिस्टर अपजॉनना आठवले, की त्यांच्या आयुष्यातील अशाच एका असामान्य संकटात त्यांना कशी मदत मिळाली व तितकीच अवघड समस्या एका गुप्तचर संस्थेशी गुप्तपणे संबंधित अशा एका लहानशा स्त्रीने कशी सोडवली. जर तिला शोधून सकाळपूर्वी इथे आणले गेले, तर सर्व काही ठीक होईल. हा प्रयत्न कसा करावा बरे? अशा रानटी पद्धती कधीकधी लागू पडतात. त्याने कार्यालयात फोन केला आणि --- झालेली हकीगत तिच्या कानावर घालून, मिस स्ट्रेंजला अजून काही माहिती हवी आहे का, विचारले.

III

मिस स्ट्रेंजला ही केस घेण्याबद्दल विनंती करण्यात आल्यानंतर, तिने विचारले, की आता सर्वजण कुठे आहेत. तिला सांगण्यात आले की ते सर्वजण अजूनही वाचनालयात एकत्र आहेत. मात्र स्त्रियांना घरी पाठवण्यात आले आहे.

व्हायोलेट तिच्या हास्याखालील अपयश या वाईट शब्दाची मोठी भीती लपवत म्हणाली, “मग चला आपण तिकडे जाऊ.”

नेहमीच्या परिस्थितीतील ती भीती इतकी मोठी होती, की तिला ती बातमी कळल्यापासून ती तिथे झटपट पोचेपर्यंत तिच्या मनात दुसऱ्या कुठल्याच विचाराला थारा नव्हता. पण या केसची परिस्थिती इतकी असामान्य होती, किंवा

मी असे म्हणेन की ती केस मिटवणे इतके असामान्य होते, की तिला इकडून तिकडे धावतांना केसचा विचार करायला काही वेळच मिळाला नाही. दुःख भरलेल्या त्या घरात तिला हॉलमागून हॉलमध्ये काळजीपूर्वक धावडवण्यात आले. व्हॅन ब्रोकल्यन हे नाव, त्याचा इतिहास, त्याच्या पद्धती, यामुळे ते घर त्या भागात एक दंतकथा बनून राहिले होते. [पुढे याबद्दल बोलणे होईलच.] या सर्वांनी तिच्या कल्पनाशक्तीला चालना दिली आणि तिने या घटनेशी तिचे विचार एकत्र केले. तिथे न उघडलेले एक दार होते --- क्रांतीच्या काळापासून, ते उघडले गेले नव्हते --- तिने ते पहावे का? तिने ते पाहिल्याचे तिला आठवत होते का? मग व्हॅन ब्रोकल्यन स्वतः! त्याला कुठल्याही अटींवर कुठल्याही जागी भेटणे, हे क्रमप्राप्त होते. पण त्याला इथे, ती त्याची गूढ घटना लपवण्याच्या जागी भेटणे! तिला तिच्या मित्र मैत्रिणींबरोबर बोलायला शब्द नव्हते. किंवा ती नवलपूर्णतेने असा विचार करत होती, की हा भीतीदायक आनंद असणार आहे.

त्याची गोष्ट चांगली माहितीची होती. अविवाहित आणि मनुष्याचा द्वेष करणारा तो, खूपसे नोकर सोडले, तर एकटाच रहात होता. तो त्याच्यापेक्षा वयाने मोठ्या माणसांना कधीच भेटायला जात नव्हता. तरीही या प्रसंगासारखा अधूनमधून काही लोकांना त्याच्या घरी बोलावत असे. त्याला कोणी आमंत्रण दिले तर तो नाकारत असे. कडकपणे संध्याकाळचे त्याला रात्री दहानंतर बांधून ठेवणारे कुठल्याही प्रकारचे मनोरंजनाचे कार्यक्रमदेखील टाळत असे. कदाचित हे त्याने केलेले आयुष्याचे नियम तोडले जाऊ नयेत म्हणूनही असेल. तो त्याचे अंथरूण सोडून, कधीही कुठेही झोपत नसे. जरी तो पन्नाशीच्या पुढे असला, तरी अगदी लहान असतांना तो युरोपहून परत आल्यापासून, एका कायदेशीर नोटीसमधील आज्ञा पाळायची म्हणून त्याने ओळीने दोन रात्री बोस्टनला त्याच्या

घराबाहेर काढलेल्या होत्या. हा त्याचा मुख्य वेडेपणा होता, पण अगदी उघडपणे दिसेल असा अजून एक म्हणजे, आधी म्हटल्याप्रमाणे तो बायकांना टाळत असे. जर गावातील एका लहानशा भेटीत त्याला बायकांमध्ये फेकले गेले तर अतिशय नम्रपणा दाखवत असे व मित्रत्वाने वागत असे. पण तो त्यांना कधीच शोधत नसे, लंब्याचौड्या गप्पा मारत नसे. पण त्याच्या नेहमीच्या सवयीविरुद्ध तो उमदा पुरुष असल्याचे त्याने घोषित केले होते.

तरीही तो सामान्य आकर्षणापेक्षा अधिक काही असलेला मनुष्य होता. त्याचे नाकडोळे चांगले होते व तो बांधेसूद होता. जर त्याने ठरवले असते, तर तो सगळयांच्या डोळयात भरू शकला असता, गर्दीच्या ठिकाणी शिरू शकला असता व  लोकांच्या मेजवान्यांमध्येदेखील सामील होऊ शकला असता. पण तरुणांच्या अशा सगळया शौकांकडे पाठ फिरवल्याने, जसजशी वर्षे जात चालली, तसतशा त्याला त्याच्या सवयी बदलणे, अशक्य होऊन बसले व त्याच्याकडून कोणी तशी अपेक्षाही करेना. तो समाजात पत राखून होता. लिओनार्ड व्हॅन ब्रोकल्यन या नावावर कोणी टीका करेनासे झाले.

अशा स्वतःमध्ये रमणाऱ्या आणि स्वतःतच मश्गुल असणाऱ्या आयुष्या बद्दल काही स्पष्टीकरण देता येण्यासारखे होते का? त्याला चांगले ओळखणाऱ्यांना असे वाटे. सर्वात पहिले म्हणजे तो दुर्दैवातून वर आला होता. असामान्य आणि दुःखद घटनांनी त्याच्या दोन्ही पालकांचे आयुष्य भरलेले होते. दोन्ही पालकांनी दुर्दैवाचा फेरा अनुभवलेला होता. स्वभाव व आवडीनिवडी भांडखोर व वादविवाद घालणाऱ्या झाल्या होत्या. जुन्या घरात त्यांचे दुःखी आस्तित्व ते जगत होते. दोन्ही स्वभाव उसळून उठले व त्यायोगे त्यांची जीवने वेगळी करणारी फारकतच नव्हे तर त्यांना जगाच्या वेगवेगळया विरुद्ध ठिकाणी पाठवणारी व कधीही न

परतणारी अशी ती ठरली. ती घटना अनुभवणाऱ्यांनी निदान तशा परिस्थितीत तसा निष्कर्ष काढला. एखादा कधीच विसरणार नाही, अशा सकाळी, कुटुंबाच्या आताच्या पिढीतील लोकांचा आजोबा असलेल्या जॉर्ज व्हॅन ब्रोकल्यनला त्याच्या मुलाकडून वाचनालयातील टेबलावर पडलेली खालील चिठ्ठी मिळाली.

बाबा,

या घरातील आयुष्य किंवा कुठल्याही घरातील आयुष्य हे आता सहन होण्यासारखे नाही. आमच्यापैकी एकाने जायला हवे. आईला तिच्या मुलापासून तोडता कामा नये. त्यामुळे मला तुम्ही यापुढे बघणार नाही. मला विसरून जा. पण तिला आणि मुलाला सांभाळा.

विल्यम

सहा तासांनंतर दुसरी चिठ्ठी मिळाली. यावेळेस बायकोकडूनः

बाबा,

कुजणाऱ्या प्रेताबरोबर बांधले गेल्यावर एखादा काय करणार? सुटका करून घेण्यासाठी गरज असेल तर, संबंध तोडून टाकणार. तुमचा मुलगा व माझ्यातील प्रेमाचे सर्व संबंध मृत झालेले असल्यामुळे, मी त्याचा आवाज ऐकू येण्याच्या कक्षेत राहू शकत नाही. त्याच्या घरात तो रहाणारच. कदाचित माझा मुलगा त्याच्या आईचा विरह व वडिलांचे प्रेम सहन करू शकेल.

ऱ्होडा

दोघेही गेले, कायमसाठी गेले. त्यांच्या निघून जाण्याबरोबर, त्यांनी शांतता मागे ठेवली आणि कधीच काही संबंध ठेवला नाही. एकजण पूर्वेला गेला, तर दुसरा पश्चिमेला गेला. ते जगाच्या दुसऱ्या बाजूला कदाचित भेटलेही असतील.

पण त्यांचा मुलगा रहात होता, त्या घरात कधीच नाही. त्याच्यासाठी व त्याच्या आजोबांसाठी ते मानवतेच्या मोठ्या दृष्यमान समुद्रात खोल बुडाले. दुःखी व शोकाकुल किनाऱ्याशी अडकून बसले. आजोबांचा दुहेरी तोटा झाला. मुलाला, त्या अकरा वर्षाच्या मुलाला, ताण वा संकटे सहन करावी लागली. जगातील कुठल्याही वयाचे, वाईट नशीबाचे वा वाईट परिस्थितीचा बळी ठरलेल्यांनी या मुलाइतकाच शोक केला असेल किंवा खूप काळ किंवा खूप खोलवर त्याचे परिणाम भोगले असतील. एका दिवसात त्याच्या बाळभाळावर खूपसे वाईट नशीब कोरले गेले आणि असे सांगणारेही आहेत, की नंतरदेखील वेळोवेळी त्याच्या "आई! आई!" अशा दबलेल्या किंकाळ्या त्या शापित घरात घुमत असत. त्यामुळे नोकर घरातून पळून जात व त्यामुळे त्या घराचे दुर्दैव आणखीच वाढत असे.

पण ती अजून शोधत असलेल्या दाराबद्दल, मी तुम्हाला आधीच सांगितले आहे. जेव्हा तिच्याबरोबरचे दोन लोक अचानक थांबले, आणि जेव्हा ती वाचनालयापाशी आली, तेव्हा तिला व्हॅन ब्रोकल्यन आणि त्याचे दोन पाहुणे स्पष्टपणे दिसले.

छोटीशी आणि परीसारख्या अंगलटीची, तरूण, खळ्या पडणारी व तिच्या बोलण्यापेक्षा जास्त नम्रपणे, अबोल वाटणारी सुंदरी! तिच्या तेथील आगमनाने सर्व लोकांच्या चेहऱ्यावर, लपवले न जाणारे आश्चर्य पसरले. ही हुशार गुप्तहेर आहे. ती सामाजिक समस्या व अवघड अशा विचित्र समस्या सोडवण्यात वाकबगार आहे. ती सॅटीनच्या कपड्यातील, मोत्याचे दागिने घातलेली, नाचाच्या खोलीतील लाडकी बाहुली होती. मिस्टर स्पिएलहॅगेन यांनी मिस्टर कॉर्नेलकडे नजर टाकली आणि मिस्टर कॉर्नेलनी मिस्टर स्पिएलहॅगेनकडे! आणि दोघांनी

अगदी कळून येईल, अशा अविश्वासाने मिस्टर अपजॉनकडे पाहिले. व्हायोलेटकडे फक्त तिच्यासमोर उभ्या असलेल्या व इतरांइतकेच आश्चर्य वाटलेल्या पण भान राखून असणाऱ्या मिस्टर व्हॅन ब्रोकल्यनकडे बघण्यासाठी डोळे होते. ती त्याच्यामुळे नाराज झाली नाही. टोकाचा कडक व ठाम असणारा एक माणूस त्याच्यात दिसण्याची ती अपेक्षा करत होती. पण तिच्या कल्पनेपेक्षा त्याची पहिली नजर तिला इतकी जास्त दुःखी वाटली, की हे काम घ्यावे की नाही, हा तिचा विचार गळून पडला आणि तिने झटपट एक पाऊल मागे घेतले. ते बघून, तो हसला आणि त्यामुळे तिचे हृदय आणि आशा परत उभारी घेऊ लागले. तो हसू शकतो --- गोडपणे हसू शकतो, याने तिला दिलासा मिळाला --- तो म्हणाला, “मी तुमची या हादरवून टाकणाऱ्या घटनेतील लोकांशी फार घाईने ओळख करून देतो आहे. पहिल्यांदा तुम्हाला बरेच काही सांगायचे आहे.”

मी पहिल्या प्राथमिक गोष्टी टाळून, एकदम व्हायोलेटला  सगळ्या त्याच त्याच गोष्टी परत परत ऐकवल्या. ती डोळे खाली वळवून त्या लोकांसमोर उभी राहिली व स्वतःशीच काही बाबींची तक्रार करत राहिली.

‘आता ते पुढे काही शोध न घेता व समोरासमोर दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून न घेता, हरवलेले पान कुठे आहे, ते माझ्याकडून समजण्याची अपेक्षा करत आहेत. मला त्यांचा माझ्यावरील विश्वास न गमावता, मी हे आता लगेच सांगू शकणार नसल्याचे जाहीर करायला हवे. पण कसे?’

तिचा धीर गोळा करून व प्रत्येक प्रश्नार्थक डोळ्याकडे वेगळा संदेश पाठवत, ती शांतपणे बोलली, “ही काही तर्क करून सांगायची गोष्ट नाही. मला सवड मिळायला हवी. मला आताच समजलेल्या गोष्टींच्या थोडे खोल शिरायला

हवे. मी असे धरून चालते, की मिस्टर स्पिएलहॅगेन जेव्हा बेशुद्ध झाले, तेव्हा मिस्टर अपजॉन यांनी कागदपत्र या समोरील टेबलावर ठेवले.

सगळ्यांनी मान डोलावली.

ते टेबल तेव्हा ज्या स्थितीत होते तसेच अजून आहे का? फक्त कागदपत्र सोडून तिथून काहीही उचलले गेले नाही का?"

"काहीच नाही."

ती हसत रिकाम्या टेबलाकडे निर्देश करत म्हणाली, "म्हणजे हरवलेले पान तिथे नाही. थोडे थांबून तिने तिच्यासमोरील फरशीकडे बघायला सुरवात केली. ती एकसारखा विचार करत होती.

अचानक ती एका निष्कर्षाला आली. मिस्टर अपजॉनना उद्देशून तिने विचारले की त्याने नक्की मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्या हातातून कागदपत्र घेऊन ते वरखाली केले नाहीत व एखादे पान चुकून खाली पाडले नाही?

उत्तर स्पष्ट होते.

प्रत्येकाकडे दिलासा देणाऱ्या स्थिर नजरेने बघत, तिने जाहीर केले, "मग जेव्हा या टेबलावरून कागदपत्र उचलले गेले तेव्हा इतर कागदपत्रात तेरावे पान सापडले नाही व मिस्टर कॉर्नेल वा मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्याकडे नव्हते, त्याअर्थी ते त्या खोलीतच असले पाहिजे."

प्रत्येकजण वेगळ्या आवाजात बोलला, "हे अशक्य आहे. ती खोली पूर्णपणे रिकामी आहे."

तिने अननुभवीपणे मिस्टर व्हॅन ब्रोकल्यनकडे कटाक्ष टाकत विचारले, "मला ती रिकामी खोली बघायला मिळेल का?"

सर्वांना समजून येईल असा नकार देत, मिस्टर "मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन बोलले, "स्पिएलहॅगेन बसले होते, ती खुर्ची सोडून, त्या खोलीत नक्की काहीही नाही."

तरीही हेका न सोडता, पण गोड हसत ती म्हणाली, "तरीही मला ती बघता येईल का?"

मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन अभिवादन केल्यासारखे झुकला. इतक्या आर्जवीपणे केलेली विनंती धुडकावणे त्याला शक्य नव्हते. पण त्याची पाऊले हळू पडत होती आणि त्याची पद्धत नम्र किंवा मित्रत्वाची वाटत नव्हती. तरीही तो शेजारील खोलीकडे चालत गेला व त्याने ती उघडली.

तिला जे अपेक्षित असल्याचे सांगण्यात आले होते, तसेच ते होते. रिकाम्या भिंती व जमीन आणि फक्त एक खुर्ची! तरीही तिने लगेच हार मानली नाही. ती शांतपणे विचारपूर्वक खालच्या भिंतीवरील लाकडी तक्तपोशीकडे बघत राहिली. जणू काही तिला डोळ्यांना सहज न दिसणारी एखादी लपलेली गुप्त जागा दिसत होती.

हे पाहून, मिस्टर व्हॅन ब्रोकल्यनने असे बोलायची घाई केली, "मिस स्ट्रेंज, भिंती मजबूत आहेत. त्यात लपलेली कपाटे नाहीत."

तिने खालच्या भिंतीवरील फक्त अनुभवी डोळ्यांनाच दिसू शकेल अशा लाकडी तक्तपोशीकडे बघत, विचारले, "आणि ते दार? त्या दाराची गडद कड ते उघडायची खूण वाटत होती.

क्षणभर मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन स्तब्ध उभा राहिला. नंतर त्याचे मुख्य लक्षण असणारे, न हलणारे कमकुवत रूप दाखवत, चेहरा लाल होत, तो स्पष्ट करू

लागला.

“एके काळी तिथे दार होते. पण आता ते सिमेंटने कायमचे बंद केले आहे. हे बोलतांना त्याच्या चेहऱ्याचा रंग झटपट पालटून, मोठ्या प्रकाशात तिथे भीतीचे साम्राज्य पसरलेले दिसले.

व्हायोलेटने मोठ्या कष्टाने तिचा शांतपणा राखत म्हटले, “दार!” मग ती स्वतःशीच हलक्या आवाजात पुटपुटली, “मला ते सापडले. मोठे ऐतिहासिक दार! म्हणजे मग ते तुम्हाला हाताने किंवा इतर कशाने उघडणे शक्य नव्हते?

“ते कुऱ्हाडीनेदेखील उघडले नसते.”

तिच्या विजयाच्या मध्ये व्हायोलेटने सुस्कारा टाकला. तिचे कुतूहल शमले होते. पण तिला सोडवायची असलेली समस्या अजून स्पष्ट करता येत नव्हती. पण ती सहजासहजी हार मानणारी नव्हती. मिस्टर अपजॉन सोडून सर्वांच्या डोळ्यातील  निराशा, दुःखात बदलत चालली होती. तिने स्वतःला सावरले.

[ती फारशी निराश झालीच नव्हती.] आणि तिने विचार करून तिचे म्हणणे मांडले.

ती म्हणाली, “एक या आकाराचा कागद गुप्तपणे अचानक उडून तर जाणार नाही किंवा हवेत विरुनदेखील जाणार नाही. तो आहे. तो इथेच कुठेतरी आहे. आणि तो सापडण्यासाठी आपले विचार आनंदी असले पाहिजेत. मी सांगते, की ते आनंदी विचार अजून माझ्यात येत नाही आहेत. पण काहीशा विचित्र भासणाऱ्या पद्धतीने केव्हातरी ते माझ्यात येतील. माझी मला विसरून, मी ज्याने काहीतरी गूढ असे केले आहे, त्याच्यात शिरण्याचा प्रयत्न करेन. जर मला

त्याच्या डोक्याने विचार करता आला, तर मला त्याच्या हालचाली समजतील व नंतर काही क्षण मी असे समजेन, की मी मिस्टर स्पिएलहॅगेन आहे [ काय छानसे हसू हसत, ती हे बोलली.] मी त्यांची कागदपत्रे माझ्या हातात धरेन. माझ्या वाचनात, मला पेय भरलेला पेला देणाऱ्या मिस्टर कॉर्नेलमुळे अडथळा येईल. मग मान हलवत, मानसिक रीत्या मी गाढ झोपेच्या आधीन होईन. त्या झोपेत मला सर्व परिस्थिती स्पष्ट करणारे स्वप्न पडेल. तुम्ही मला हसत तर नाही ना?"

ती चेष्टेखोर सूट मागत होती. पण शेवटी तिला तिचा रस्ता सापडला. तसे नाटक केले गेले. मग तिच्या विनंतीला अनुसरून, सर्वजण निघून गेले. ती तिच्या स्वप्नांबरोबर त्या लहानशा खोलीत राहिली.

तिने विचारले, "मिस्टर स्पिएलहॅगेन या खुर्चीत बसले होते, तेव्हा ती बरोबर अशीच ठेवलेली होती का?"

मिस्टर अपजॉन उत्तरले, "नाही, तिचे तोंड उलटीकडे होते."

तिने मागे होऊन, तिच्या रिकाम्या हाताने खुर्ची फिरवली.

"अशी का?"

मिस्टर अपजॉन व मिस्टर स्पिएलहॅगेन दोघांनीही मान हलवली. तिने बघितले तेव्हा इतरजण देखील तसेच करत होते. उघडपणे समाधानाने तिने स्वतःकडे लक्ष वळवले आणि ती ओरडली,

"लोकांनो, इकडे बघा."

स्वतः बसत, तिने शांतपणे झोपल्याचे सोंग करत, तिचे शरीर सैल सोडले. कसली अपेक्षा करायची आहे हे न समजून, ते डोळे विस्फारून तिच्याकडे बघू लागले. काहीतरी पांढरे तिच्या मांडीवरून घसरुन खालील बाजूच्या जमिनीवर

जिथे लाकडी भाग होता, तिथे पडतांना त्यांनी पाहिले. ते तिने धरलेल्या कागद पत्रांच्या गठ्ठ्यातील पाहिले पान होते. जसे थोडासा संशय असलेले सत्य त्या चकित झालेल्या मनांना दिसले, तिने हाताने त्याकडे निर्देश करत, तिच्या पायाशी झटक्यात उडी मारली व ती ओरडली, "आता तुम्हाला समजले का? ते कुठे पडले होते, ते बघा व नंतर इथे बघा!"

ती गुडघ्यांवर बसून, भिंतीकडे सरकत गेली. तिने खालील बाजूच्या जमिनीवर जिथे लाकडी भाग होता, तिथे निर्देश करत, त्याच्या थोडेसे डाव्या बाजूला दाखवले.

ती किंचाळली, "मूर्ख! जिथे एके काळी दार होते. ती फट अगदी बारीकशी होती. डोळ्यांना सहज दिसतही नव्हती. पण बघा!" इथे तिने पडलेल्या कागदावर बोट ठेऊन, तो तिच्याकडे ओढला व परत त्या फटीत घातला. तो अर्धाअधिक दिसेनासा झाला. तिने त्याना विजयपूर्वक खात्री दिली की ती तो सर्व त्याखाली घालवून दिसेनासा करू शकते. "मिस्टर स्पिएलहॅगेन, आता तुम्हाला समजले, की हरवलेले पान कुठे पडले होते. आता काय राहिले, तर मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन यांनी ते पान तुम्हाला देणे."

IV

एकत्रित आश्चर्ययुक्त आवाज व सुटकेचे सुस्कारे यांनी न समजणाऱ्या गूढाचे रहस्य उकलल्याचे सूचित केले. एका माणसाकडून ते इतक्या हळूवार कातरतेने, कुणाला नकळत बाहेर पडले व तो लगेच तिच्याबरोबर बोलण्यासाठी तिच्याकडे धावला आणि धीटपणे हळूहळू आज्ञा मोडून, मोठ्या टेबलाच्या मागे, वाचनालयाच्या मध्यभागी उभा राहिला. सर्व डोळे त्याच्याकडे

आश्चर्याने बघत असलेले पाहून, त्याने मोकळेपणे व जरासे उद्धटपणे, पण नंतर शहरी सफाईने सुरु केले, “मला माफ करा, पण त्या परिस्थितीत तुम्हाला मदत करणे मला शक्य नव्हते. जर तुम्ही म्हणता, तिथे कागद होता आणि मला दुसरे काही स्पष्टीकरण दिसत नसेल, तर मला असे म्हणावेसे वाटते की निदान आजची रात्र तो तिथेच राहू दे. ज्या सिमेंटमध्ये ते दार बुजवले होते, ते एखाद्या भिंतीप्रमाणे जाडसर व घट्ट होते. हातोडा किंवा स्फोटक द्रव्ये वापरल्याशिवाय, ती बेकायदेशीरपणे फोडता आली नसती व त्यात शिरता आले नसते. आणि असे करण्याची आपली शामत नाही.”

हे बोलणे ऐकून काळजीत पडलेल्या शेकोटीवरील घड्याळाने तासाचे दोन टोले दिले. म्हणजे मध्यरात्रीनंतर दोन तास आणि त्यामुळे रुची असलेल्या लोकांच्या हृदयात अंत्यविधीच्या वेळेस वाजवल्या जाणाऱ्या घंटीसारखा परिणाम झाला.

“पण मी ते समीकरण, उद्या सकाळी सहा वाजायच्या आत आपल्या व्यवस्थापकाच्या हातात देणार आहे. त्यानंतर पाऊण तासाने बोट सुटते.”

कोणीतरी विचारले, “तुम्ही त्याची प्रत आठवून सादर करू शकत नाही का? आणि ती तिच्या योग्य जागी तुमच्या हातातील कागदपत्रांत ठेऊ शकत नाही का?”

“पण तो तसाच कागद असणार नाही. त्यात प्रश्न निर्माण होतील आणि सत्य उजेडात येईल. त्या समीकरणाच्या गुप्ततेत त्या कृतीची खरीखुरी किंमत दडलेली आहे, त्यामुळे एका तिसऱ्या प्रतीच्या अस्तित्वाची शक्यता निर्माण करून मी संशयापासून दूर असणारे स्पष्टीकरण देऊ शकणार नाही. ती कितीही लपवली

तरी त्याचा अटळ असा परिणाम होणारच. माझी बहुमूल्य संधी त्यामुळे निघून जाईल.”

मिस्टर कॉर्नेलच्या मनस्थितीची आपण कल्पना करू शकतो. गुंतागुंतीची खंत व दुःख करत त्याने समजल्यासारखी मान हलवणाऱ्या व ते उभ्या असलेल्या खोलीबाहेर पडणाऱ्या व्हायोलेटकडे एक कटाक्ष टाकला व मिस्टर व्हॅन ब्रोकल्यनकडे निघाला.

मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन खूप उंच असल्याने --- डोके व त्याचप्रमाणे टाचा वर करत --- त्याच्या कानाजवळ जात तिने कुजबुजत काळजीपूर्वक विचारले, “ त्या जागी पोचण्याचा दुसरा कुठला मार्ग नाही का?” नंतर तिच्या लक्षात आले, की त्याने त्याच्या चेहऱ्याचा एकही स्नायू हलवला नाही, तरी खूपच बदलला. त्या एका क्षणात तिचे हृदय भीतीने सुन्न झाले. नंतर ती त्याच्याकडून काही कडक वा मनाई करणाऱ्या शब्दांची अपेक्षा करत होती, तरी तो मुकाट्याने तिच्यापासून दूर निघून गेला. त्याच्या बाजूची खिडकी ओलांडून, त्याने तात्पुरते छत बाजूला करत, बाहेर पाहिले. जेव्हा तो परत आला, तेव्हा तिने पाहिले, तर तो नेहमीसारखा होता. तिच्यासारख्याच कुजबुजत्या आवाजात तो म्हणाला, “दुसरा मार्ग आहे. पण तिथे फक्त एखादा मुलगाच जाऊ शकेल.”

तिने स्वतःचा लहानखुरा बांधा आठवून हसत विचारले, “मी नाही?”

त्या क्षणी तो दचकला. मग तिने पाहिले, की त्याचा हात थरथरू लागला व ओठ कापू लागले. कशामुळे तरी --- तिला का ते कळले नाही, पण त्याची दया आली. त्याच्या मनातील वादळ जाणवून, तिला वाटले की ते वादळ कसले आहे, हे कदाचित तिला समजले असते तर!

तिने कुजबुजत जाहीर केले, “मी काही गुपित फोडणार नाही. मी त्या दाराचा इतिहास ऐकला आहे, कसे ते दार उघडणे, कुटुंबाच्या चालीरीतींविरुद्ध होते. त्यामागे काही भयंकर कारण असले पाहिजे. पण जुन्या अफवांवर माझा विश्वास नाही. आणि तुम्ही जर मला तो मार्ग दाखवलात व त्याने मला जाऊन दिलेत, तर मी तुम्हाला त्याची तुम्ही म्हणाल, ती किंमत देईन. फक्त तो हरवलेला कागद परत मिळवायच्या संदर्भातच मी त्याकडे बघेन. तो कागद नक्की त्या तिथेच थोडासा आत अडकला असणार.“

तिने सुचवलेल्या गोष्टीबद्दल तीव्र नापसंती दाखवणारी त्यांची नजर होती की फक्त मनातील काळजी दाखवणारी होती?

बहुधा मनातील काळजी दाखवणारी होती. कारण तिने त्याची मनस्थिती समजून घेतली, तेव्हा त्याने तिच्या खांद्यावरील सॅटीनच्या चुण्यांना हाताने स्पर्श करत म्हटले,

“तू हे अयोग्य मार्गाने शोधायला बघते आहेस.”

ती हसत बोलली, “दुसरे मार्गही आहेत.” हळूहळू त्याचा स्पर्श जोर देऊ लागला. त्याचे निरीक्षण करताना तिला जुन्या भीतीचे सावट वा प्रामुख्याने नको त्या श्रद्धांचे ओझे तिच्या डोळयात तरळत आहे असे वाटले. त्यामुळे त्याने जेव्हा शेरा मारला की त्याच्यासाठी ती हलकी बाब आहे, तेव्हा ती पूर्ण तयारीत होती.

“जर तू त्या अंधाराच्या व गुंतागुंतीच्या जुनाट जागेत प्रवेश करण्यासाठी तयार असशील, तर मी हत्यारे आणतो. मी त्याचे पैसे मोजेन. मी तुम्हाला उजेड दाखवू शकणार नाही. आणि  तुम्हाला माझ्या सूचनांप्रमाणे रस्ता चालावा लागेल.”

“मी काहीही करायला तयार आहे.”

अचानक तो निघून गेला.

“मी मिस डीगबायला ताकीद देईन. ती तुमच्याबरोबर फार तर तळघरापर्यंत येऊ शकते.”

व्हायोलेट तिच्या गुप्त हेरगिरीच्या छोट्या कारकिर्दीत, अनेकदा विचित्र परिस्थितीत सापडली होती, ज्यात बाई म्हणून तिच्या धैर्याचा व जाणतेपणाचा कस लागला. पण कधीही --- म्हणजे वेळोवेळी तिला तरी असे वाटले, की तिचा धीर कधीही खचला नाही --- जेव्हा ती मिस डीगबायबरोबर तळघराच्या लहानशा दारासमोर उभी राहिली, तेव्हाही नाही. तिला उमगले की तिचा रस्ता इथे आहे --- असा रस्ता ज्यातून एकदा शिरले, की तिला एकटीलाच चालावे लागणार आहे.

पहिल्यांदा ते लहानसे दार होते. वय वर्षे अकरापुढील मूल त्यातून आत जाऊ शकले नसते. पण ती आकाराने लहानच असल्यामुळे, तिला काही अडचण आली नसती.

दुसरे म्हणजे, तुमच्यापुढे नेहमीच काही अनपेक्षित शक्यता असतात आणि जरी तिने मिस्टर व्हॅन ब्रोकल्यनच्या सर्व सूचना नीट काळजीपूर्वक ऐकल्या असल्या तरी आणि त्या पाठ झाल्या असल्या, तरी तिला वाटले की तिने त्या रात्री नाचायला जातांना तिच्या वडीलांचा पापा मोठ्या नाजूकपणे घ्यायला पाहिजे होता. त्याने निर्माण केलेल्या कठीण परिस्थितीत कर्तव्यच्युत होऊन, तिने लैंगिकपणे खालचा ओठ पुढे काढला नव्हता, तर एवढ्या त्याने बंदी केलेल्या प्रसंगी तिने ओठ सहजपणे पुढे आणले होते. ती भीती होती का? जर ती असली, तर तिने ती दिसू दिली नाही का? किंवा तिला अंधाराचा द्वेष वाटत असे. हे काम

तिने अंगिकारले, तेव्हाच तिला हे माहिती होते. पण या क्षणी ती उजेडाच्या खोलीत होती आणि आता तिला खऱ्याखुऱ्या गोष्टीचा सामना करावा लागणार असल्याची, तिने कल्पना केली होती. पण तळघरात प्रवेशद्वाराशी एक दिवा लावला होता. लहानसे दार उघडतांना देखील मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन यांना उजेडाची जरुरी वाटत नसावी. त्या दाराला एकापेक्षा जास्त कुलुपे असावीत, याबद्दल व्हायोलेटची खात्री होती.

संशय, सावल्या व अनोळखी भिंतींमधून एकाकी चढण, उद्दिष्टाकडे नेणारी एकच प्रकाशारेषा आणि तिच्या हातावर फ्लोरेन्स डीगबायचा चिकटून भार देणारा हात!

तिच्या कोवळ्या हृदयाला जास्तीत जास्त ताण देऊन, धैर्य वाढवायची नक्कीच गरज होती. पण तिने ठरवले होते व ती ते साध्य करणार होती. तेव्हा शूरपणे हसत ती लहानशा दाराशी गेली. तिने डोके व खांदे वाकवले आणि तिच्या प्रवासाचा दुसरा टप्पा सुरु झाला. प्रवासात एकेका इंचाचे लहानसे अंतर हृदय धडकवणारे होते आणि एकेक फूट जातांना आपण म्हातारे होत जातो आहे, असे वाटणारे होते. पहिल्यांदा वाट सुकर होती. तिला फक्त रांगत जावे लागायचे. दोन माणसे बोलण्याच्या अंतराजवळ असल्याने जाणीवपूर्वक वाटणारा दिलासा अनुभवत, थोडेसे तिरपे होऊन, जवळजवळ तिच्या धडधडत्या हृदयाने ती आता एका वळणाजवळ आली. त्याच्यापलीकडे तिच्या डाव्या हाताला भिंत लागेना. नंतर एक चढायची पायरी लागली, जिथे ती थोडी अडखळली. मग थोडा चढ लागला. तिथे प्रत्येक पाऊलावर खात्री करूनच पुढे जाण्याची सूचना तिला देण्यात आली होती. कारण अनेक वर्षांनी ते लाकूड झिजून, कमकुवत झालेले असण्याची शक्यता होती. त्यामुळे ते तिचे वजन घेऊ शकेल की नाही, याची खात्री नव्हती.

एक, दोन, तीन, चार व पाच पायऱ्या आणि  नंतर मोकळी जागा असलेले सपाट पठार लागले. तिचा अर्धा प्रवास करून झाला होता.  अनेक वर्षे तेथे हवा साचून राहिली असल्याने, तिला असे वाटले की इथे धापा टाकत उभे रहायला थोडा वेळ आहे. शिवाय इथे तिला दिल्या गेलेल्या सूचनांबरहुकूम, काही गोष्टी करायच्या होत्या. तिला तीन काड्या देण्यात आल्या होत्या आणि एक छोटीशी मेणबत्ती! तिथे पूर्ण अंधार असल्याने तिला मेणबत्ती लाऊन जमिनीवर ठेवायला सांगण्यात आले होते, जेणेकरून परतीच्या प्रवासात, तिचा जिना चुकून ती पडणार नाही. तिने असे करायचे वचन दिले होते आणि पूर्ण अंधारात, उजेडाची ठिणगी बघून, तिला जीवनाधार मिळाल्यासारखे झाले.

आता ती जगापासून पूर्णपणे तुटलेल्या मोठ्या खोलीत उभी होती. त्या तिथे युद्धामध्ये ऑफिसरकडून मेजवानी दिली गेली होती आणि अनेक परिषदा पार पडल्या होत्या. जगापासून पूर्णपणे वेगळ्या पडलेल्या या खोलीने एकापेक्षा जास्त दुःखी घटना अनुभवल्या होत्या. मिस्टर व्हॅन ब्रोकल्यनने तिला खूप गोष्टी सांगितल्या होत्या. पण तिला त्या जाहीर न करण्याबद्दल व उजव्या हाताच्या भिंतीकडून दिशा बदलतांना, ती शेकोटीजवळ येईपर्यंत काळजी घेण्यास सांगण्यात आले होते. ते मोठे वळण ओलांडले गेले. तिच्यासमोरील अंधुक उजेडातून, बंद दाराच्या तळाशी पडलेल्या चिरांमधून ठळक प्रकाश चमकत होता. त्या चिरेमध्ये कुठेतरी तो कागद पडलेला असण्याची शक्यता होती.

जर तिने फक्त त्या फटीकडे पाहून तिचाच विचार केला असता, तर सर्व काही साधे, सोपे व हासील करण्यास सुकर होते. तर मग भीतीचा जो आवंढा तिच्या घशात दाटून येत होता, तो आला नसता. जर गोष्टी अभेद्य अशा कफनाच्या अंधारातच राहिल्या असत्या, तर  तिच्या उत्कंठीत तर्कावर पुसटशी सूचनाही

मिळाली नसती! पण ती जिथून आता धडपडत आली, त्या बोळाच्या मार्गातील काळाकुट्ट अंधारासारखी परिस्थिती इथे नव्हती. तो तिच्यामागील जिन्याच्या वर फडफडणाऱ्या त्या मंद ज्योतीचा परिणाम होता की तिच्या बघण्याच्या शक्तीतील फरकाचा होता कुणास ठाऊक! पण तिच्या आताच्या दृष्टीकोनात नक्कीच फरक पडला होता. उंच आकृती स्पष्ट होत होत्या --- हवा धुरकटलेली नव्हती. तिला दिसू शकत होते. नंतर तिला अचानक कारण कळले. भिंतीमध्ये वरती, तिच्या उजव्या हाताला एक खिडकी होती. ती लहानशी असून स्पष्ट दिसत नव्हती. कारण बाहेरून ती पडद्याने झाकलेली होती आणि आतून तिला असंख्य वर्षांची जळमटे लागलेली होती. पण चांदण्या रात्रीचा थोडा उजेड तिथून येत होता व त्यामुळे सामान्य गोष्टींचा भ्रम दूर होत होता. त्या इतक्या भयंकर होत्या की त्या दिसल्या नसत्या, तर बरे झाले असते. त्या अर्धवट पाहूनदेखील तिच्या हृदयाचा भीतीने थरकाप उडवत होत्या.

ती गुडघ्यांवर बसून रांगत पुढे जातांना, स्वतःशीच पुटपुटली, “मला हे सहन होत नाही. तिच्या मनात पुढचा विचार आला, की डोळे मिटून घ्यावे व स्वतःच अंधार तयार करावा. तिने कशाबशा पापण्या घट्ट मिटून घेतल्या. ती पुढे सरकत राहिली. शेकोटी मागे टाकली. तिथे काहीतरी जोरात आवाज करत पडले. जर तिला दिलेल्या सूचना तिने नीट पाळल्या असतील, तर ती ज्या भिंतीपाशी पोचली असती, त्या अभेद्य अशा भिंतीमागे असलेल्या तिच्या प्रयोगाच्या निकालासाठी उत्कंठीत लोकांच्या दबल्या गेलेल्या आवाजासारखा तो वाटला. त्यामुळे अचानक ती तिच्या विचारांपासून बाजूला पडली. परत एकदा तिने डोळे उघडले व समोर नजर टाकली. आनंदाची गोष्ट म्हणजे तिला काही पायऱ्या अंतरावर तिचा प्रवास संपवणारी, प्रकाशाची बारीक रेषा दिसली.

त्यानंतर क्षणभरात तिने हरवलेले पान शोधून काढले.

घाईघाईने ते धुळकट जमिनीवरून उचलून, ती गरकन वळली आणि आनंदाने आलेल्या पायऱ्यांवरून, परतू लागली. पण त्यानंतर काही मिनिटात ती अचानक रानटीपणे किंचाळू लागली. त्याने त्या गुहेसारख्या खोलीच्या भिंती दणाणून उठल्या आणि तिच्या संशयपूर्ण साहसाच्या निकालाची वाट बघत असलेले, पण भीतीदायक व जणू बोगद्यासारख्या असणाऱ्या पॅसेजमध्ये न शिरता त्याच्या टोकाला उभे असलेल्या लोकांच्या हृदयात जणू सुरीची काटेरी पात घुसली.

काय झाले होते?

जर त्यांनी बाहेर बघायचे ठरवले असते, तर त्याना दिसले असते, की चंद्राला एका ढगाच्या कडांनी, अर्धे आकाशभर पसरत, गिळले होते --- अचानक त्याच्या कडांची तोडफोड करत, लांब चंद्रकिरण प्रत्येक पडदारहीत खिडकीत धाडले होते.

VI

फ्लोरेन्स डीगबायला, तिच्या छोट्या, सुरक्षित आयुष्यात बहुधा फार खोलवर भावना म्हणजे काय, ते कधीच माहिती नव्हते. पण त्या क्षणी तिला तिच्या कानात अजून घुमणारी व्हायोलेटची हृदयद्रावक किंकाळी ऐकून, भयानक भीती वाटली. ती मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅनकडे बघण्यासाठी वळली. आणि मागील त्या दणकट भासणाऱ्या माणसाला, ताबडतोब मोडून पडतांना पाहिले. तो त्याच्या कफनात झोपायला जाईल तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर जसे भीतीचे भाव दिसतील,

तसे त्याच्या चेहऱ्यावर टोकाचे भीतीचे भाव दिसत होते. ती इतकी थरथरू लागली, की जवळ जवळ पडायला आली. पण तिने त्याला हाताने धरले व काय झाले हे समजून घेण्यासाठी, त्याचा चेहरा वाचू लागली. व त्याने ज्यासाठी मनाची तयारी केली होती, असे काहीतरी संकटात टाकणारे असणार! पण तरीही प्रत्यक्षात ते झाल्यावर, तो मोडून पडला होता. ती गरीब बिचारी बाई ज्यात पडली, तो खोल खड्डा होता का? जर तसे असेल --- पण तो तर बोलत होता --- स्वतःशीच काही पुटपुटत होता. त्यातील काही ती ऐकू शकली. तो स्वतःची नापसंती व्यक्त करत होता --- तेच तेच बोलून सांगायला बघत होता, की त्याने अशी संधी तिला द्यायला नको होती. त्याने तिचे तारुण्य आठवायला हवे होते --- एका तरुण मुलीच्या धैर्यातील कमकुवतपणा! तो वेडा झाला होता आणि आता --- आणि आता --- तेच तेच शब्द उच्चारून, त्याची पुटपुट संपली. त्याची सगळी ताकद आता खालचे दार ज्यापासून अलग होण्याची तो वाट बघत होता, ज्या दारातून आत शिरणे किंवा ते मोठे करणे, अशक्य होते --- कुठल्याही मदतीचा काहीही उपयोग नव्हता. जिथून फक्त आवाज जाऊ शकत होता, पण कदाचित तिचे शरीर, पण आता ते कुठे होते? कुठे पडले होते?

शक्तिपात झाल्यासारखे मिस डीगबायने विचारले, "तिला लागले आहे का? उत्तराची अपेक्षा करत, ती वाकली.

"तुम्हाला काहीतरी ऐकू येते आहे का?

"काहीतरी?"

क्षणभर तो काहीच उत्तरला नाही. सगळे अवयव कानात गोळा झाले. मग हळूहळू धापा टाकत, तो कसेबसे बोलला,

“मला वाटते --- मला ऐकू येते आहे --- काहीतरी --- तिचा पदरव --- नाही. नाही. पाऊलांचा आवाज नव्हे. सर्व काही मरणकळेइतके शांत आहे, आवाज नव्हे --- श्वासाचा आवाज नव्हे --- तिला चक्कर आली आहे. अरे देवा! अरे देवा!  आता सर्वावर कडी करणारे हे संकट कशासाठी!!”

या उत्तेजित करणाऱ्या बोलण्यानंतर, तो त्याच्या पायांवर उभा राहिला, पण पुढच्याच क्षणी गुडघ्यांवर कोसळला. तो ऐकत राहिला. तो ऐकत राहिला.

थडग्यामधून काही पुटपुट ऐकू येत असल्यासारखी भीतीदायक शांतता पूर्वी कधीच नव्हती. फ्लोरेन्सला त्याची फारच भीती वाटू लागली व तिच्या अंगातून घाम गळू लागला. तेव्हा मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅनने ताकीद दिल्यासारखा घाईघाईने, जोराने, तिचा हात हातात घेतला.

अवाक झालेल्या तिच्या अंगातून बारीक आवाज ऐकू येऊ  लागला व तो अजूनअजून मोठा होऊ लागला. थोडा कमी झाला आहे असे वाटत असतांना, पुन्हा वाढला. दुरून कोणाची तरी चाहूल लागल्यासारखे वाटून तिची घाबरगुंडी उडाली. तो आवाज अधिक जवळ येऊ लागला.

तिच्या तोंडून दिलासा देणारे शब्द उमटले, “ती सुरक्षित आहे. तिला काही लागलेले नाही. मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅनही तितकेच आनंदी व्हावेत, अशी तिची अपेक्षा असल्याने ती त्यांच्याकडे मजेने काही बोलत वळली.

“आता जर ती हरवलेले पान सापडण्याइतकी सुदैवी असेल, तर आपल्या सर्व भीतीचे सार्थक झाले असेच म्हणावे लागेल.”

पुढेमागे हालचाल करत शेवटी ते उभे राहिले. पण ती बोललेले त्याना ऐकू आल्याचे काही चिन्ह त्यांनी दाखवले नाही. त्यांच्या हावभावांवरूनही तिला तसे

काही जाणवले नाही. फ्लोरेन्सला वाटले, की ती सुखरूप परत आल्यामुळे, ते बरे होण्यापेक्षा जास्त घाबरलेलेच आहेत. व्हायोलेटच्च्या प्रत्येक पुढील कारवाईने ते जास्त जास्त घाबरू लागले.

जरी हे खूप कृत्रिम वाटत असले, तरी ती तिच्या परीने परिस्थिती निवळवण्याचा प्रयत्न करत होती आणि जेव्हा त्याने व्हायोलेटच्च्या दृष्टीकोनाला प्रोत्साहन देण्यासाठी काहीही प्रयत्न केले नाहीत, तेव्हा तिची मान खाली गेली. तिने एक आनंददायक आरोळी मारून व्हायोलेटचे स्वागत केले. त्यामुळे गरीब बिचाऱी गुप्तहेर व्हायोलेट नक्कीच खूष झाली.

फ्लोरेन्सच्या मदतीने, शेवटी अरुंद भगदाडातून, बाहेर येऊन, तळघरा पाशी उभी राहिलेली व्हायोलेट कशीतरीच दिसत होती. अशक्त, थरथरणारी आणि अनेक वर्षांच्या धुळीने माखलेली अशी ती, दयनीय दिसत होती. पण फ्लोरेन्सच्या चेहऱ्यावरील भाव बघून तिला थोडी उभारी आली. ठळकपणे दिसणाऱ्या तिच्या हातातील कागदाकडे बघत, तिने मिस्टर स्पिएलहॅगेन कुठे आहेत, असे विचारले.

ती म्हणाली, “मी महत्वाचे समीकरण असलेला तेरा क्रमांकाचा कागद मिळवून आणला आहे. जर तुम्ही त्यांना आणलेत, तर मी तो त्यांच्या हवाली करेन.”

दूर सावलीत उभ्या असलेल्या मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅन यांच्याकडे तिने कटाक्ष टाकल्यावर त्यांनी तिच्या साहसाचे कौतुक केले नाही. ती पण काही बोलली नाही. जेव्हा तो कागद मिळाला व मिस्टर स्पिएलहॅगेन यांच्या बाबतीतील सर्व गोष्टी सुरळीत झाल्या, तेव्हा निरोप घेण्यासाठी सर्वजण वाचनालयात जमले.

त्यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना, ती म्हणाली, “मी अंधारामुळे व पूर्ण शांततेमुळे घाबरले होते. म्हणून किंचाळले. कुणीही अशा शिळया, कुबट वासाच्या ठिकाणी एकटे अडकल्यावर नक्कीच माझ्यासारखेच किंचाळले असते.”

ती निष्काळजीपणे जे पुढे बोलली, त्यामुळे मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅनचे गाल फिके पडले, हे एकजणाच्याच नव्हे तर बऱ्याच  जणांच्या लक्षात आले.

मिस्टर कॉर्नेल हे त्यांच्यावर काही किटाळ न आल्याने खुषीने हसत म्हणाले, “तिथे भुते नव्हती का? काही कुजबुजते ओठ वा अदृष्य, अस्पर्श्य हातांची भुते नव्हती का? मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅन यांनाही गेल्या अनेक वर्षात माहिती नसलेली गुप्त भुते असलेल्या खोलीचे गूढ तुम्हाला स्पष्ट करायचे नाही का?”

व्हायोलेट खळया पाडून हसत बोलली, “नाही, तसे काही नाही.”

सभ्य माणसाकडून हे कडकपणे विचित्र रीतीने, नकळत सुचवले गेले. हसतखेळत म्हटले गेले, “जर मिस स्ट्रेंज यांना तसा काही अनुभव आला असता, तर --- इतके उल्लेखनीय असे सांगण्यासारखे व उत्सुकता शमेल असे काही असते, तर ती आता ते सांगेल. मिस स्ट्रेंज, तुम्हाला काही सांगायचे आहे का?”

चमकून तिने डोळे मोठे करून त्याच्याकडे क्षणभर पाहिले आणि मग दाराकडे तोंड करून सहज असा शेरा मारला, “मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅन यांना त्यांचे घर माहिती आहे आणि संशयातीतपणे ते त्याच्या इतिहाससंबंधी त्याना काही सांगायचे असेल, तर सांगू शकतात. मी जरा घाईत आहे. माझे येथील काम

संपलेले आहे. मी आता घरी जाण्यासाठी तयार झाले आहे. आता माझ्या नशीबात पुढची कुठली समस्या येते ते पाहू.”

ती अगदी जायला निघाली होती --- सगळयांचा निरोप घेत होती. तेव्हा अचानक तिच्या खांद्यावर दोन हात पडले. तिने वळून पाहिले, तेव्हा तिची मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅन यांच्याशी नजरानजर झाली. ते तोंडातल्या तोंडात पुटपुटत बोलले, “तुम्ही पाहिले!”

ती ज्या तऱ्हेने शहारली, त्याने त्यांना शब्दांपेक्षा चांगले उत्तर मिळाले.

दुःखाने काही उद्गार काढत, त्यांनी हात काढून घेतले आणि इतर चक्रावून गेलेल्या लोकांकडे वळून, काहीसे भानावर येत बोलले, “मिस व्हायोलेटने अजून तासभर थांबावे. मला आता माझे दुःख माझ्यापाशी ठेवणे शक्य नाही. माझे आयुष्य विभागणारी रेषा अलीकडेच उमटली होती. मला माझा भूतकाळ जाणणाऱ्या कोणाची तरी सहानुभूती मिळाली नाही, तर मी स्वतःवर लादलेल्या एकाकीपणामुळे वेडा होईन. मिस स्ट्रेंज, परत या. मिस स्ट्रेंज, सर्वजणांमध्ये तुम्हाला मी सांगेन ते ऐकण्याचा पहिला अधिकार आहे.”

VII

तो म्हणाला, “मला सुरवात केली पाहिजे. ते सर्वजण ऐकायच्या तयारीने बसले होते. मी तुम्हाला कुटुंबाच्या चालीरीतींचा नव्हे, तर त्यांचा व्हॅन ब्रोकल्यॅनच्या पुढच्या पिढीवर कसा परिणाम झाला, ते सांगतो. कौटुंबिक हस्तक्षेपापासून दूर अशी एखादी तरी खोली तुम्हाला फक्त इथेच नव्हे तर इंग्लंड मध्ये व अमेरिकेतही जुन्या घरांमध्ये असलेली आढळेल.

पण त्यांच्यापैकी बऱ्याचशा घरात व आमच्यात फरक होता.

आम्हाला जायला व उघडायला बंदी असलेल्या खोलीला कुलूप नसायचे. तशी आज्ञा असणे पुरेसे असायचे. जुनाट श्रद्धांची भीती व दहशत इतकी असायची, की निमूटपणे प्रश्न न विचारता आज्ञा पाळली जायची. ''पूर्वजांनी या खोलीत जायला बंदी का घातली, हे तुझ्यापेक्षा मला जास्त माहिती आहे'' असे सांगून आम्हाला गप्प बसवले जात असे. माझ्या लहानपणापासून मला असे समजले होते, की घरातील एका खोलीचे कुलूप कधीच हात लाऊनदेखील बघायचे नाही. जर आज्ञाभंग केला, तर कुटुंबाची इभ्रत जात असे आणि हे मी मरेपर्यंत पाळायचे असे.

तुम्ही हे सर्व काही वेगळेच असल्याचे म्हणाल. त्याचे काही कारण सांगितले नाही, तरी त्या काळातील लोक अशा बेकार गोष्टी पाळत असत. जेव्हा पटेल असे कारण सांगितले जात नसे, आणि मूळ ती पद्धत कशामुळे आली ते लोक विसरून जात असत. तुमचे बरोबर आहे, पण मानवी स्वभाव असा आहे, की घट्ट असणारे बंध हे मानवनिर्मित नसतात --- सर्व नायकगिरीच्या मुळाशी असलेली कल्पना माणसाला वाकायला लावते. त्याची सर्वांना वेगवेगळ्या प्रकारे दहशत बसते.

ही गोष्ट माझ्या बाबतीत मला एकाकी ठरवणारी झाली. असे एखादे मूल क़्वचितच असेल. माझे आईवडील एकमेकांबरोबर इतके दुःखी असायचे, की त्यांच्यापैकी एकजण नेहमीच दुसऱ्यापासून दूर असे. मी त्यांना दोघांना घरी असलेले क़्वचितच  पाहिले असेल. त्यांच्यातील बेबनावाचा माझ्या स्वभावावर

परिणाम झाला. मी स्वतःला अनेक वेळा विचारत असे, की त्यांचे माझ्यावर खरोखर प्रेम आहे का. मी वडिलांशी आईबद्दल व आईशी वडीलांबद्दल बोलत

असे, पण कधीच आनंदाने नव्हे. हे मला तुम्हाला सांगणे भाग आहे, कारण त्याशिवाय तुम्हाला माझी गोष्ट समजणार नाही.

देवाला मी दुसरी गोष्ट सांगू शकेन. दुसऱ्यांना जशा वडीलांच्या जवळीकेच्या व आईच्या पाप्याच्या आठवणी असतात, तशा मला कधीच नव्हत्या, पण देवाच्या होत्या. माझे आधीच खोलवर असलेले दुःख फारच वाढले. मी वेगळाच मुलगा झालो. कदाचित झाले ते चांगलेच झाले असेल. मी माझे वेगळेच नशीब बनवले असेल --- कुणाला काय माहीत!

ही गोष्ट माझ्या बाबतीत मला एकाकी ठरवणारी झाली. असो.

त्यामुळे माझी करमणूक करण्यासाठी मी सर्वांपासून दूर फेकला गेलो होतो. यामुळे मला एक दिवस एक शोध लागला. तळघरातील एका लांबच्या भागात एक पिप पडले होते, तिथे मला एक लहानसे दार सापडले. ते इतके बुटके होते, पण माझ्या शरीरासाठी योग्य होते. मला त्यात शिरून बघण्याची खूप इच्छा होती. पण मी तिथे फिरकू शकत नव्हतो. शेवटी मला अपेक्षित असलेले झाले. एक नोकर होता. तो इतर कुणाहीपेक्षा माझ्या जवळ प्रेमाने येत असे. एकदा जेव्हा मी एकटाच तळघरात होतो, तेव्हा मी माझा चेंडू बाहेर काढला व तो उडवू लागलो. कधीतरी तो त्या पिपामागे जाऊन पडला. मी मिशेलकडे तो मला लगेच हवा असल्याचे रडत सांगत गेलो.

ते काम फार शक्ती लागणारे वा कसून काही शोधण्याचे होते, पण त्याने ते जमवले. काही जोरदार प्रयत्नांनंतर, त्याने ते पिप बाजूला ढकलले आणि मला ते माझ्या मनातील आनंदनिधान असणारे लहानसे, गूढ दार दिसले. पण मी तेव्हा

त्याकडे गेलो नाही. काही सहजप्रवृत्तीने मला असे करण्यापासून रोखले. पण जेव्हा तिथे एकट्याने जायची संधी मिळाली, तेव्हा मोठे साहस करून, मी गेलो. पिपा मागे घसरून लहानशा दाराचे हँडल फिरवून पाहिले. ते फिरले आणि थोडे ओढल्यावर दार उघडले. माझा चेहरा पडलेला असला, तरी मी उद्दीपित झालो होतो. पुढे झुकून मी त्यात डोकावलो. मला काहीच दिसले नाही --- काळे विवर आणि काही नाही. मी अंधाराला घाबरतो --- अजूनसुद्धा घाबरतो. पण कुतूहल आणि साहसी वृत्तीचा विजय झाला. मी गुहा शोधणारा रॉबिन्सन क्रूसो आहे, असे स्वतःला सांगत, मी रांगत आत गेलो. पण आत काहीच नव्हते. आत पूर्ण अंधार होता.

त्यात काही मजा नव्हती, त्यामुळे मी रांगत परत बाहेर आलो. मी जेव्हा परत हाच प्रयोग केला, तेव्हा माझ्या हातात मेणबत्तीचा तुकडा व गुप्तपणे आणलेली काडेपेटी व दोन काड्या होत्या. एका काडीने थरथरत्या हाताने मेणबत्तीचा तुकडा पेटवल्यावर, मला काय दिसले तर कुठल्याही मुलाची निराशा करेल, असे काही दिसले. पण माझी निराशा झाली नाही. इकडे तिकडे पडलेला पसारा, काही खेळायचे पट, कोपऱ्यात पडलेले मी पाहिले. काळोखात मला जिन्यासारखे काहीतरी दिसले. तो कुठे जात असेल, याचा मी मनातही विचार केला नाही. पण थोडे कां कू केल्यावर व थोडासा मोठ्या श्वास घेतल्यावर, शेवटी

मी त्या पायऱ्या चढलो. मला माझी तेव्हाची मनस्थिती चांगली आठवते. मी एका अरुंद, बंद दारासमोर उभा होतो. ती ठळकपणे  आजोबांची खोली असल्यासारखे मला वाटले --- ते लाकडी दार उघडायला आम्हाला बंदी होती. इथे मला पहिल्यांदा थरथरायला झाले. मी तयार झालो. पण तेवढ्यात मेणबत्ती विझल्याने, गडबडलो. माझा तोल गेला व मेणबत्ती हरवली. त्यामुळे पूर्ण अंधार माझ्यावर चालून आला. मी अतिशय घाबरलो. त्या मनाई केलेल्या खोलीत गेल्याने, माझ्या कल्पनाशक्तीला ढवळून काढणारे प्रेतावरचे समंध मला दिसू लागले. इथून निसटून, माझ्या सुरक्षित व कुणी मला बघणार नाही, अशा तऱ्हेने माझ्या खोलीत मी केव्हा जाईन, असे मला झाले.

पण ही खोलवर वाटणारी भीती खरी भीती नव्हती. ती खरी भीती मला तेव्हा वाटली, जेव्हा अंधार अजून वाढला आणि घराच्या सताड उघड्या हॉलमधील उजेडाच्या सहाय्याने मी परतीचा मार्ग शोधला. मेणबत्तीजवळ माझ्या हातून काहीतरी पडल्याने मी जागरूक झालो. माझी काडेपेटी मी गमावली होती --- माझी नव्हे तर माझ्या आजोबांची, जी मला टेबलावर पडलेली सापडली होती. त्या सकाळी मला घरात जाणवलेली ती एक गोष्ट होती व दुसरी म्हणजे ती हरवली होती. माझ्या तरुणपणाच्या जादा आत्मविश्वासाने ती हरवली होती. मी थोडा वेळ तरी त्याचा उपयोग करू, असे म्हणून मोठे साहस करून ती उचलली होती व गोंधळ होऊन ती हरवू नये अशी इच्छाही खरे तर प्रकट केली होती. ती साधीसुधी काडेपेटी नव्हती, तर सोन्याची होती. काही त्यांनाच माहिती असलेल्या खास कारणाने बनवण्यात आली होती. कधीतरी मला त्याची किंमत समजेल आणि व ती आता माझ्याजवळ असल्याचा मला अभिमान वाटेल, असे आजोबा समजत असणार. पण आता मी ती त्या भगदाडात विसरून आलो होतो. त्यामुळे

आजोबांना तिचा विरह होणार होता. ते कधीही तिची मागणी करू शकत होते. माझा दिवस छळीक पद्धतीने गेला. माझी आई बाहेर गेली होती किंवा खोलीत बसून होती. माझे वडील --- मी त्यांच्याबद्दल काय विचार केला आता आठवत नाही. तेदेखील कुठे दिसत नव्हते. मी त्यांचे नाव घेतले, तेव्हा नोकर मंडळी माझ्याकडे विचित्र नजरेने बघत होती. पण ते घर सोडून गेल्याने घराला बसलेला हादरा मला फारसा समजला नाही. माझा त्रास एवढाच होता, की जेव्हा आजोबांना खाली वाकून नमस्कार करायची वेळ येईल, तेव्हा मी त्यांच्या डोळ्याला डोळा कसा भिडवू.

आज रात्री मला त्यांच्या चौकशीला तोंड द्यावे लागणार, याने मला प्रथम दिलासा मिळाला पण नंतर भीती वाटू लागली.

त्याना त्यांची वस्तू हरवली, हे कळून, ते खूप रागावले होते. आज ना उद्या ते मला त्याबद्दल विचारणार आणि मला खोटे बोलावे लागणार कारण मी तिथे गेलो होतो, असे सांगायचे धैर्य माझ्यात नव्हते. अशा कृत्याबद्दल त्यांनी मला कधीच माफ केले नसते. निदान मला तरी असे वाटत होते. त्याबाबतीत त्यांचा थंडपणा व दुर्लक्ष झाले, कारण माझे आईवडील घरातून पळून गेल्याने खळबळ उडाली होती. पण मला याबद्दल फारशी माहिती नव्हती. मला माझे नेहमीचे सर्व व्यवहार --- रात्री झोपेपर्यंतचे --- नोकरांमार्फत करता आले. पण घरावर पसरलेली शोककळा याबद्दल माझ्या मनात वेगळीच भावना होती. खरी परिस्थिती मला माहितीच नव्हती. माझा गुन्हय्ाचे [माझ्या मनात आतापर्यंत त्याने मोठे रूप धारण केले होते.] चित्र मी सतत रंगवत बसलो होतो.

माझ्या अंथरुणातून मी गार जमिनीवर कधी पडलो, हे मला समजलेच नाही. माझ्या मते ते गुडूप रात्री झाले पण दहापेक्षा जास्त वाजले नसावेत. माझ्यासारख्या झोप उडालेल्या मुलाचा वेळ जाता जात नव्हता. मग मी एक उपाय शोधून काढला. तो भयानक असल्याचे मला समजत होते --- मी त्या विचारानेही घाबरलो होतो. मी माझ्या छोट्या मनाशी ठरवले होते, की खाली तळघरात जायचे व ती काडेपेटी शोधायचा प्रयत्न करायचा. मी बरोबर माझीच काडेपेटी व मेणबत्ती घेणार होतो. चिडीचूप घरावरून असे वाटत होते, की सगळेजण झोपलेले असतील, तर कुणाला मी गेल्याचे व आल्याचे कळणारही नाही.

अंधारात कपडे बदलून, मी काडेपेटी व मेणबत्ती शोधली. माझ्या एका खिशात ती ठेवली. हळूच दार उघडले व बाहेर बघितले. कोणीही तिथे नव्हते. सर्व दिवे मालवलेले होते. फक्त खालच्या हॉलमधील एक दिवा जळत होता. तो अजून का जळतो आहे, हे मला समजले नाही. सर्वजण माझ्या आईला शोधण्यासाठी प्रयत्न करत आहेत, हे मला कसे समजणार? जर मी घड्याळाकडे पाहिले असते --- पण मी पाहिले नाही. मी मला करायच्या असलेल्या कामगिरीचाच विचार करत होतो. दुसरे काही मला सुचत नव्हते.

मी खाली हॉलमध्ये गेलो आणि भिंतीवर पडलेल्या माझ्याच सावलीने मी घाबरलो आणि वळलो. मला आजही ते जणू कालच घडल्यासारखे स्पष्टपणे आठवते. पण मी माझा विचार बदलला नाही. कशानेच माझा विचार बदलणार नव्हता. मी तळघरातील पिपामागे वाकलो. मागील भगदाडात शिरण्यापूर्वी खोल श्वास घेतला. असे करतांना काही आवाज झाला असावा. मी प्रार्थना करू लागलो, की हा आवाज वर ऐकू जाऊ नये. पण चुकून केवळ भीतीने त्याहूनही मोठा

आवाज माझ्याकडून झाला. इतरही आवाज येत होते. माझ्या प्रत्येक बाजूने गोंधळ घालत मोठ्याने पाऊले हलल्याचा आवाज खालून येत होता. उंदीर! भिंतीत उंदीर होते!! मी तिथून कसा काय हललो मला माहिती नाही. पण हललो, तेव्हा मला पुढे त्या विचित्र भगदाडात शिरावे लागले.

मी आत गेलो, तेव्हा मेणबत्ती पेटवू लागलो पण काही कारणाने मी अंधारात कोलमडू लागलो. मी भिंतीला धरून जिथे माझ्या हातून आजोबांची काडेपेटी पडली होती, त्या पायऱ्यांपर्यंत गेलो. आता ती शोधण्यासाठी उजेडाची गरज होती. पण माझा हात खिशाकडे जाईना. मला वाटले, आधी पायऱ्या चढलेल्या बऱ्या. हळूच पायाला पहिली पायरी लागली. मग दुसरी. अजून मला फक्त तीन पायऱ्या चढायच्या होत्या आणि मग माझ्या उजव्या हाताला भिंत लागत होती. मग मी काडी ओढण्यासाठी मोकळा झालो असतो. मी त्या तीन पायऱ्या चढलो व दाराशी स्थिर होत होतो, तेव्हा काहीतरी झाले --- इतके अचानक काहीतरी विपरीत व अविश्वसनीय घडले, की मला आश्चर्यच वाटले. पण मी भीतीने किंचाळलो नाही. माझ्या हाताने दार हलत होते. ते हळूहळू आत उघडले जात होते. तयार झालेल्या फटीतून येणाऱ्या गार हवेचा जोरात आवाज झाला. क्षणोक्षणी तो आवाज वाढू लागला. फट मोठी मोठी होत होती --- तिथे कुणीतरी होते --- तिथे जिना संपत होता. तिथे मी एका ढीगात पडलो. ते पुढे येत होते का? त्याला हात पाय होते का? त्याला मी स्पर्श करू शकत होतो का?

ते काही असले, तरी ते निघून जाईना. आता मी माझे डोके उचलून त्या आवाजाच्या दिशेने जाऊ लागलो --- मानवी आवाज --- माझ्या आईचा आवाज

--- माझ्यापासून फक्त हातभर अंतरावर, मी हात लांबवून तिला स्पर्श करू शकत होतो.

ती माझ्या वडिलांशी बोलत होती. मी ते नादावरुन ओळखले. त्यामुळे माझे तरुण मन एकदम गडबडून गेले. ती बोलत असलेले मला थोडेसे समजल्यासारखे वाटले. त्याने माझ्या मनात इतकी खळबळ निर्माण केली, की मी ती कधीच विसरणार नाही.

ती बोलली, “मी आले आहे. त्यांना वाटते आहे, की मी घरातून पळून गेले आणि ते मला इकडे तिकडे शोधत आहेत. आपण विचलित व्हायचे नाही. आपण इथे असू, याची कुणी कल्पनाही केली नसेल.”

इथे! हा शब्द माझ्या छातीवर कोसळला. मला काही मिनिटात समजले, की मी इथे बंदी असलेल्या खोलीशी उभा आहे. पण तिथे ते होते. माझ्या डोक्यात काय वादळे उठली, ते मी तुम्हाला समजावून सांगू शकत नाही. मी कधीच असा विचार केला नव्हता, की असा घरचा नियम मोडणे शक्य असेल.

मी माझ्या वडिलांचे उत्तर ऐकले. पण त्याचा अर्थ मला समजला नाही. शिवाय ते काही अंतरावरून बोलले --- ते खोलीच्या एका टोकाला होते तर मी दुसऱ्या टोकाला. माझ्या धडधडणाऱ्या हृदयाचे ठोके आईला ऐकू जाऊ नयेत वा तिला मी तिथे असल्याचा संशय येऊ नये म्हणून, मी जीवानिशी प्रयत्न करत होतो. काळोख --- किंवा खरे तर त्या जागेचा काळेपणा असेच म्हणायला हवे --- तो विजेच्या कडकडाटाने चमकून उठला. आवाज फारसा नाही, पण एकदम काही चमकले आणि मला माझ्या वडिलांची आकृती दिसली. ते त्यांच्या आसपासच्या

वस्तू चकाकवत उभे होते. ते सर्व मला अनैसर्गिक वाटले. पण नंतरच्या काळात ती भिंतीवर टांगलेली शस्त्रे झाली.

तिने त्यांना पाहिले, कारण ती पटकन हसली आणि म्हणाली, की त्यांना मेणबत्तीची गरज नाही. मग परत एकदा वीज चमकली आणि मी त्यांच्या व तिच्या हातात काहीतरी पाहिले. आणि जरी मला समजले नाही, तरी मी मरणांतिक घाबरलो होतो. माझ्या घशातील आवंढा, खोलीच्या मध्यभागी उभे राहून तिने फोडलेल्या रडक्या हंबरड्यात विरून गेला.

“सज्ज रहा! कारण आपल्यापैकी एकजणच ही खोली जिवंत सोडणार आहे!”

द्वन्द्व! नवरा व बायको यांच्यातील, माझ्या आईवडीलांमधील --- मरणांतिक द्वन्द्व --- त्यांच्या मुलाच्या देखत चाललेले --- हे दुःखान्तिकेचे खबदाड आहे का? एका अकरा वर्षाच्या मुलासाठी त्याचे आयुष्य क्रूरपणे नष्ट करायचे सैतानाने ठरवले आहे का?

मी ते सगळे एकदम बघितले, असे नाही. मी फारच निरागस होतो. असा द्वेष बघणे माझ्यासाठी न समजणारे होते. त्या मागील भावना काय आहेत, हे कळण्याचे माझे वय नव्हते. मला एवढेच कळत होते, की काहीतरी भयानक चालले आहे --- ते माझ्या पोरकट मनाच्या कक्षेबाहेरचे होते. ते अंधारात माझ्या डोळ्यांसमोर चालले होते. भीतीने माझी वाचाच बसली. त्यापेक्षा देवाने मला आंधळा, बहिरा बनवून मारून का टाकले नाही?

विजेच्या पुढील चमचमाटाच्या वेळी मला दिसले, की ती कोपऱ्यामधून त्यांच्या अंगावर चालून आली आणि ते त्यांच्या कोपऱ्यातून निसटले. त्यात मला

त्यांच्या हातातील शस्त्रेही दिसली. क्षणभर मी तलवारी पाहिल्यावर माझी खात्री पटली. कारण मी त्या पूर्वी पाहिल्या होत्या. त्यांच्या हातातील म्यानात त्या असलेल्या पाहिल्या होत्या. घराच्या सर्वात वरच्या मजल्यावरील लहानशा खोलीत, त्याना त्याचा सराव करतांनाही पाहिले होते. पण त्या तलवारींवर बटणे होती. यावेळेस मात्र त्या धारदार होत्या आणि कमी उजेडातही चमकत होत्या.

"तिचे उद्गार आणि त्यांचे रागाऊन गुरगुरणे, यानंतर काही हालचाली झाल्या. त्या मी क़्वचितच ऐकू शकलो. पण त्या भयानक असल्याचे लक्षात येत होते. मग धडामदिशी आवाज झाला. तलवारी एकमेकींना भिडल्या होत्या.

परत वीज चमकली, तेव्हा त्यांच्यापैकी एकजण मेला/मेली असावा/असावी. पण काळोख होता, तसाच राहिला. जेव्हा विजेमुळे खोलीत प्रकाश पडला, तेव्हा ते बाजूला झालेले होते. त्यानी एक वाक्य उच्चारले, जे मी कधीच विसरणार नाही.

"ऱ्होडा, तुझ्या कपड्याच्या हातावर रक्त आहे. मी तुला जखम केली आहे. आता हे द्वन्द्व आपण संपवू. येथील लोकांना वाटत असेल, की आपण पृथ्वीच्या दोन टोकांना आहोत."

मी जवळजवळ बोललो. पोरकटपणे त्यांचे हे जे काही चालले होते, ते थांबवायला सांगितले --- माझी आठवण काढून, थांबवायला सांगितले. पण ते माझे केवळ वाटणे होते. खरे तर मी कितीही प्रयत्न केले तरी माझ्या घशातून काही आवाज निघेना. स्पष्टपणे नकार! माझी जीभ लुळी पडली. माझे हृदय जड होऊन विदीर्ण झाले.

ती विचित्र आवाजात बोलली, “मी शपथ घेतली आहे. ती निभावून न्या. दुसरा जिवंत व आनंदी असेल, तर पहिल्याच्या जीवनाला काय अर्थ आहे?”

त्याने काही उत्तर दिले नाही. आणि त्या लबाड, नाजूक हालचाली --- मी त्यांना त्यांच्या सावल्या म्हणू शकतो. चांगलेपणे. मग तिथे अचानक रडणे सुरु झाले. किंकाळ्या आणि दुःखी भावना --- बहुतेक येथील आवाज ऐकून जर आजोबा इथे आले असते, तर त्यांनी नक्कीच हा आवाज ऐकला असता. मी त्यांना हाक मारणार होतो --- नवीन सुरवात --- तेव्हाच कडकडाटासह वीज चमकली. त्या दिवसापासून, आजतागायत, माझी झोप उडवणारे काही घडले. माझे वडील भिंतीशी जखडलेले होते आणि त्यांच्यासमोर विजयाने भयंकर भासणारी माझी आई! तिचे डोळे त्यांच्यावर खिळलेले आणि --- निसर्ग अजून काही करू शकला नसता. माझ्या गळ्यातील पट्टा सैल पडला. माझ्या छातीवर खूप वेळ दाब आल्यासारखे वाटत होते. ऐकू येईल इतक्या जोराने मी ओरडलो. ती वळली. तिने पाहिले [देवाने ती दृष्ये लवकर, या क्षणी पाठवावीत.] माझा लहानखुरा बांधा ओळखून, त्या तिच्या कृत्याची भयानकता [मला तरी तशी आशा वाटली.] तिच्यात उसळून आली. तिने पवित्रा घेतला आणि तिला झेलण्यासाठीच जणू असलेल्या उंचवट्यावर ती पडली.

एक गुरगुर, मग धापा टाकणारा सुस्कारा आणि मग मला माहिती असलेल्या जगावरील शांतता खोलीत पसरली.

“तर मित्रानो, अशी माझी गोष्ट आहे. मी इतर माणसांसारखा कधीच जगलो नाही, याचे तुम्हाला आश्चर्य वाटले असेल ना?”

काही क्षणाच्या सहानुभूतीपूर्वक शांततेनंतर मिस्टर व्हॅन ब्रोकल्यॅनने पुढे चालू ठेवले. माझे आई व वडील दोघेही त्या खोलीच्या जमिनीवर मरून पडले असणार, याबद्दल मला पुरेशी खात्री होती. मी जेव्हा भानावर आलो --- ते फार वेळ न घेता, लगेचच झाले असावे. विजा चमकायच्या थांबल्या. अंधाराने मी व त्या जागेमध्ये जणू काळी चादर पसरली. त्यात माझ्या कल्पनेतील सगळी भीती दडलेली होती. मी त्यात शिरू धजलो  नाही. मी त्या दिशेने एक पायरीदेखील चढलो नाही. उडत  माझ्या स्वतःच्या अंथरुणात जाऊन माझे थरथरणारे शरीर लपवणे आणि त्याबरोबरच कुणालाही काही न सांगणे, विशेषतः आजोबांना काही न सांगणे, हे मी ठरवले होते. त्या मनाई केलेल्या खोलीत काय आहे, ते मला आता माहिती होते. माझ्या आईवडिलांची इभ्रत पणाला लागली होती, हे सत्य मी दाबून टाकू शकत नव्हतो. ते बोललो, तर मी मरेन, असे मला वाटले. बालवयात इतकी भीती वाटते आणि नायकगिरीही करावीशी वाटते. शांतता नेहमी बिनबुडाचे विचार झाकते व आपल्याला पुढील काळातील आश्चर्ये जाणवून देते. त्याला माहिती असलेली गुप्त गोष्ट काही कारणाने तो बोलू शकत नाही, मुलाच्या या त्रासासारखा दुसरा त्रास नाही. काही घटनांनी मला मदत केली. जेव्हा परत एकदा विजेचा उजेड पडला, तेव्हा मला माझ्या आयुष्याशी निगडीत अशा सर्व गोष्टी दिसल्या. माझे छोटेसे अंथरूण, खिडकीतील खेळणी, पिंजऱ्यातील खारुताई --- मला पुन्हा रिकामे घर दिसणे भाग पडले. त्याच्या प्रत्येक कोपऱ्यात, मला वडीलांचा आवाज ऐकू येऊ लागला किंवा आईची मूर्ती दिसू लागली --- हो, ते मेले आहेत, पुन्हा कधीही ते दिसणार नाहीत वा त्यांचा आवाजही येणार नाही, हे मला माहिती असले, तरी माझ्या मनाचा असा गोंधळ होत होता.

माझ्या अपुऱ्या कपड्यात मी थंडीने इतका सुन्न झालो होतो, की मी दुसऱ्या दिवशी भयानक स्वप्नानंतर अंगात ताप घेऊनच उठलो. मी ‘आई! आई!’ एवढेच ओरडू लागलो. मी बेभान झालो होतो. गोंधळाच्या मनस्थितीत सापडलो होतो, पण तरी शुद्धीवर होतो. माझे ओले गाल आणि चकाकणारे डोळे, बघून ते माझी काळजी करू लागले. मला सांगण्यात आले की आई घराबाहेर गेली आहे. दोन दिवसानंतर त्यांचे त्यांना शोधायचे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले, तेव्हा ते म्हणाले की ती युरोपला गेली आहे आणि मी बरा झालो की ते मला तिकडे घेऊन जातील. हे वचन मिळाल्यामुळे, मला जी भीती खात होती, ती खूपच कमी झाली. मी अंथरुणातून बाहेर पडून बोललो, की मी बरा आहे आणि आताच्या आता कुठेही यायला तयार आहे. डॉक्टरांनी माझी नाडी व्यवस्थित असल्याचे सांगितल्यावर व माझी एकंदरीत स्थिती चांगलीच सुधारलेली दिसल्यावर, अर्थातच माझ्या आईला भेटायची माझी नैसर्गिक इच्छा, माझ्यात उफाळून आली. पण सतत बदलणाऱ्या माझ्या मनाला ती हसून, उपदेश करू लागली. प्रवासभर माझी आशा टिकून राहिली. इतर मुलांमध्ये मिसळून, मला बळ मिळाले आणि शेवटी मला ज्या अंतिम कटू सत्याला तोंड द्यायचे आहे, त्याची देखील तयारी झाली. आम्ही आमचे युरोपमधील घर बंद पाहिले --- ते तसे बघून माझ्या लहानशा छातीत काय भावना उसळल्या असतील, ते मी तुमच्यावर सोडतो. मग आमचा लांबचा प्रवास सुरु झाला. पाच वर्ष आम्ही युरोप खंड पिंजून काढले. परदेशीचा निसर्ग पाहून, मला आणि आजोबांनाही आमच्या व्यर्थ शोधमोहिमेचा थोडा विसर पडला.

शेवटी परतणे भाग होते. परत आल्यावर घरात शिरणे माझ्यासाठी किती त्रासदायक होते, ते फक्त देवाला आणि माझ्या बिनझोपेच्या उशीलाच माहिती!

आमच्या अनुपस्थितीत काही शोध लावला गेला किंवा सर्व प्रकारची दुरुस्ती व नवनिर्माण केले गेले. ते करणे गरजेचे होते का? काळाने शेवटी मला उत्तर दिले. माझे गुपित सुरक्षित राहिले व यापुढेही राहील. ही गोष्ट एकदा व्यवस्थित जमली, की मग आयुष्य आनंदी नसले, तरी सहनशील करणे सोपे होते. तेव्हापासून मी फक्त दोन रात्री या घराबाहेर घालवल्या आणि असे करणे भागच होते. जेव्हा माझे आजोबा वारले, तेव्हा मी आतल्या भिंतीचे लाकडी दार सिमेंटने बंद करून टाकले. ते या बाजूने केले गेले आणि सिमेंटला लाकडाशी जुळणारा रंग दिला. आजपर्यंत कुणीही ते उघडले नाही. मी देखील नाही.

कधीकधी मला वाटते, मी मूर्खपणा केला आणि कधीकधी वाटते की शहाणपणा केला. माझा विचार पक्का राहिला. माझे साहस झाकण्यापेक्षा, उघड केले असते, तर त्यांच्यापैकी एक वा ते दोघेही कदाचित वाचले असते का, हे मला कसे समजणार!

प्रत्येकाचा पांढरा पडलेला चेहरा बघून तो काही वेळ थांबला. मग व्हायोलेटकडे शेवटचा कटाक्ष टाकत, तो बोलला, “मिस स्ट्रेंज, तुम्हाला या गोष्टीत काय सलगता दिसते? मी तुम्हाला भूतकाळ सांगू शकलो. आता पुढे काय होणार, हे मी तुमच्यावर सोडतो.”

उठत, तिने सगळ्या चेहऱ्यांकडे बघितले आणि एका चेहऱ्यावर नजर स्थिर करत स्वप्नाळूपणे उत्तरली, “जर बातम्यांच्या स्तंभात या व्हॅन ब्रोकल्यनच्या पुरातन ऐतिहासिक घराला रातोरात आग लागून घर जमीनदोस्त झाल्याची बातमी आली, तर सगळा देश हळहळ व्यक्त करेल आणि शहराला त्याचा एक अमूल्य

ठेवा बेकायदेशीरपणे, फसवून लुबाडला गेल्यासारखे वाटेल. पण तुम्ही गोष्टीतील सलगेतेबद्दल जे विचारत आहात, ती या पाच माणसांना दिसू शकेल.

हे जसे व जेव्हा झाले, त्यानंतर काही आठवड्यांनी, आश्चर्यकारक शोध लावला गेला, की या घराचा विमा उतरवलेला नव्हता. इतकी हानी झाल्यावरदेखील मिस्टर व्हॅन ब्रोकल्यन त्यांचे तारुण्य पुनरुज्जीवित का करत होते? त्यांच्या मित्रांमध्ये हा विषय चर्चिला जात होता.

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे पंचेचाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


# वृषाली जोशी यांची चव्वेचाळीस पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)









ज्या कव्हरवर क्लिक कराल


ते पुस्तक उघडेल


(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट



वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू



वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov




कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी








वृषाली जोशी
मार्क ट्वेन



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह


वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह


वृषाली जोशी
लिकॉकबरोबर हसा
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१

वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३

वृषाली जोशी
विश्वकथा-४

वृषाली जोशी
जॉन ओ'हारा
गुप्त सभा
व इतर कथा

वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI

THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE

वृषाली जोशी
The SOUND OF MUSIC
संगीताचा नाद

वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षाचे होत आहे.
## डॉ. वृषाली जोशी यांचे हे पंचेचाळीसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची **दहा हजाराहून अधिक पृष्ठे** प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज

नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४५), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद

बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।